# गीतें

## महिन्याचा पहिला दिवस

### सकाळची प्रार्थना.

### गीत १

१ तो पुरुष सुखी जो दुष्टांचे मतानें वर्त्तत नाहीं व पाप्यांचे मार्गांत उभा रहात नाहीं व निंदकांचे आसनीं बसत नाहीं

२ पण त्याचा संतोष ईश्वराचे धर्मविधींत आहे आणि त्याचे धर्मविधींचें ध्यान तो रात्रंदिवस करितो

३ आणि तो त्या झाडासारिखा होईल जें पाण्याचे ओघाजवळ लाविलें असतां आपलें फल सुसमयीं देतें व त्याचें पान म्लान होत नाहीं आणि जें कांहीं तो करितो तें साधतें

४ दुष्ट जन असे नाहींत पण जें भूस वारा उडवून विखरितो त्यासारिखेच आहेत

५ यास्तव दुष्ट जन न्यायाधीशींत आणि पापी न्यायी जनांचे सभेंत स्थिर उभे राहणार नाहींत

६ कांकीं न्यायी जनांचें आचरण ईश्वर अंगीकारितो पण दुष्टांचें आचरण नाशांत संपेल

## गीत २

१ विधर्मे लोकानीं कां कोलाहल केला आहे आणि लोकानीं व्यर्थ कल्पना कां केली आहे

२ ईश्वराप्रतिकूल व त्याचे अभिषिक्ताप्रतिकूल पृथ्वींतले राजे उभे राहिले आणि अधिकाऱ्यानीं एकत्र संमंत्रण केलें आहे कीं

३ त्यांचीं बंधनें आह्मी तोडूं आणि आपल्यापासून त्यांचे रज्जु टाकूं

४ जो आकाशांत बसतो तो हांसेल प्रभु त्यांचा उपहास करील

५ तेव्हां त्यांला तो आपले क्रोधानें बोलेल आणि आपले रोषानें त्यांला त्रासील

६ तर मी आपले पवित्र जीयोन पर्वतावर आपला राजा अभिषिक्त केला आहे

७ नियोग मी सांगतों ईश्वरानें मला ह्मटलें तूं माझा पुत्र आहेस आज म्यां तुला जन्म दिला आहे

८ मजपाशीं माग ह्मणजे मी विधर्म लोक तुझे विभागापरीं देईन आणि तुझे क्षेत्रापरीं पृथ्वीच्या अंत्य सीमा

९ लोहाचे दंडानें तूं त्यांला टेंचिशील कुंभाराचे मडक्यावाणीं त्यांचा चुराडा करिशील

१० तर आतां अहो राजानों तुम्ही सावध व्हा पृथ्वींतले न्यायाधीशानों तुह्मी संबोध घ्या



११ भीड धरून ईश्वराची सेवा करा आणि त्रासानें उत्साह करा

१२ पुत्र रुसूं नये आणि त्याचा क्रोध थोडासा पेटविला असतां तुह्मी मार्ग चुकून नाश पावूं नये म्हणून त्याला चुंबा जे त्याचा आश्रय धरितात ते सर्व सुखी आहेत

## गीत ३

१ हे ईश्वरा माझे शत्रु किती वाढले आहेत जे मजवर उठतात ते बहुत आहेत

२ माझे जीवाविषयीं बहुत बोलतात कीं देवाजवळ त्याचा कांहीं आश्रय नाहीं

३ पण तूं हे ईश्वरा मजसाठीं ढाल आहेस तूं माझें गौरव व माझें डोचकें उभारणारा आहेस

४ मी आपल्या वाणीनें ईश्वराला आह्वति केली तेव्हां त्यानें आपले पवित्र पर्वतांतून मला उत्तर दिलें

५ मी आडवा पडून झोंप घेतली मी जागा झालों कारण कीं ईश्वरानें मला संभाळिलें

६ ज्यां अयुतावधि लोकानीं मज भोंवता वेढा घातला आहे त्यांचें भय मी धरणार नाहीं

७ हे ईश्वरा तूं उठ माझे देवा मला तार कां तर त्वां माझे सर्व वैऱ्यांचे कानफटांत मारिलें त्वां दुष्टांचे दांत पाडून कुकलें केलीं आहेत

८ तारण ईश्वराकडूनच होतें तुझे लोकांला तुझी आशी असावी

## गीत ४

१ जेव्हां मी आह्वति करितों तेव्हां हे माझे न्यायी देवा मला उत्तर दे मी संकटांत होतों तेव्हां त्वां मला मुक्त केलें मजवर दया करून माझी प्रार्थना ऐक

२ अहो मनुष्यानों तुम्हाला माझें गौरव किति वेळ अप्रतिष्ठा वाटून तुह्माला शून्यता आवडेल कितिवेळ तुम्हीं असत्यता शोधाल

३ पण तुह्मी जाणा कीं ईश्वरानें आपल्यासाठीं पुण्यवान निवडिला आहे मी त्याला आह्वति करीन तेव्हां ईश्वर ऐकेल

४ तुम्ही भय धरा व पाप करूं नका तुह्मी आपले पलंगावर आपल्या मनाशीं संभाषण करा आणि मौन धरा

५ पुण्य बलि दानें तुह्मी अर्पा आणि ईश्वरावर भाव ठेवा

६ आह्माला सुख कोण भोगवील असें बहुत ह्मणतात हे ईश्वरा तूं आपलें मुखतेज आह्मावर पडूं दे

७ त्यांचें धान्य व द्राक्षारस बहुत झालीं त्यासमयींचे त्यांचे हर्षापेक्षां त्वां माझे मनाला फार आनंद दिला आहे

८ मी लागलाच आडवा पडून स्वस्थपणें झोंप घेईन कांकीं केवळ तूंच हे ईश्वरा मला सलामत राहवितोस

## गीत ५

१ हे ईश्वरा माझे वाक्यांकडे कान दे माझा उच्छासध्यानांत आण



२ हे माझे राजा व माझे देवा माझे आह्वतीचे शब्दाकडे कान लाव कांकीं मी तुझी प्रार्थना करितों

३ सकाळीं हे ईश्वरा तूं माझी वाणी ऐकशील सकाळीं मी तुझी विनंती करून जपेन

४ कांकीं ज्याला दुष्टता आवडत्ये असा देव तूं नाहींस तुजपाशीं वाईट राहाणार नाहीं

५ तुझे दृष्टि पुढें गर्विष्ठांच्यानें उभें राहवत नाहीं सर्व दुष्ट कर्त्यांस तूं द्वेषितोस

६ असत्य वक्त्यांस तूं नाशिशील घातक व कपटी यांचा वीट ईश्वर मानितो

७ पण मी तुझे परम कृपेनें तुझे घरांत येईन आणि तुझी भीड धरून तुझे पवित्र गाभाऱ्याकडेस मी भजन करीन

८ हे ईश्वरा तूं आपले पुण्यतेंत मला संभाळून ने माझे शत्रूंकरितां तूं आपला मार्ग मजपुढें नीट कर

९ कांकीं त्यांचे वाणींत कांहीं सात्विकपण नाहीं त्यांचें अंतर्यामच दुष्टपण आहे त्यांचा गळा उघडें प्रेतस्थलच आहे ते आपल्या जिभेनें स्निग्ध भाषण बोलतात

१० हे देवा त्यांजला अपराधी मान ते आपल्या संमंत्रणानीं पडोत त्यांचे फार अपराधांमध्यें त्यांला पाडून टाक कांकीं ते तुजवर फितुरले आहेत

११ पण सर्व जे तुझा आश्रय धरितात त्यांचें तूं रक्षण करितोस ह्मणून ते हर्ष करोत ज्यांला तुझें नाम प्रिय आहे तेहि उल्लाह करोत

१२ कांकीं तूंच हे ईश्वरा पुण्यवानास आशी देशील कव चावाणीं तूं अपल्या प्रसन्नतेनें त्याला वेष्टिशील

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत ६

१ हे ईश्वरा तूं आपले क्रोधानें मला धमकावूं नको तूं आपले रोषानें माझी शिक्षा नको करूं

२ हेईश्वरा मी ग्लान आहें ह्मणून मजवर दया कर हे ईश्वरा माझीं हाडें पीडिलीं आहेत म्हणून मला बरें कर

३ माझा जीवहि फार पीडिलेला आहे तर तूं हे ईश्वरा किती उशीर करिशील

४ हे ईश्वरा तूं परत ये माझा जीव मुक्त कर तूं आपले कृपेमुळें मला तार

५ कांकीं मरणांत तुझें कांहीं स्मरण नाहीं प्रेतस्थलीं तुझी स्तुती कोण करील

६ मी कन्हून थकलों आहें सारी रात्र मी आपली गादी पोंहवितों मी आपल्या आंसवानीं आपले पलंगाचें पाणी करितों

७ शोकामुळें माझा डोळा आंवळला आहे माझे सर्व शत्रूंमुळें जीर्ण झाला आहे

८ अरे सर्व दुष्ट कर्त्यांनों मजपासून दूर जा कां कीं माझे रडण्याचा शब्द ईश्वरानें ऐकिला आहे



९ ईश्वरानें माझी काकळूत ऐकिली आहे ईश्वर माझी प्रार्थना आंगीकारील

१० माझे सर्व वैरी लाजतील व फार व्याकुल होतील ते अकस्मात पराङ्मुख होऊन लज्जा पावतील

## गीत ७

१ हे ईश्वरा माझे देवा तुझा आश्रय मी धरितों जेमाझे पाठीस लागतात त्यांपासून मला तार व मला मुक्त कर

२ नाहीं तर सिंहावाणीं तो माझा जीव फाडील आणी कोणी मुक्त करणारा नसतां त्याला विदारील

३ हेईश्वरा माझे देवा जर म्यां हें केलें माझे हातीं जर अन्याय असला

४ जर म्यांआपले मित्रांचें उलटें वाईट केलें अथवा जर एव्हवीं म्यां आपले शत्रूला लुटलें

५ तर वैरी माझे पाठीस लागून माझा प्राण घेवो तोच माझा जीव मातींत तुडवो आणि माझें गौरव धूळींत मिळवो

६ हे ईश्वरा तूं आपले क्रोधानें ऊठ माझे शत्रूंचे कोपा विरुद्ध उभा रहा मजविषयीं जागृत हो माझे न्यायाची आज्ञा कर

७ जेव्हां लोकांची सभा तुजभोंवतीं येत्ये तेव्हां तिज करितां पनः उच्चस्थानीं जा

८ ईश्वर लोकांची न्यायाधीशी करील हे ईश्वरा माझें
यथार्थपण व सात्विकपण यांप्रमाणें माझा न्याय ठरीव
९ दुष्टांचें दुष्टपण नाहींसें होवो पण जो न्यायी त्यास
तूं स्थाप कां तर जो तूं हे देवा हृदय व अंतर्याम पारखि
तोस तो तूं न्यायी आहेस
१० देव जो यथार्थ मनाच्यांस तारितो त्याजपाशीं
माझा आश्रय आहे
११ देव सात्विक न्यायाधीश आहे आणि प्रतिदि
वशीं देवाचा रोष होतो
१२ जर तो न फिरेल तर तो आपली तरवार पाज
वील त्यानें आपलें धनुष्य लववून सज्ज केलें आहे
१३ त्यासाठीं त्यानें मारक शस्त्रें सिद्ध केलीं आहेत
त्यानें आपले तीर सुतीक्ष्ण केले आहेत
१४ पहा तो अन्यायाच्या तिडका देतो आणि उपद्रवाचें
गर्भधारण करून त्यानें लबाडी प्रसविलीआहे
१५ त्यानें खांच खाणिली तीहि त्यानें खोल खोदिली
आणि जो खाडा त्यानें केला त्यांतच आपण पडला
१६ त्याचा उपद्रव उलटा त्याचेच डोईवर येईल
आणि त्याचा द्रोह त्याचेच शिखेवर उतरेल
१७ ईश्वराचे न्यायाप्रमाणें मी त्याची स्तुति करीन आणि
परात्पर ईश्वराचें नाम गाऊन वर्णीन

### गीत ८

१ हे ईश्वरा आमचे प्रभो सर्व जगांत तुझें नाम केवढें



थोर आहे ज्या त्वां आपलें वैभव आकाशावरतीं ठेविलें
आहे
२ बाळ व तान्हियांचे तोंडांतून त्वां आपले शत्रू करितां
प्रशंसा साधिली आहे वैरी व सूड घेणारे यांस कुंठित
करावें ह्मणून
३ जें तुझें आकाश तुझें अंगुलिकार्य आहे जो चंद्र आणि
जे तारे त्वां विहित केले आहेत त्यांजकडे जेव्हां मी
आपली दृष्टि लावितों
४ तेव्हां मनुष्य काय आहे आणि त्याला तूं स्मरतोस
आणि मनुष्यसंतान काय आणि त्याला आसन्न होतोस
५ तर त्वां त्यास दूतांपेक्षां कांहींसें धाकटें केलें आहे
गौरवानें व वैभावानें त्वां त्याला वेष्टिलें आहे
६ त्वां आपले हस्तकार्यांवर त्याला प्रभुत्व दिलें आहे
त्याचे पायांखालीं त्वां सर्व ठेविलें आहे
७ सर्व मेंढरें व ढोरें आणि रानांतील पशुहि
८ अंतरिक्षांतील पांखरें व समुद्रांतील मासे जें कांहीं
जलमार्गांत क्रमतें
९ हे ईश्वरा आमचे प्रभो सर्व जगांत तुझें नाम केवढें
थोर आहे

## महिन्याचा दुसरा दिवस

सकाळची प्रार्थना.

### गीत ९

१ मीआपले पूर्ण मनेंकरून ईश्वराची स्तुति करीन
मी तुझें सर्व आश्चर्य्यकर्मांचें कथन करीन

२ तुजविषयीं मी हर्ष व उल्लास करीन हे परात्परा तुझें नाम मी गाऊन वर्णीन

३ माझे वैरी पराङ्मुख होऊन माघारे जातील तेव्हां पडून तुजपुढून नाश पावतील

४ कांकीं त्वां माझा न्याय व माझा वाद ठरविला आहे तूं सत्य न्यायाधीशी करीत सिंहासनावर बसलास

५ विधर्म लोकांस त्वां धमकाविलें आहे दुष्टांचा नाश त्वां केला आहे सर्वकालपर्यंत त्यांचें नाम त्वां खोडून टाकिलें आहे

६ वैरी ओसाडीप्रमाणें पूर्ण नाश पावले आहेत आणि ज्यां नगरांचें स्मरण नाहींसें झालें आहे त्यांस त्वां उच्छेदिलें

७ पण ईश्वर सनातनत: टिकेल न्याय करायासाठीं त्यानें आपलें सिंहासन मांडिलें आहे

८ तोच सत्यें कडून जगाची न्यायाधीशी करील यथार्थपणें लोकांचा वाद तो ठरवील

९ ईश्वर दुर्बलाचा आश्रय आहे संकटसमयीं तो शरणच आहे

१० तर जे तुझें नाम जाणतात ते तुजवर भाव ठेवितील कां तर जे तुला शोधितात त्यांस हे ईश्वरा त्वां कधीं टाकिलें नाहीं

११ जीयोनेंत जो ईश्वर राहतो त्याला गाऊन वर्णा लोकांस त्याचीं कर्में प्रकट करा



१२ कांकीं तोच जो हिंसेचा सूड उगविणारा त्यांचें स्मरण करील दीनांची आह्नति तो विसरत नाहीं

१३ हे ईश्वरा मजवर दया कर माझे द्वेषकानीं केलेली जी माझी पीडा ती पहा जो तूं मला मरण द्वारापासून उठवितोस

१४ अशासाठीं कीं जीयोनेचे कन्येचे द्वारांत म्यां तुझी पूर्ण कीर्ति कथावी तुझे तारणाविषयीं मी उत्सव करीन

१५ विधर्म लोकानीं जी खांच केली तींत तेच पडून फसले आहेत जें जाल त्यानी लपवून ठेविलें त्यांत त्यांचेच पाय गुंतलेले आहेत

१६ ईश्वर न्याय करितो हें कळलें आहे दुष्ट आपले हस्त कर्मांकडून पाशांत पडतो

१७ जे दुष्ट ते फिरून नरकांत जातील सर्व जे लोक देवाला विसरतात ते

१८ तर दरिद्री सर्वदा विसरला जाणार नाहीं दीनांची आशा सर्वकालपर्यंत बुडणार नाहीं

१९ हे ईश्वरा तूं ऊठ मनुष्य प्रबल होऊं नये तुजपुढें विधर्म लोकांचा न्याय केला जावा

२० हे ईश्वरा त्यांस भय घाल आपण केवळ मनुष्यें ह्मणून लोकांस समजावें

## गीत १०

१ हे ईश्वरा कां दूर उभा राहतोस संकटसमयीं कां लपतोस

२ दुष्टाचे गर्वानें दीन पोळिला जातो जे संकल्प त्यानीं विचारिले आहेत त्यांत तेच गुंतले जाओत

३ कां तर दुष्ट आपले मनोदयाविषयीं उल्लासतो लोभिष्ट देवाला नाकारून तुच्छ मानितो

४ दुष्ट आपले मुखगर्वामुळें शोध करीत नाहीं देव नाहीं अशाच त्याच्या सर्व कल्पना आहेत

५ सर्वदा त्याचें आचरण चंचल आहे तुझे विधि त्याचे दृष्टीहून वरचढ आहेत तो आपले सर्व शत्रूविषयीं फुसफुसतो

६ तो आपले मनांत ह्मणतो मी ध्वस्त होणार नाहीं पिढ्यानपिढ्यां मी विपत्तींत पडणार नाहीं

७ शाप कपट व द्रोह यानीं त्याचें तोंड भरलें आहे त्याचें जिभेखालीं उपद्रव आणि दुष्टपण आहेत

८ तो गांवांतील लिपणींत बसतो लपून निर्दोषाचा घात करितो दुर्बलास त्याचे डोळे जपतात

९ जसा सिंह आपल्या गुहेंत तसा तो गुप्तांत लपतो दीनांचें हरण करायास लपतो दीनांस आपल्या जाळांत गुंतवून त्यांचें हरण करितो

१० त्याचे बलवानांकडून दुर्बल ठेंचला जातो आणि गळून पडतो

११ तो आपले मनांत म्हणतो देव विसरला आहे त्यानें आपलें मुख आच्छादिलें आहे तो कधीं पाहणार नाहं



१२ हे ईश्वरा तूं ऊठ हे देवा तूं आपला हात उगार दीनांस विसरूं नको

१३ देवाला दुष्ट कां तुच्छ मानितो तोआपले मनांत ह्मणाला आहे कीं तूं झडती करणार नाहींस

१४ तां अवलोकन केलें आहे तर तूं आपले हातानें प्रतिकार करायला उपद्रव व कपट पाहतोस दुर्विध तुला शरण जातो तूं पोरक्याचा संरक्षक आहेस

१५ दुष्टाचा भुज तूं मोड आणि अधिक नसांपर्यंत दुष्कर्म्यांचें पातक शोध

१६ ईश्वर सनातनतः राजा आहे त्याचे भूमींतून विधर्म लोक नाहींसे झाले आहेत

१७ हे ईश्वरा दीनांची प्रार्थना ऐकिलीस त्यांचें मन स्थिर करितोस तूं आपला कान लावितोस

१८ अनाथाचा आणि दुर्बलाचा न्याय करायला अशा साठीं कीं पृथ्वींतले मनुष्यानें अणखी नभेडवावें

## गीत ११

१ ईश्वराचा आश्रय म्यां धरिला आहे तर माझे जीवाला तुम्ही कां ह्मणतां कीं तूं पक्ष्यावाणी आपले पर्वताकडे पळ

२ कां कीं पहा दुष्ट धनुष्य लववितात यथार्थमनाच्यांस लपून मारावें ह्मणून ते आपले तीर मौर्वीला लावितात

३ कां कीं पाये जर मोडले तर सात्विकानें काय करावें

४ ईश्वर आपले पवित्र मंदिरांत आहे आकाशांत

ईश्वराचं सिंहासन आहे त्याचे डोळे पाहतात त्याच्या पापण्या मनुष्यांस पारखतात

५ ईश्वर सात्विकाला पारखितो पण दुष्टाला व द्रोहप्रीलाला त्याचा जीवात्मा द्वेषितो

६ दुष्टांवर विद्युत अग्नि गंधक व भयंकर वादळ एतत्संयुक्त वृष्टि ईश्वर करील हाच त्यांचा प्यायाचा वांटा होईल

७ कारण कीं न्यायी ईश्वराला न्याय आवडतो त्याची कृपादृष्टि सात्विकावर असते

संध्याकाळची प्रार्थना

## गीत १२

१ हे ईश्वरा साहाय्य कर कांकीं पुण्यवान निःशेष झाला आहे आणि मनुष्यांतून विश्वासु सरले आहेत

२ ते परस्परांशीं असत्य बोलतात स्निग्ध ओंठानी व द्विगुण मनानें बोलतात

३ सर्व स्निग्ध ओंठ व गर्विष्ठवाचक जिव्हा ईश्वर कापून टाकील

४ त्यानीं ह्मटलें आहे कीं आह्मी आपले जिव्हानीं जिंकूं आमचे ओंठ आमचेच आहेत आमचा धनी कोण

५ दीनांचे उपद्रवामुळें व दरिद्र्यांचे उच्छ्वासामुळें आतां मी उठतों असें ईश्वर ह्मणतो जो त्याजवर फुसफुसतो त्यापासून मी त्याला सलामत ठेवीन

६ ईश्वराचीं वचनें पवित्र वचनें आहेत जें रुपें मृन्मय मुशींत सात वेळां गाळलें असतां स्वच्छ झालें तशीं तीं आहेत



७ तूंच ईश्वरा त्यांला अखंडित ठेविशील यापिढीपासून सर्वकालपर्यंत त्यांस राखिशील

८ जेव्हां हलकीं मनुष्यें थोर पदवी पावतात तेव्हां दुष्ट सुखरूपें परिक्रमितात

## गीत १३

१ हे ईश्वरा कोठपर्यंत तूं मला विसरशील सर्वकालपर्यंत किं काय मजपासून कितिवेळ तूं आपलें मुख आच्छादिशील

२ कोठपर्यंत मी आपले हृदयीं नित्य शोक पावून आपले मनांत संमंत्रण करूं कोठपर्यंत माझा वैरी मजहून उंचावेल

३ हे ईश्वरा माझे देवा अवलोकन कर मला उत्तर दे म्यां मरणनिद्रेंत पडूं नये ह्मणून माझीं नेत्रें प्रकाशित कर

४ नाहीं तर माझा वैरी ह्मणेल कीं त्याजवर मी सामर्थ्य पावलों आहें आणि मी ध्वस्त झालों आहें म्हणून माझे शत्रु उल्लासतील

५ तथापि म्यां तुझे प्रसादावर भाव ठेविला आहे माझें हृदय तुझे तारणाविषयीं उल्लासेल

६ ईश्वरानें मजवर उपकार केला आहे ह्मणून मी त्याला गाईन

## गीत १४

१ मूर्ख आपले मनांत ह्मणाला आहे कीं देव नाहीं

त्यानीं दुष्टपण केलें आहे त्यानीं कुत्सि कामें केलीं आहेत पुण्यकर्मी कोणी नाहीं

२ कोणी समजत आहे कोणी देवाला शोधीत आहे किं नाहीं हें पहावें ह्मणून मनुष्यांवर ईश्वरानें आकाशांतून अवलोकन केलें

३ तीं सर्व निस्तुक फितलीं आहेत विकृत झालीं आहेत शुभकर्मी कोणी नाहीं एकहि नाहीं

४ जे दुष्कर्मी ते सर्व कांहीं समजत नाहींत काय जसे ते भाकर खातात तसे माझे लोकांस ते खातात आणि ईश्वराची प्रार्थना करीत नाहींत

५ तेथें ते फार भयभीत होते कां तर देव न्याय्यजनां मध्यें असतो

६ दीनाचें संमंत्रण तुह्मी मोडिलें तरीं ईश्वर त्याचा आश्रय आहे

७ जीयोनेंतून ईस्राएलाचें तारण कोण करील ईश्वर आपले लोक प्रवासांतून परत आणील तेव्हां याकोब उल्हासेल आणि ईस्राएल आनंदेल

## महिन्याचा तिसरा दिवस

सकाळची प्रार्थना.

### गीत १५

१ हे ईश्वरा तुझे मंडपांत कोण राहील तुझे पवित्र पर्वतांत कोण वस्ती करील



२ जो सात्विकपणें वर्त्ततो व न्याय आचरितो आणि आपले मन:पूर्वक सत्य बोलतो

३ जो आपले जिभेनें चुगली करीत नाहीं जो आपले शेजाऱ्याचें वाईट करीत नाहीं आणि आपले सहवास्याविषयीं चहाडी करीत नाहीं

४ ज्याचे दृष्टीस जो दुर्वृत्त तो आवमान्य दिसतो पण जे ईश्वराचें भय धरितात त्यांचा सन्मान करितो जो आपल्या अहिताला शपथ वाहिली तरीं पालटीत नाहीं

५ जो व्याजासाठीं देत नाहीं जो निर्दोषाप्रतिकूल लांच घेत नाहीं जो असलें आचरण करितो तो कधीं ध्वस्त होणार नाहीं

### गीत १६

१ हे देवा माझें रक्षण कर कांकीं मी तुझा आश्रय धरितों

२ म्यां ईश्वराला ह्मटलें आहे तूंच माझा प्रभु आहेस तुजवांचून माझें सुख होईना

३ जे साधु पृथ्वींत आहेत आणि ज्यां श्रेष्टांवर माझी पूर्ण आवड आहे त्यांशीं माझें सुख असतें

४ त्यांच्या मूर्त्ति बहुत झाल्या आहेत दुसरे देवाकडेस ते त्वरें जातात त्यांचीं रक्तबलिदानें मी अर्पिणार नाहीं आणि त्यांचीं नामें मी आपले ओंठावर घेणार नाहीं

५ ईश्वर माझा क्षेत्ररूप व पानीयरूप विभाग आहे माझा वांटा तूं राखितोस

६ रम्य स्थानांत विभाग मला पडला आहे होय क्षेत्र मला फार आवडतें

७ ज्या ईश्वरानें मला संबोध केला आहे त्याचें सुवंदन मी करितों रात्रींहि माझ्या भावना मला शिक्षा करितात

८ म्यां आपले पुढें ईश्वर नित्य ठेविला आहे तो माझे उजवे हाताकडेस आहे म्हणून मी ध्वस्त होणार नाहीं

९ यास्तव माझें हृदय आनंदतें व माझें गौरव उल्लासतें माझा देहहि आशायुक्त राहील

१० कांकीं माझा जीव मृत्युलोकांत तूं सोडणार नाहींस तूं आपले पवित्रास क्षय पावूं देणार नाहींस

११ जीवनाचा मार्ग तूं मला कळविशील तुजसमोर आनंदाची पूर्त्ति आहे तुझे उजवे हाताकडेस सुख सनातनत: आहे

## गीत १७

१ हे ईश्वरा जें न्यायी तें ऐक माझी आह्वति मान माझे प्रार्थनेस कान दे ती कपटी ओंठानीं उच्चारिली जातनाहीं

२ तुजसमोरून माझा न्याय निघावा जें यथार्थ तें तुझे डोळे पाहोत

३ त्वां माझें हृदय पारखिलें आहे रात्रीं त्वां माझी पाहाणी केली त्वां मला गाळून पाहिलें आहे पण तुला कांहीं सांपडेना म्यां संकल्प केला आहे कीं माझें तोंड चुकणार नाहीं

४ मनुष्याचे कामाविषयीं तुझे ओंठांचे वचनेंकरून मी नाशकाच्या वाटा चुकून सावध राहिलों आहें



५ तुझे मार्गांत माझी चाल नीट संभाळ माझीं पावलें विसरूं नयेत

६ हे देवा त्वां माझें ऐकावें ह्मणून म्यां तुला प्रार्थना केली आहे मजकडे तूं आपला कान लाव माझें वाक्य ऐक

७ जो तूं आपले उजवे हातानें जे तुझा आश्रय धरितात त्यांस जे त्यांजवर उठतात त्यांपासून तारितोस तो तूं आपली दया प्रव्यक्त कर

८ तूं आपले डोळ्याचे बाहुलीप्रमाणें मला राख तूं आपले पक्षांचे छायेखालीं मला लपवून घे

९ जे दुष्ट मला लुंघवितात जे माझे पक्के वैरी मला घेरितात त्यांजपासून

१० त्यानीं आपलें पुष्ट हृदय झांकिलें आहे ते आपले तोंडानें गर्विष्ठपणें बोलतात

११ आतां आमचे चालण्याविषयीं त्यानीं आह्माला वेढिलें आहे आम्हास भूमीवर पाडायला त्यानीं आपले डोळे लाविले आहेत

१२ जो सिंह फाडायास इच्छितो जो तरुण सिंहहि गुप्तांत बसला त्यांसारिखा तो आहे

१३ हे ईश्वरा तूं ऊठ त्याचा विरोध कर जो दुष्ट तुझी तरवार आहे त्यापासून माझा जीव मुक्त कर

१४ तुझे साधनरूप पुरुष प्रपंची पुरुष ज्यांचा विभाग या आयुष्यांतच आहे ज्यांचें पोटहि तूं आपले गुप्त धनानें

भरितोस जे संततीनें तृप्त आहेत व आपली उरली लक्ष्मी आपले बालांसाठीं ठेवितात त्यांपासून हे ईश्वरा मला राख

१५ पण मी न्यायांत तुझें मुखदर्शन करीन मी जागा होईन तेव्हां तुझे सामर्थ्यानें तृप्त होईन

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत १८

१ हे ईश्वरा माझे सामर्थ्या तुजवर मी आवड ठेवितों

२ ईश्वर माझा पर्वत व किल्ला आहे माझा तारणारा माझा देव ज्या खडकाचा आश्रय मी धरितों तो माझी ढाल माझें रक्षक शृंग व माझें दुर्ग

३ स्तुत्य ईश्वराची प्रार्थना मी करीन तेव्हां मी आपले वैर्‍यांपासून तरेन

४ मृत्यूचे बंधानीं मला वेष्टिलें आणि नाशाचे पुरानें मला भेडाविलें

५ मृत्युलोकाचे बंधानीं मला घेरिलें मृत्यूचे पाशानीं मला अटकविलें

६ म्यां आपले संकटांत ईश्वराची प्रार्थना केली माझे देवाला म्यां आह्वति केली त्यानें आपले मंदिरांतून माझी वाणी ऐकिली माझी आह्वति त्याजपुढें येऊन त्याचे कानांत गेली

७ धरणी विह्वल होऊन कांपली पर्वतांचे पाये अस्थिर झाले तो कोपयुक्त होता ह्मणून ते थरारले



८ त्याचे नाकपुड्यांतून धूर चढला आणि त्याचे मुखांतून अग्नि जाळीत गेला त्याकडून कोळसे संदीप्त झाले

९ तो आभाळ खालावून उतरला आणि त्याचे पायांखालीं अंधकार होता

१० तो करूबावर बसून उडत गेला वाऱ्याचे पक्षांवर तो त्वरित वाहिला गेला

११ त्यानें काळोखास आपलें आच्छादन केलें त्याभोंवता त्याचा मंडप अंधकारयुक्त पाणी व निबिड आभाळ होतें

१२ त्यापुढले तेजेंकरून त्याचे निबिड मेघ सरले गारा आणि अग्नेय अंगार

१३ आकाशांत ईश्वरानें गर्जना केली परात्परानें आपला शब्द केला गारा आणि आग्नेय अंगार

१४ त्यानें आपले तीर मारून त्यांला भडकविलें वीज चकाकवून त्यांची दाणादाण केली

१५ हे ईश्वरा तुझे धमकीकडून तुझे नाकपुड्यांचे श्वासाकडून पाण्याचीं तळें दिसलीं भूमीचे पाये उघडे झाले

१६ त्यानें वरतून पाठवून मला घेतलें बहुत पाण्यांतून त्यानें मला ओढिलें

१७ जे माझे बळी वैरी व जे माझे द्वेषक मजहून बलवान होते त्यांपासून मला त्यानें तारिलें

१८ माझे दुर्दशेचे दिवसीं ते मला आडवे आले पण माझें पाठबळ ईश्वर होता

१९ प्रशस्त स्थानांत त्यानें मला बाहेर आणिलें त्याची दया मजवर होती ह्मणून त्यानें मला मुक्त केलें

२० माझे पुण्याप्रमाणें ईश्वरानें माझें हित केलें माझे हस्तशुद्धतेप्रमाणें त्यानें मला परत दिलें आहे

२१ कांकीं म्यां ईश्वराचे विधि पाळिले आणि दुष्टपणें करून मी आपल्या देवापासून फितलों नाहीं

२२ कांतर त्याच्या सर्व आज्ञा मजपुढें असतात आणि म्यां आपल्यापासून त्याचे नियम वर्ज केले नाहींत

२३ पण त्याजकडे मी सात्विक असें आणि म्यां आपणातें पापापासून रक्षिलें

२४ यास्तव माझे न्यायाप्रमाणें व त्याचे देखतां माझे हस्तशुद्धतेप्रमाणें ईश्वरानें मला परत दिलें आहे

२५ दयालु जनाशीं तूं सदय वर्त्तशील सात्विक पुरुषाशीं तूं यथायोग्य वागशील

२६ शुद्ध जनाशीं तूं शुद्ध वर्त्तशील आणि वांकडे जनाशीं तूं वांकडा वागशील

२७ कांकीं दीन लोक तूं तारितोस पण गर्विष्ठ दृष्टि तूं उतरितोस

२८ तर तूंच माझा दीप उजळशील ईश्वर जो माझा देव तो माझा अंधार दवडून प्रकाश करील

२९ कां तर तुझे योगानें मी सैन्यामधून धांवलों म्यां आपले देवाचे साहाय्येंकरून कोटावर उडी मारिली

३० देवाचा मार्गअखंडित आहे ईश्वराचें वाक्य पवित्र



आहे त्याचा आश्रय जे सर्व धरितात त्यांला तो ढालरूप आहे

३१ तर ईश्वराशिवाय देव कोण आहे आणि आमचे देवावांचून शरणपर्वत कोण आहे

३२ जो माझी कटी बलरूप बंधनानें बांधितो आणि माझा मार्ग सिद्ध करितो तो देवच आहे

३३ तो माझे पाय हरिणाचे पायांसारिखे करितो आणि माझे उंच स्थानावर मला स्थापितो

३४ तो माझे हात युद्ध करायास शिकवितो आणि माझे भुज पितळी धनुष्य लववितात

३५ त्वां आपलें कुशलवारण मला दिलें आहे तुझे उजवे हातानें माझें साहाय्य केलें आहे आणि तुझे प्रसन्नतेनें मला थोर केलें आहे

३६ मजखालतीं माझीं पावलें त्वां प्रशस्त केलीं आहेत आणि माझे गुल्फ पेंचले नाहींत

३७ म्यां आपले वैऱ्यांचे पाठीस लागून त्यांला आटपलें आणि त्यांचा नाश करींपर्यंत मी परत आलों नाहीं

३८ त्यांच्यानें न उठवेपर्यंत म्यां त्यांला पिटिलें माझे पायांखालीं ते पडले

३९ युद्ध करायाला त्वां माझी कटी बलरूप बंधनानें बांधिली जे मजवर उठले त्यांला त्वां मजखालीं पाडिलें

४० त्वां माझे वैरी त्यांची मान खालीं घालून मला दिले आणि म्यां आपले द्वेषकांचा नाश केला आहे

४१ त्यानीं आरोळी केली पण कोणी तारणारा नव्हता ईश्वराला केली पण त्यानें त्यांला उत्तर दिलें नाहीं

४२ तेव्हां जशी वाऱ्यापुढें धूलि तसें म्यां त्यांचें चूर्ण केलें आळ्यांतील चिखलाप्रमाणें त्यांस म्यां बाहेर टाकिलें

४३ लोकांचे कलहापासून त्वां मला मुक्त केलें विधर्मं लोकांवर त्वां मला आधिपत्य दिलें आहे जे लोक मला ठाऊक नाहींत ते माझे सेवक होतील

४४ माझी कीर्त्ति ते ऐकतील तेव्हांच मला वश्य होतील परके वंश माझी काकळूत करितील

४५ परके वंश गळून पडतील ते संकोच पावून आपले वाऱ्यांतून पळतील

४६ जीवंत ईश्वर आहे तो माझा पर्वत सुवंदित असो माझा उद्धारक देव थोर मानिला जावो

४७ जो मसाठीं सूड उगवितो आणि मजखालीं लोक वश्य करितो तो देवच आहे

४८ माझे वैऱ्यांपासून तो मला तारितो होय जे मजवर उठतात त्यांजवरतीं तूं मला उंचावितोस क्रूर मनुष्यापासून त्वां मला मुक्त केलें आहे

४९ यास्तव हे ईश्वरा लोकामध्यें मी तुला स्तवीन आणि तुझें नाम गाईन

५० तो आपले राजाचें मोठें तारण करितो तो आपले अभिषिक्तावर दावीदावर व त्याचे संततीवर सदा सर्वकाल कृपा करितो



## महिन्याचा चौथा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत १९

१ देवाचें गौरव आकाश दाखवितें व त्याचें हस्तकर्म अंतरिक्ष प्रव्यक्त करितें

२ दिवस दिवसास गोष्ट सांगतो रात्रि रात्रीस ज्ञान सुचवित्ये

३ वाचा नाहीं शब्द नाहींत त्यांची वाणी ऐकिली जात नाहीं

४ त्यांची लेखा सर्व पृथ्वीवर व्यापित्ये आणि त्यांचे वाद भूमिसीमांपर्यंत पसरतात त्यांत सूर्य्यासाठीं त्यानें मंडप केला आहे

५ तो वरासारिखा आपल्या मंडपांतून निघतो तो बलवान माणसाप्रमाणें वाटेंत धांवायास हर्षतो

६ आकाशाचे सीमेपासून त्याचें निर्गमन व त्याचे सीमापर्यंत त्याचें परिक्रमण आहे आणि त्याचे उष्णापासून कांहीं गुप्त राहत नाहीं

७ ईश्वराचा धर्मविधि पूर्ण आहे तो पापापासून मन फिरवितो ईश्वराची साक्ष विश्वस्त आहे ती अज्ञान्यास ज्ञान देत्ये

८ ईश्वराचे आदेश यथार्थ आहेत ते हृदय संतुष्ट करितात ईश्वराची आज्ञा पवित्र आहे ती नेत्रें प्रकाशित्ये

९ ईश्वराची सद्भीति स्वच्छ आहे ती सनातनत: टिकेल ईश्वराचे विधि सत्य आहेत ते सर्वत: सात्विक आहेत

१० सुवर्णापेक्षां बहुत उत्कृष्ट सुवर्णापेक्षां ते वर्ण्य आहेत मधुपेक्षां मधुकोषच्योतापेक्षां ते गोड आहेत

११ अणखी त्यांकडून तुझा सेवक संबोध पावतो त्यांस पाळून मोटें फळ प्राप्त होतें

१२ आपल्या भ्रांति कोण समजतो गुप्त दोषांपासून मला शुद्ध कर

१३ अणखी निर्धर्मापासून तूं आपला सेवक नियत राख त्यांनीं मजवर प्रभुता करूं नये तेव्हां मी यथार्थ होईन आणि मोठे पातकापासून निर्दोष राहीन

१४ हे ईश्वरा माझे आश्रया व माझे उद्धरणाऱ्या तुजपुढें माझीं मुखवाक्यें व माझें मनोध्यान मान्य असावीं

## गीत २०

१ संकटाचे दिवशीं ईश्वरानें तुझें ऐकावें याकोबाचे देवाचे नामानें तुझें संरक्षण करावें

२ पवित्र स्थानांतून त्यानें तुला साहाय्य पाठवावें आणि सीयोनेंतून तुला पाठबळ द्यावें

३ त्यानें तुझीं अर्पणें स्मरावीं आणि तुझा अग्निष्टोम त्यानें मान्य करावा

४ तुझे मनोदयाप्रमाणें त्यानें तुला द्यावें आणि तुझा सर्व संकल्प त्यानें पूर्ण करावा



५ आम्ही तुझे तारणाविषयीं उत्साह करूं आणि आमचे देवाचे नामानें आह्मी ध्वज उभारूं ईश्वरानें तुझ्या सर्व प्रार्थना पूर्ण कराव्या

६ आतां मी जाणतों कीं ईश्वरानें आपला अभिषिक्त तारिला आहे तो आपले पवित्र आकाशांतून आपले उजवे हाताचे तारक बळेंकडून त्याला उत्तर देईल

७ कोणी रथांवर व कोणी घोड्यांवर भरंवसा ठेवितात पण आह्मी ईश्वराचें आमचे देवाचें नाम स्मरूं

८ ते गळून पडले आहेत पण आह्मी उभे राहून टिकलों आहों

९ हे ईश्वरा तारण कर आम्ही प्रार्थितों तेव्हां राजानें उत्तर द्यावें

## गीत २१

हे ईश्वरा तुझे सामर्थ्याविषयीं राजा हर्षेल आणि तुझे तारणाविषयीं तो किति फार उल्लासेल

२ त्याची मनेच्छा त्वां पूर्ण केली आहे आणि त्याचे ओठांचे अर्थनेप्रमाणें त्याला द्यायास तूं अमान्य झाला नाहींस

३ कां तूं त्याला स्वतां उत्तम आशी देतोस तूं त्याचे डोईला उत्कृष्ट सुवर्णाचा मुकुट घालितोस

४ त्यानें तुजशीं जीवन मागीतलें तेव्हां त्वां तें आणि सर्वकालपर्यंत दीर्घ आयुष्य त्याला दिलें

५ तुझे तारणाकडून त्याचें महा गौरव झालें आहे त्वां त्यास प्रतापप्रभावविशिष्ट केलें आहे

६ कां तूं त्यास सदा कुशलयुक्त करितोस तूं आपल्या मुखेंकडून त्याला हर्षानें आनंदवितोस

७ कांकीं ईश्वरावर राजा भाव ठेवितो आणि परात्पराचे कृपेनें तो ध्वस्त होणार नाहीं

८ तुझे हातीं तुझे सर्व वैरी सांपडतील तुझे उजवे हाताला तुझे द्वेषक प्राप्त होतील

९ तूं आपले कोपाचे दिवसीं त्यांस अग्नियुक्त भट्टी सारिखे करिशील ईश्वर आपल्या क्रोधानें त्यांचा नाश करील आणि त्यांस जाळून टाकील

१० त्यांचें फल पृथ्वींतून आणि त्यांचें बीज मनुष्यांतून तूं नाहींसें करिशील

११ तुजवर त्यानीं अरिष्ट योजिलें त्यानीं दुष्टसंकल्प केला पण त्यांला साधवेना

१२ कांकीं तूं आपले मौर्व्वीस तीर त्यांजप्रतिकूल लाविशील तेव्हां त्यांस पराङ्मुख करिशील

१३ हे ईश्वरा त्वां आपले प्रभावानें उंचवावें मग तुझें सामर्थ्य आह्मी गाऊन वर्णू

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत २२

१ हे माझे देवा माझे देवा त्वां मला कां सोडिलें



आहे माझे तारणापासून माझे आरोळीचे शब्दांपासून कां दूर राहतोस

२ हे माझे देवा दिवसा मी ओरडतों आणि तूं ऐकत नाहींस रात्रींहि ओरडतों आणि मला मौन नाहीं

३ पण जो तूं इस्राएलाचे स्तवनांमध्यें वस्ती करितोस तो तूं पवित्र आहेस

४ तुजवर आमचे वडील भाव ठेवीत असत आणि तूं त्यांस मुक्त करीत असस

५ ते तुला आहूति करून वांचत असत तुजवर विश्वास ठेवून ते लज्जित झाले नाहींत

६ पण मी किडा आहें आणि पुरुष नव्हें मनुष्याचा निंदित व लोकांचा कुत्सित आहें

७ जे मला पाहतात ते सर्व मला हांसतात ते आपले ओंठ मुरडतात डोसकें हालवितात

८ तो ईश्वरावर भाव ठेवी कीं तो मला मुक्त करील तो त्याला तारो कां तो त्याची आवड धरी

९ कां तर त्वां मला उदरांतून काढिलें मी आपले आईचे स्तनांवर होतों तेव्हां त्वां मला भाव धरूं दिला

१० गर्भस्थानापासून मी तुजवर सोंपलेला होतों माझे आईचे उदरापासून तूंच माझा देव आहेस

११ मजपासून दूर राहूं नको कांकीं संकट जवळ आहे आणि साहाय्यकर्त्ता कोणी नाहीं

१२ बहूत वृषभानीं मला वेढिलें आहे बाशानाचे बळी वृषभानीं मला घेरिलें आहे

१३ फाडिते व गर्जते सिंहाप्रमाणें त्यानीं मजवर आपलें तोंड वासलें

१४ पाण्यावाणीं मी गळालों आहें सर्व माझे हाडाचे सांधे सुटले आहेत माझें हृदय मेणासारिखें झालें आहे माझे आंतड्यांमध्यें विघरलें आहे

१५ खापरीप्रमाणें माझी शक्ति सुखून गेली आहे आणि माझे दाढांस माझी जीभ चिकटली आहे आणि मरण धूलींत त्वां मला ठेविलें आहे

१६ कांकीं कुत्रे मजभोंवते आले आहेत दुष्टांचे समुदा यानें मला वेष्टिलें आहे त्यानीं माझे हात व पाय विंधिले आहेत

१७ मला आपलीं सर्व हाडें गणितां येतात ते डोळे वटारून मला पाहतात

१८ ते आपल्यासाठीं माझीं वस्त्रें वांटितात आणि माझे पांघरुणांवर पण पाडितात

१९ तर हे ईश्वरा तूं दूर राहूं नको हे माझे बलवाना माझे साहाय्यासाठीं त्वरा कर

२० तरवारीपासून माझा जीव आणि कुत्र्याचे बलापासून माझा प्रियप्राण मुक्त कर

२१ सिंहाचे मुखापासून मला तार आणि एकचरांचे शृंगांपासून त्वां माझें ऐकिलें आहे

२२ मी आपले भाव्वांला तुझें नाम कथीन सभेमध्यें मी स्तुति करीन



२३ अहो ईश्वराचे भक्तानीं तुह्मी त्याला स्तवा याकोबाचे सर्व वंश हो तुह्मी त्याला गौरवा इस्राएलाचे सर्व संतान हो तुम्ही त्याचें भय धरा

२४ कां त्यानें कष्ट्याचे कष्ट तुच्छ मानिले आणि वीट मानिले नाहींत त्यानें आपलें मुख त्यापासून आच्छादिलें नाहीं पण जेव्हां त्यानें त्याला आरोळी केली तेव्हां त्यानें त्याचें ऐकिलें

२५ महासभेंत तुजविषयीं माझें स्तवन होईल त्याचे भक्तांपुढें मी आपले नवस फेडीन

२६ दीन खाऊन तृप्त होतील ईश्वराचे अन्वेषक त्याला स्तवितील तुमचें हृदय सर्वदा जीवेल

२७ पृथ्वीच्या सर्व सीमा स्मरून ईश्वराकडे फिरतील आणि लोकांचे सर्व वंश तुजपुढें भजतील

२८ कां राज्य ईश्वराचें आहे तोच लोकांचा अधि कारी आहे

२९ पृथ्वींतले सर्व धनवंत खातील आणि भजतील जे धूलींत मिळणार आहेत ते सर्व त्याजपुढें नमन करितील व कोणाच्यानें आपला जीव वांचवत नाहीं

३० संतान त्याची सेवा करील तें प्रभूसाठीं पिढीसें मोजिलें जाईल

३१ ते येतील आणि जे लोक जन्मतील त्यांस ते त्याचा न्याय प्रकट करितील कीं त्यानें हें केलें आहे

## गीत २३

१ ईश्वर माझा पालक आहे मला न्यूनता पडणार नाहीं

२ तो मला हिरवे कुरणांत बसूं देतो मला स्वच्छ पाण्यावर नेतो

३ तो माझा जीव सावध करितो तो आपले नामाकरितां मला न्यायमार्गांत नेतो

४ मृत्युच्छायेचे खिंडींतून मी जरीं चालतों तरीं कांहीं अरिष्टास मी भिणार नाहीं कां तूं मसंगतीं आहेस तुझी आंकडी व तुझी काठी माझें समाधान करितात

५ माझे शत्रूचे देखतां मजपुढें तूं भोजन घालितोस तेलानें तूं माझे डोईस अभ्यंग करितोस माझें पात्र गळगळीत भरलें आहे

६ निश्चयें माझे आयुष्याचे सर्व दिवस मला हित व कृपा अनुसरतील आणि ईश्वराचे घरांत चिरकाल माझी वस्ती होईल

## महिन्याचा पांचवा दिवस

### सकाळची प्रार्थना

## गीत २४

१ पृथ्वी आणि तिची पूर्त्ति ईश्वराची आहे भूमि व तिजवर जे राहतात ते

२ कां त्यानें पाण्यावर तिचा पाया घातला आहे आणि नद्यांवर त्यानें ती स्थिर केली आहे

३ ईश्वराचे पर्वतावर कोण चढेल आणि त्याचे पवित्र स्थानांत कोण उभा राहील



४ हातांचा स्वच्छ व मनाचा पवित्र ज्यानें आपलें चित्त व्यर्थपणावर ठेविलें नाहीं आणि कपटानें शपथ वाहिला नाहीं

५ तो ईश्वरापासून आशी व आपल्या तारणाचे देवापासून पुण्य पावेल

६ जे त्याला शोधितात त्यांचा वंश हाच आहे तुझे मुखाचे अन्वेषक याकोबच आहेत

७ गौरवाचा राजा आंत यावा म्हणून दारानों तुह्मी आपलीं डोसकीं उभारा पुरातन दारानों तुह्मी उचलिलीं जा

८ हा गौरवाचा राजा कोण आहे ईश्वर प्रतापि पराक्रमी ईश्वर जो युद्धांत पराक्रमी तो

९ दारानों तुह्मी आपलीं डोसकीं उभारा पुरातन दारानों तुह्मी उचलिलीं जा ह्मणजे गौरवाचा राजा आंत येईल

१० हा गौरवाचा राजा कोण आहे सैन्यांचा ईश्वर तोच गौरवाचा राजा आहे

## गीत २५

१ हे ईश्वरा तुजकडे मी आपला जीव लावितों

२ माझे देवा तुजवर मी भाव ठेवितों म्यां लज्जित होऊं नये माझे वैरी मजवर उल्हास न पावोत

३ जे सर्वहि तुजवर आशा ठेवितात ते लज्जा पावूं नयेत जे उगीच अधार्मिक आहेत ते लज्जा पावोत

४ हे ईश्वरा तुझे मार्ग मला दाखीव तुझ्या वाटा मला शिकीव

५ तूं आपले सत्यांत मला चालीव आणि मला शिकीव कां तूं माझे तारणाचा देव आहेस नित्य तुजवर मी आशा ठेवितों

६ हे ईश्वरा तूं आपली कृपा व दया स्मर कां तर अनादिकालापासून त्या असत

७ हे ईश्वरा माझे तरुणपणाचीं पातकें व माझे अपराध स्मरूं नको तूं आपले दयांप्रमाणें आपले सुस्वभावामुळें मला आठीव

८ ईश्वर उपकारिक व सात्विक आहे ह्मणून तो पाप्यांस मार्ग दाखवील

९ तो दीनांस न्यायांत चालवील तो आपला माग दीनांस शिकवील

१० जे ईश्वराची संधा आणि त्याचे विधि पाळितात त्यांस ईश्वराच्या वाटा कृपा सत्य अशाच आहेत

११ हे ईश्वरा तूं आपले नामाकरितां माझे अन्यायाची क्षमा कर कां तो फार आहे

१२ ईश्वराचें भय धरितो असा मनुष्य कोण त्याला जी वाट घ्यावी लागत्ये ती तो दाखवील

१३ त्याचा जीव सुखी राहील व त्याची संतति पृथ्वीचा विभाग पावेल

१४ ईश्वराचें मैत्र्य त्याचे भक्तांशीं आहे आणि त्यांजला तो आपली संधा कळवील

१५ ईश्वराकडे माझीं नेत्रें नित्य आहेत कां तो जाळां तून माझे पाय सोडवितो



१६ मजकडे वळून प्रसन्न हो कां कीं मी एकला आणि कष्टी आहे

१७ माझे मनाचे संकोच विकसित व्हावे माझे संकटां तून मला सोडीव

१८ माझी पीडा व माझे कष्ट तूं पहा आणि माझीं सर्व पापें क्षमा कर

१९ माझे वैरी तूं पहा कीं बहुत झाले आहेत आणि कटु द्वेषानें ते मला द्वेषितात

२० माझा जीव तूं राख आणि मला तार म्यां लज्जित होऊं नये कां म्यां तुझा आश्रय धरिला आहे

२१ सात्विकपण आणि यथार्थपण मला रक्षोत कां म्यां तुजवर आशा ठेविली आहे

२२ हे देवा तूं इस्राएलाला त्याचे सर्व संकटांतून मुक्त कर

### गीत २६

१ हे ईश्वरा माझा न्याय कर कां मी आपले सात्विक पणें वर्त्तलों आहें म्यां ईश्वरावर भाव ठेविला आहे म्हणून मी भेलकांडणार नाहीं

२ हे ईश्वरा मला पारख व मला शोध माझे भाव व माझे मन गाळून पहा

३ कां तुझी दया माझे नेत्रांपुढें आहे आणि तुझे सत्यांत मी वर्त्तलों आहें

४ हलके जनांपाशीं मी बसलों नाहीं व धूर्त्तांमध्यें मी शिरणार नाहीं

५ दुष्कर्म्यांची सभा म्यां द्वेषिली आहे व दुष्टांपाशीं मी बसणार नाहीं

६ मी आपले हात निर्दोषतेंत क्षालीन तेव्हां हे ईश्वरा तुझे वेदी भोंवता मी येईन

७ स्तुतीचे शब्दानें प्रसिद्ध करायास आणि तुझीं सर्व आश्चर्यकर्में कथायास

८ हे ईश्वरा तुझे निवासगृहाची व तुझे गौरवाश्रयाची आवड म्यां धरिली आहे

९ पाप्यांशीं माझा आत्मा व घातकांशीं माझा जीव मिळवूं नको

१० ज्यां त्यांचे हातांत दुष्कल्पित कर्म आहे आणि त्यांचा उजवा हात लांचानें भरला आहे

११ पण मी आपले सात्विकपणें वर्त्तीन मला उद्धर आणि मला प्रसन्न हो

१२ माझा पाय नीट स्थलीं उभा आहे सभांत ईश्वराचें मी सुवंदन करीन

संध्याकाळची प्रार्थना

## गीत २७

१ ईश्वर माझा प्रकाश व माझें तारण आहे तर कोणास मी भिऊं ईश्वर माझी जीवशक्ति आहे तर कोणा करितां विस्मित होऊं

२ माझें शरीर खायाला जेव्हां माझे दुष्कर्मा शत्रू व वैरी मशीं भिडले तेव्हां ते गळून पडले



३ मला जरीं सैन्य वेढा घालील तरीं माझें हृदय भिणार नाहीं जरीं मजवर युद्ध उठलें तरीं मी याचा विश्वास धरीन

४ ईश्वरापाशीं म्यां एक अर्थ मागीतला आहे तोच मी शोधीन कीं ईश्वराचें तेज पहायास आणि त्याचे गाभाऱ्यांत ध्यान करायास माझे आयुष्याचे सर्व दिवस ईश्वराचे घरांत माझी वस्ती व्हावी

५ तर दुर्दिवसीं मला तो आपल्या मंडपांत झांकून रक्षील तो आपले डेऱ्याचे गुप्त स्थलीं मला लपवील खडकावर मला उभें स्थापील

६ आतांच जे माझे वैरी मजभोंवते आहेत त्यांजवर माझी डोई उभारली जाईल तेव्हां त्याचे मंडपांत मी उत्साहयुक्त बलिदानें अर्पीन मी गाईन ईश्वरालाच मी गायन वादन करीन

७ हे ईश्वरा जेव्हां मी आरोळी करितों तेव्हां माझा शब्द ऐक आणि मजवर दया करून मला उत्तर दे

८ हे माझे हृदया तुला त्यानें ह्मटलें कीं माझें मुख शोधे हे ईश्वरा तुझें मुख मी शोधीन

९ तूं आपलें मुख मजपासून लपवूं नको तूं आपला सेवक क्रोधानें दूर करूं नको तूं माझें साहाय्य होईस हे माझे तारणाचे देवा मला सोडून टाकूं नको

१० माझा बाप व माझी आई जरीं मला सोडतील तरीं ईश्वर मला घेईल

११ हे ईश्वरा तूं आपला मार्ग मला दाखीव माझे
द्रोहकांमुळें नीट वाटेंत मला चालीव
१२ माझे शत्रूंचे इच्छेस मला सोंपूं नको कां खोटे
साक्षी आणि द्रोहानें जो फुसफुसतो तो असे मजवर उठले
आहेत
१३ निश्चयें जीवंतांचे भूमींत ईश्वराचें उपकारित्व पहा
यास म्यां विश्वास धरिला आहे
१४ ईश्वरावर तूं आशा ठेव धीर धर आणि तुझें
मन तो बलयुक्त करील तर ईश्वरावर आशा ठेव

## गीत २८

१ हे ईश्वरा माझे पर्वता तुला मी आहूति करितों
मजविषयीं मौनी राहूं नको जर मजविषयीं मौनी राह
शील तर जे अधोगतीस जातात त्यांसारिखा मी होईन
२ जेव्हां तुला मी आरोळी करितों आणि तुझे गाभा
ऱ्याकडे जेव्हां मी आपले हात उभारितों तेव्हां माझे काक
ळुतीचा शब्द ऐक
३ दुष्टांसंगतीं व जे दुष्कर्मी त्यांचे मनांत द्रोह असून
आपल्या शेजाऱ्यांशीं स्वास्थ्य बोलतात त्यांसंगतीं मला नेऊं नको
४ त्यांचे करणांप्रमाणें त्यांला दे त्यांचे कार्यांचे दुष्टप
णाप्रमाणे त्यांचे हस्तकर्मांप्रमाणें त्यांला दे त्यांचें प्रति
दान त्यांला दे
५ ईश्वराचीं कार्यें आणि त्याचें हस्तकर्म ते ध्यानांत



आणीत नाहींत ह्मणून तो त्यांस मोडील आणि बांध
णार नाहीं
६ ईश्वर सुवंदित असावा कां त्यानें माझे काकळुतीचा
शब्द ऐकिला आहे
७ ईश्वर माझें बल व माझें वारण आहे त्याजवर
माझे हृदयानें भाव ठेविला आणि मी साहाय्य पावलो
आहे ह्मणून माझें हृदय उल्लासतें आणि मी आपल्या
गायनेंकडून त्याची स्तुति करीन
८ ईश्वर त्याचें बल आहे तो आपले अभिषिक्तांचें तारण
दुर्गच आहे
९ तूं आपले लोकांस तार आणि आपले क्षेत्राला
आशी दे त्यांचें पालन कर आणि सदा सर्वकाळ त्यांस उंचाव

## गीत २९

१ अहो ईश्वराचे दूत हो तुह्मी ईश्वराला द्या ईश्वराला
गौरव व वैभव द्या
२ ईश्वराला त्याचे नामाचें गौरव द्या पवित्र शोभेंक
रून ईश्वराचें भजन करा
३ ईश्वराचा शब्द पाण्यावर आहे गौरवाचा देव गर्जना
करितो ईश्वर निबिड पाण्यावरतीं आहे
४ ईश्वराचा शब्द सबल ईश्वराचा शब्द समहिमा आहे
५ ईश्वराचा शब्द महावृक्ष मोडितो लेबानानाचे महावृ
क्षहि ईश्वर मोडून टाकीतो

६ ते गोवत्साप्रमाणे बोकलते असे करिती हरिणवत्सा प्रमाणें लेबानोन व शिर्योन

७ ईश्वराचा शब्द विद्युच्छिखा भिन्न करितो

८ ईश्वराचा शब्द अरण्य कांपविती कादेशाचें अरण्य ईश्वर कांपवितो

९ ईश्वराचा शब्द उत्कृष्टवृक्ष चिरितो आणि वनें बोडकीं करितो व त्याचे मंदिरांत त्यांतलें सर्व गौरव असें ह्मणतें

१० ईश्वर जलाशयावर बसतो सदासर्वकाळ ईश्वर राजासा बसतो

११ ईश्वर आपले लोकांस सामर्थ्य देईल ईश्वर आपले लोकांस कुशलाची आशी देईल

## महिन्याचा साहवा दिवस

सकाळची प्रार्थना.

### गीत ३०

१ हे ईश्वरा मी तुला थोर ह्मणेन कारण त्वां मला वर काढिलें आहे आणि माझे वैऱ्यांला मजवर हर्ष दिलें नाहीं

२ हे ईश्वरा माझे देवा तुला म्यां आरोळी केली तेव्हां त्वां मला बरें केलें

३ हे ईश्वरा मृत्युलोकापासून त्वां माझा जीव उच लिला खांचेंत उतरण्यापासून त्वां मला जीवंत राखिलें आहे

४ ईश्वराला अहो त्याचे भक्तहो तुह्मी गायन करा आणि त्याचे पवित्र नामाची प्रशंसा करा



५ कां तर त्याचे क्रोधानें व्याकुलत्व होतें त्याचे प्रसादानें जीवन होतें रात्रीं जरीं रोदन राहील तरीं सकाळीं उत्साह होईल

६ मीहि आपले स्वास्थ्यांत ह्मणालों कीं मी कधीं च्यस्त होणार नाही

७ हे ईश्वरा त्वां आपले प्रसादानें माझा पर्वत स्थिर स्थापिला आहे त्वां आपलें मुख लपविलें तेव्हां मी भय भीत झालों

८ तुला हे ईश्वरा मी आह्वति करितों ईश्वरालाच मी विनवितों

९ मी खांचेंत उतरतांना माझे रक्ताकडून काय प्राप्ति होईल धूलि तुझी स्तुति करील काय तुझें सत्य ती प्रकट करील काय

१० हे ईश्वरा माझें ऐक आणि मला प्रसन्न हो ईश्वरा माझा साहाय्यकर्त्ता हो

११ मजसाठीं त्वां माझें आक्रंदन नर्त्तनांत पालटलें आहे त्वां माझें गोणताट काढून हर्षानें मला वेष्टिलें आहे

१२ अशासाठीं कीं माझे गौरवानें तुला गावें आणि मौनी नरहावें हे ईश्वरा माझे देवा सदा सर्वकाळ मी तुझे उपकार मानून स्तवन करीन

### गीत ३१

१ हे ईश्वरा मी तुझा आश्रय धरितों म्यां कधीं लज्जित होऊं नये तूं आपले न्यायानें मला मुक्त कर

२ मजकडे तूं आपला कान लाव त्वरा करून मला मुक्त कर मला तारायला मसाठीं दुर्गपर्वत व शरणगृह हो

३ कां तूं माझा कडा व माझा गड आहेस तर तूं आपले नामासाठीं मला ने आणि मला चालीव

४ जें जाळें त्यानीं मसाठीं गुप्त मांडिलें आहे त्यांतून मला सोड कां तूं माझा किल्ला आहेस

५ हे ईश्वरा सत्य देवा त्वां मला उद्धरिलें आहे म्हणून तुझे हातीं मी आपला जीवात्मा निरवितों

६ केवळ व्यर्थांस जे मानितात त्यांला म्यां द्वेषिलें आहे आणि ईश्वरावर म्यां भाव ठेविला आहे

७ तुझे प्रसादामुळें मी उल्लासतों व हर्षतों कारण त्वां माझी दीनता पाहिली आहे संकटांत माझा जीव त्वां अंगीकारिला आहे

८ आणि वैऱ्याचे हाताखालीं त्वां मला कोंडिलें नाहीं प्रशस्त स्थानीं त्वां माझे पाय स्थापिले आहेत

९ हे ईश्वरा मला प्रसन्न हो कारण मी संकटांत आहें माझा डोळा माझा जीव व माझें उदर खेदानें क्षीण झालीं आहेत

१० शोकांत माझें आयुष्य व उच्छ्वासांत माझीं वर्षें संपलीं आहेत माझे अन्यायामुळें माझी शक्ति थकली व माझीं हाडें झिजालीं आहेत

११ मी आपले शत्रूंसाठीं व आपले शेजाऱ्यांला निंदार्थ आणि आपले वळखीच्यांला भयार्थ फार झालों आहें बाहेर जे मला पाहतात ते मजपासून पळतात



१२ मनांतून गेलेले मृतासारिखा मी विसरला गेलों आहे नासलेले पात्रासारिखा मी झालों आहें

१३ कां बहुतांची चहाडी म्यां ऐकिली आहे ते मज विषयीं संमंत्रण करीत होते तेव्हां सभोंवतें भय होतें माझा जीव घ्यायास त्यानीं संकल्प केला

१४ पण हे ईश्वरा म्यां तुजवर भाव ठेविला आहे मी ह्मणालों आहे माझा देव तूंच आहेस

१५ माझे समय तुझे हातीं आहेत जे माझे वैरी व जे माझे पाठीस लागतात त्यांचे हातापासून मला मुक्त कर

१६ तूं आपले सेवकावर आपलें मुखतेज पडूं दे तूं आपले प्रसादानें मला तार

१७ हे ईश्वरा म्यां तुला आह्वति केली आहे ह्मणून मला लज्जा प्राप्त होऊं नये दुष्ट लज्जा पावोत मृत्युलोकांत मौनी होवोत

१८ जे असत्य ओंठ गर्वानें व निंदेनें न्यायी जनास पारुष्य बोलतात ते अवाच होवोत

१९ जे तुझें भय धरितात त्यांसाठीं जें त्वां आपलें उपकारित ठेविलें आहे जे मनुष्याचे देखतां तुझा आश्रय धरितात त्यांस त्वां केलें आहे तें किति मोठें आहे

२० मनुष्याचे बंडांपासून त्यांला तूं आपल्या मुखच्छायेंत आच्छादिशील जिव्हांचे कलहापासून त्यांस मंडपांत लपविशील

२१ ईश्वर सुवंदित असावा कां कोटबंद नगरांत मजवर त्यानें आपला प्रसाद विशिष्ट केला आहे

२२ मी आपले उद्वेगानें ह्मणालों कीं तुझे नेत्रांसमोरून मी विच्छिन्न झालों आहें तथापि म्यां तुजकडे आरोळी केली तेव्हां माझे काकळुतीचा शब्द त्वां ऐकिला

२३ अहो ईश्वराचे सर्व भक्त हो तुम्ही त्याजवर आवड ठेवा विश्वासु जन ईश्वर रक्षितो आणि गर्वकर्त्यास बहुशः प्रतिदान देतो

२४ जे सर्व तुह्मी ईश्वराची आशा धरितां ते तुह्मी धीर धरा आणि तुमचें मन तो बलयुक्त करील

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत ३२

१ ज्याचा अपराध क्षमा केला आहे ज्याचें पाप संवृत आहे तो सुखी आहे

२ ज्याला ईश्वर दोष ठेवीत नाहीं व ज्याचे मनांत कपट नाहीं तो मनुष्य सुखी आहे

३ जेव्हां मी सारादिवस ओरडत असें तेव्हां जर मौनी झालों तर माझीं हाडें जीर्ण झालीं

४ कां तर रात्रंदिवस तुझा हात मजवर भारी आहे माझें मेद उष्णकालावग्रहांत पालटलें आहे

५ मी आपलें पाप तुजवळ अंगीकारितों आणि आपला अन्याय म्यां आच्छादिला नाहीं मी आपले अपराध ईश्वराजवळ पदरीं घेऊं असें मी ह्मणालों तेव्हां त्वां माझे पापाचा अन्याय क्षमा केला

६ यास्तव प्राप्तीचे समयीं प्रत्येक भक्त तुला विनंती करील तर बहुत पाणी वाहून व्यापील तेव्हां त्याला लागणार नाहीं

७ तूं माझें आच्छादन आहेस संकटापासून मला राखशील मुक्तीचे उत्सवानें मला वेढिशील

८ मी तुला बोध करीन व ज्या मार्गांत त्वां चालावें तो तुला दाखवीन तुला उपदेशीन तुजवर माझें नेत्र आहे

९ ज्या निर्बुद्धि घोड्याची अथवा खेचराची चाल मुखयंत्रणानें आणि मुखबंधनेंकरून नियमित केली पाहिजे त्यासारिखे तुह्मी होऊं नका तुजवळ तें होऊं नये

१० दुष्टाला बहुत दुःखें लागतील पण ईश्वरावर जो भाव ठेवितो त्याजला कृपा वेढील

११ अहो सात्त्विक हो ईश्वराविषयीं तुह्मी हर्ष व उल्लासा अहो शुद्धमनाचे तुम्ही उत्साह करा

## गीत ३३

१ अहो सात्त्विक हो तुम्ही ईश्वराविषयीं उत्साह करा यथार्थीस स्तुतिकरण शोभतें

२ चंगवादनानें ईश्वराचें स्तवन करा दशतंतुवीणा वाजवून त्याचें गायन करा

३ त्याला नवें गीत गा उंच शब्द करून उत्तमप्रकारें वाद्यें वाजवा

४ कां ईश्वराचें वचन यथार्थ आहे आणि त्याचें सर्व कार्य्य सत्यतेनें घडलें आहे

५ त्याला सात्त्विकपण व न्याय आवडतात ईश्वराचे उपकारितानें पृथ्वी भरली आहे

६ ईश्वराचे शब्देंकरून आकाश उत्पन्न झालें व त्याचे मूख श्वासेंकरून त्याची सर्व सेना

७ समुद्रजल राशीवाणीं तो सांवरतो भांडारांत अथाक पाणी ठेवितो

८ अवघी पृथ्वी ईश्वराला भिवो भूमींतील सर्व निवासी त्याची भीड धरोत

९ कां तो बोलिला आणि जग उत्पन्न झालें त्यानें आज्ञा दिली तेव्हां तें स्थिर राहिलें

१० लोकांचें संमंत्रण ईश्वर मोडितो समुदायांचे संकल्प कोसळवितो

११ ईश्वराचें संमंत्रण सनातनत: स्थिर राहील आणि त्याचे मन:संकल्प पिढ्यानपढ्यां स्थिर राहतील

१२ ज्यां लोकांचा देव ईश्वर आहे त्यानें आपला विभाग व्हायासाठीं जे जन नवडिले आहेत ते धन्य आहेत

१३ आकाशांतून ईश्वर अवलोकन करितो सर्व मनुष्य जाति पाहतो

१४ तो आपले निवासस्थानांतून पृथ्वींतील सर्व निवाश्यां वर दृष्टि लावितो

१५ तो त्यांचीं हृदयें एकसारिखीं घडितो त्यांचीं सर्व कर्मे ध्यानांत आणितो

१६ महाबलानें कोणी राजा तरत नाहीं शूर महा पराक्रमानें मुक्त होत नाहीं



१७ निभावाविषयीं अश्व व्यर्थच आहे तो आपले महाश क्तीनें कोणास तारणार नाहीं

१८ पहा जे ईश्वराला भितात आणि जे त्याचे प्रसादाची आशा धरितात त्यांजवर त्याची दृष्टि असते

१९ मरणापासून त्यांचा जीव तारायाला व दुष्कालांत त्यांस वांचवायाला

२० आमचा जीवात्मा ईश्वराची वाट पाहतो तो आमचें साहाय्य व वारण आहे

२१ तर त्याजविषयीं आमचें मन हर्षेल कां त्याचे पवित्र नामावर आम्हीं भाव ठेविला आहे

२२ हे ईश्वरा तुझी आशा आह्मी धरिली आहे म्हणून आम्हावर तुझा प्रसाद असावा

गीत ३४

१ ईश्वराला सर्वदा मी सुवंदित ह्मणेन नित्य माझे मुखांत त्याची स्तुति होईल

२ ईश्वराविषयीं माझा जीव उत्सव करील दीन ऐकून हर्षतील

३ अहो तुह्मी मसंगतीं ईश्वराला थोर ह्मणा आणि आह्मी एकत्र त्याचें नाम ऊंचावूं

४ ईश्वरास म्यां शोधिलें तेव्हां त्यानें मला उत्तर दिलें आणि माझे सर्व भयांतून मला मुक्त केलें

५ ते त्याजकडे अवलोकन करून आनंद पावले व त्यांचीं मुखें लज्जार्त्त झालीं नाहींत

६ या दीनानें आरोळी केली तेव्हां ईश्वरानें ऐकिली आणि त्याचे सर्व संकटांतून त्याला तारिलें

७ ईश्वराचा दूत त्याचे भक्तांभोंवता फेरा घालितो आणि त्यांला तारितो

८ तुम्ही अनुभवून पहा कीं ईश्वर उपकारिक आहे जो पुरुष त्याचा आश्रय धरितो तो धन्य आहे

९ अहो ईश्वराचे पवित्र हो तुम्ही त्याला भ्या कां जे त्याचें भय धरितात त्यांस न्यूनता पडत नाहीं

१० सिंहाला न्यूनता पडेल व भूक लागेल पण जे ईश्वरास शोधितात त्यांला कांहीं उत्तमाची न्यूनता पडणार नाहीं

११ अहो लेंकरानों या माझें ऐका ईश्वराचें भय मी तुम्हाला शिकवीन

१२ सुख भोगायासाठीं आयुष्याची इच्छा व दिवसांची आवड धरितो तो मनुष्य कोण आहे

१३ वाईटापासून तूं आपली जीभ व कपट बोलण्यापासून तूं आपले ओंठ राख

१४ वाईट सोड आणि उत्तम कर स्वास्थ्या शोध आणि त्याला अनुसर

१५ ईश्वराची दृष्टि सात्विकांवर असते व त्याचे कान त्यांचे आह्लतिकडे असतात

१६ ईश्वराचें मुख दुष्कर्म्यांप्रतिकूल आहे त्यांचें स्मरण पृथ्वींतून नाहींसें करायास



१७ सात्विक जन आरोळी करितात तेव्हां ईश्वर ऐकतो आणि त्यांचे सर्व कष्टांतून त्यांला मुक्त करितो

१८ मनाचे नम्रांजवळ ईश्वर असतो आत्म्याचे दीनांस तारितो

१९ सात्विकांचे कष्ट बहुत आहेत पण त्यां सर्वांतून ईश्वर त्यांला सोडितो

२० त्याचीं सव हाडें तो संभाळितो त्यांतून एकहि मोडिलें जात नाहीं

२१ दुष्टास दुष्टपण मारून टाकील आणि सात्विकाचे द्वेषक शून्य होतील

२२ ईश्वर आपले सेवकांचा जीव उद्धरितो आणि त्याचा आश्रय जे धरितात त्यांतला कोणी शून्य होणार नाहीं

## महिन्याचा सातवा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ३५

१ हे ईश्वरा जे मजशीं विवाद करितात त्यांशीं तूं विवाद कर जे मशीं युद्ध करितात त्यांशीं युद्ध कर

२ ढाल आणि कवच धर आणि माझे साहाय्यासाठीं ऊठ

३ भाला काढ आणि जे माझे पाठीस लागतात त्यांचा विरोध कर माझे जीवास सांग कीं मी तुझें तारण आहें

४ माझा जीव घ्यायास जे टपतात ते लाजोत व व्याकूल

होवोत जे माझें अरिष्ट संकल्पितात ते पराङ्मुख होवोत व संकोच पावोत

५ ते वाऱ्यापुढले भुसावाणीं होवोत आणि ईश्वराचा दूत त्यांला उधळो

६ त्यांचा मार्ग अंधकारावृत व निसरडा होवो आणि ईश्वराचा दूत त्यांचे पाठीस लागो

७ कां त्यानीं उगीच आपली जाळखनि मजसाठीं लपविली एरव्हीं त्यानीं माझे जीवासाठीं खांच खणिली आहे

८ त्याजवर आपदा अकस्मात येईल व जें जाळें त्यानें लपवून ठेविलें आहे तें त्याला गुंतवील त्यांतच तो नाश पावून पडेल

९ पण ईश्वराविषयीं माझा जीव उल्लासेल त्याचे तारणामुळें आल्हादेल

१० माझीं सर्व हाडें म्हणतील हे ईश्वरा तुजसारिखा कोण आहे जो तूं दीनास त्याचे बलवत्तरापासून आणि दीन व दरिद्री यांस त्यांचे हारकापासून मुक्त करितोस

११ द्रोहक साक्षी उठतात जें मला कळलें नाहीं त्याविषयीं मला विचारितात

१२ उपकाराचे स्थानीं त्यानीं अरिष्ट परत केलें माझा जीव प्रमूल्य व्हावा ह्मणून

१३ पण ते रोगी होते तेव्हां माझें वस्त्र गोणताट होतें उपोषणेंकडून म्यां आपला जीव पीडिला अणि माझी प्रार्थना परत माझे पदरांत आली



१४ तो माझा मित्र अथवा भाऊ असें समजून मी वर्त्तलों जसा आईकरितां शोकग्रस्त तसा मी म्लान असून विमनस्क झालों

१५ पण मी गळून पडलों तेव्हां ते हर्षले आणि एकत्र मिळाले मला कळलें नसतांना भत्सक मजवर जमले ते खडखडवले आणि उगे राहिले नाहींत

१६ विधर्म परपुष्ट निंदकांसंगतीं मजवर त्यानीं आपले दांत करकरावले

१७ हे प्रभो कोठपर्यंत पाहशील त्यांचे उपद्रवांतून माझा जीव सिंहापासून माझा प्रियप्राण सोडीव

१८ महा सभेंत तुला मी कृतज्ञता निवेदीन बहुतलोकांमध्यें तुला स्तवीन

१९ जे उगीच माझे वैरी आहेत ते मजवर हर्षूं नयेत माझे एव्हवींचे द्वेषक डोळे न मिचकावोत

२० कां ते स्वास्थ्य बोलत नाहींत पण देशांत जे शांत आहेत त्यांजवर ते कपटकर्मैं योजितात

२१ मजवर त्यानीं आपलें तोंड वासलें ते म्हणाले अहा अहा आमचे नेत्रानें पाहिलें आहे

२२ हे ईश्वरा त्वां पाहिलें आहे मौनी राहूं नको हे प्रभो मजपासून दूर होऊं नको

२३ हे माझे देवा व माझे प्रभो माझे न्यायवादासाठीं उत्तेजित व जागृत हो

२४ हे ईश्वरा माझे देवा तूं आपले सात्विकपणाप्रमाणें माझा न्याय कर आणि मजवर त्यानीं हर्षूं नये

२५ त्यानीं आपले मनांत म्हणूं नये अहा आमचा मनोरथ झाला आम्हीं त्याला गिळिलें असेंहि त्यानीं ह्मणूं नये

२६ जे माझे अरिष्टामुळें हर्षतात ते एकाएकीं लज्जित व संकोचित होवोत मजवर जे आपलें मोठेपण मिरवितात ते लज्जा व अनादर यांकडून वेष्टिले जावोत

२७ जे माझे न्यायास अनुकूल आहेत ते उत्साह व हर्ष करोत आणि ज्या ईश्वराला आपले सेवकाचें हित आवडतें तो थोर मानिला जावा असें त्यानीं सर्वदा ह्मणावें

२८ आणि तुझा न्याय व तुझी प्रशंसा नित्य माझी जिव्हा उच्चारील

## गीत ३६

१ दुष्टाचा आचार माझे मनास सुचवितो कीं त्याचे नेत्रांपुढें ईश्वराचें कांहीं भय नाहीं

२ कां त्याचा द्वेष्य अन्याय उघडा झाला तरीं तो आपले दृष्टींत आपणातें वर्धावितो

३ त्याचे मुखांतले शब्द दुष्टपण व कपट आहेत सुबुद्धि धरणें व बरें करणें त्यानें सोडिलें आहे

४ तो आपले मंचकावर दुष्टपण संकल्पितो कुमार्गावर उभा राहतो वाइटाचा वीट मानीत नाहीं

५ हे ईश्वरा तुझें उपकारित्व आकाशांत आहे तुझी सत्यता आभाळापर्यंत आहे



६ तुझा न्याय महापर्वतांप्रमाणें आहे तुझीं विधानें महा गंभीर सागर अशीं आहेत हे ईश्वरा मनुष्य व पशु तूं पाळून राखितोस

७ हे देवा तुझें उपकारित्व किति आश्चर्य आहे ह्मणून मनुष्यें तुझे पक्षच्छायेचा आश्रय धरितात

८ तुझे घरचे मेदेंकरून तीं तृप्त होतील तूं आपले आनंदाचे ओघांतून त्यांला पिऊं देशील

९ कां तुजपाशीं जीवोद्गम आहे तुझे प्रकाशानें आम्हीं प्रकाश पाहतों

१० जे तुला जाणतात त्यांजवळ तुझें उपकारित्व आणि यथार्थमनाच्यांजवळ तुझा न्याय राही असें कर

११ गर्वाचा पाय मजवळ नयेवो दुष्टाचा हात मला न गांजो

१२ तेथें दुष्कर्मी पडले आहेत ते पाडून टाकिले गेले आहेत आणि पुनः उठूं शकणार नाहींत

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत ३७

१ दुष्कर्मांकरितां तूं कुसमुसूं नको अन्यायकर्त्याशीं ईर्ष्या करूं नको

२ कां ते गवतावाणीं लौकर म्लान होतील आणि हिरवळीसारिखे सुकतील

३ ईश्वरावर भाव ठेव व बरें कर भूमींत वस्ती कर आणि यथार्थपण पाळ

४ व ईश्वरावर आवड ठेव आणि तुझे मनेच्छार्थ तो तुला देईल

५ तूं आपला मार्ग ईश्वराला निरव त्याजवरच भाव ठेव म्हणजे तो तुझें साधील

६ आणि तुझें साल्विकपण प्रकाशासारिखें व तुझा न्याय मध्याह्नासारिखा निघे असें तो करील

७ ईश्वरास स्वस्थपणें जप व त्याची स्थिर आशा धर जो आपले मार्गांत क्षेम पावतो जो मनुष्य दुष्ट संकल्प साधितो त्याज विषयीं कुसमुसूं नको

८ राग सोड व क्रोध टाक केवल दुष्फल व्हायला कुस मुसूं नको

९ कां दुष्कर्मी लुप्त होतील पण जे ईश्वराची आशा धरि तात ते पृथ्वीचा विभाग पावतील

१० अणखी थोडे वेळानंतर दुष्ट नाहींसा होईल त्याचें स्थान जरीं तूं मन घालून पाहशील तरीं तें नाहीं

११ पण दीन पृथ्वीचा विभाग पावतील ते बहुकुशलांत आनंदतील

१२ साल्विकाप्रत दुष्ट दुस्संकल्प करितो आणि आपले दांत त्याजवर करकरावतो

१३ त्याला प्रभु हांसेल कां त्याचा दिवस येतो आहे असें पाहतो

१४ दीन व दरिद्री यांस पाडायास व सदाचार्यांला हिंसायाला दुष्टानीं तरवार उपसली व आपलें धनुष्य लव विलें आहे



१५ त्यांची तरवार त्यांचेच हृदयांत शिरेल आणि त्यांचीं धनुष्यें मोडिली जातील

१६ बहुत दुष्टांचे धनापेक्षां साल्विकाचें जें थोडें तें उत्तम आहे

१७ कां दुष्टांचे भुज मोडिले जातील पण साल्विकांचें पाठबळ ईश्वर करितो

१८ यथार्थांचे दिवस ईश्वर जाणतो आणि त्यांचा विभाग सदा राहील

१९ ते आपदासमयीं नलाजतील व दुष्कालदिवसांत तृप्त होतील

२० कां दुष्ट लयास जातील आणि ईश्वराचे वैरी मेषांचे मेदाप्रमाणें होतील ते निश्शेष होतील धुरांत निश्शेष होतील

२१ दुष्ट उसनें घेतो आणि परत घालीत नाहीं पण साल्विक कृपा करून देतो

२२ कां त्यानें जे आशीर्वादिलेले ते पृथ्वीचा विभाग पावतील पण त्यानें जे शापिलेले ते लुप्त होतील

२३ ईश्वरेंकडून सत्पुरुषाची पावलें निटावलीं जातात व त्याचे मार्गाविषयीं तो संतोषित होतो

२४ जरी पडेल तरीं अगदी आडवा पडणार नाहीं कां ईश्वर आपले हातानें त्यास उद्धरितो

२५ मी तरुण होतों आणि आतां म्हातारा झालों आहें तरीं सात्विक विहीन झाला अथवा त्याचा वंश भीक मागतां म्यां पाहिला नाहीं

२६ सर्वदा तो दया करितो व उसनें देतो आणि त्याचा वंश आशीर्विशिष्ट होतो

२७ वाईट सोड बरें कर आणि सदा वस्ती कर

२८ कां ईश्वर न्यायावर प्रीति करितो आणि आपले भक्त सोडीत नाहीं ते सदा सर्वकाल रक्षिले जातात पण दुष्टांची संतति विच्छिन्न केली जात्ये

२९ सात्विक पृथ्वीचा विभाग पावतील आणि तींत सर्वदा राहतील

३० सात्विकाचें मुख सुज्ञान वदतें व त्याची जीभ न्याय बोलत्ये

३१ त्याचे मनांत देवाचा धर्मविधि असतो त्याचीं पावलें पेंचणार नाहींत

३२ सात्विकास दुष्ट जपतो आणि त्याला जिवें मारायला टपतो

३३ त्याचे हातांत ईश्वर त्याला सोडणार नाहीं व त्याची न्यायाधीशी केली असतां तो अन्यायी ठरला जाऊं देणार नाहीं

३४ ईश्वरावर आशा ठेव त्याचा मार्ग धर आणि पृथ्वीचा विभागी व्हायास तो तुला उंचावील दुष्ट जेव्हां विच्छिन्न केले जातील तेव्हां तूं पाहाशील



३५ दुष्ट बळावलेला व हिरव्या गार रोपल्याप्रमाणें उवरतां म्यां पाहिला आहे

३६ पण तो नष्ट होऊन गेला आणि पहा तो नाह म्यांहि त्याचा शोध केला पण तो सांपडला नाहीं

३७ तूं सात्विकाला लक्ष व यथार्थाला पहा कां तर त्यां मनुष्याचा अंतकाल समाधानच असतो

३८ दुराचारी यच्चयावत नाश पावतील दुष्टांचा अंतीं काल मच्छिन्न होईल

३९ पण सात्विकांचें तारण ईश्वरेंकडून होतें संकटसमयीं तोच त्यांचा आश्रय आहे

४० त्यांचें ईश्वर साहाय्य करील आणि त्यांस सोडवील दुष्टांपासून त्यांस सोडवील व तारील कां ते त्याचा आश्रय धरितात

## महिन्याचा आठवा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ३८

१ हे ईश्वरा तूं आपले क्षोभानें मला धमकावूं नको व आपले रोषानें मला शिक्षूं नको

२ कां तुझे तीर माझे अंगांत रुतले आहेत व तुझा हात मजवर पडला आहे

३ तुझे कोपामुळें माझे अंगीं कांहीं आरोग्य नाहीं माझे पापामुळें माझे हाडांत कांहीं स्वास्थ्य नाहीं

४ कां तर माझे अपराध माझे डोईवर गेले आहेत जड ओझ्याप्रमाणें ते मजवर फार भारी आहेत

५ माझे मूर्खपणामुळें माझे व्रण वासळतात व पाझरतात

६ मी कळवळतों व केवळ दुणून गेलों आहें सारा दिवस मी ग्लान असून वर्त्ततों

७ कारण माझा कटिप्रदेश ज्वराग्नीनें व्याप्त आहे आणि माझे अंगीं आरोग्य कांहीं नाहीं

८ मी ग्लान झालों आहें व फार मोडावलों आहें मी आपले हृदयाचे विह्वलतेमुळें ओरडलों आहें

९ हे प्रभो माझी सर्व इच्छा तुजपुढें आहे व माझा उच्छ्वास तुजपासून लपला नाहीं

१० माझें हृदय धगधगतें माझी शक्ति थकली आहे आणि माझा नेत्रप्रकाशहि मला राहिला नाहीं

११ माझे स्नेही व माझे मित्र माझे व्रणापासून एकिकडे उभे राहातात आणि माझे ज्ञाति दूर उभे राहतात

१२ जे माझे जीवास जपतात ते पाश घालितात व माझे अरिष्टास जे झटतात ते दुर्भाषण बोलतात आणि सारा दिवस कपट उद्गारितात

१३ पण बहिऱ्याप्रमाणें म्यां ऐकिलें नाहीं व जो मुका आपलें तोंड उघडीत नाहीं त्यावाणीं मी राहिलों

१४ तर जो मनुष्य ऐकत नाहीं व ज्याचे मुखांत कांहीं गर्ह्णण नाहीं त्यासारिखा मी राहिलों



१५ कां तर हे ईश्वरा तुजवर मी आशा ठेवितों हे माझे प्रभो आणि माझे देवा तूं माझें ऐकशील

१६ नाहीं तर ते मजवर हर्षतील जेव्हां माझा पाय कांपेल तेव्हां ते आपलें महत्व मजवर मिरवितील असें मी ह्मणालों

१७ कां मी पडायचे लागास आलों आहें व माझें दुःख मजसमोर नित्य आहे

१८ तर मी आपला अपराध अंगीकारितों आपले पापामुळें मी चिंताग्रस्त आहें

१९ पण माझे वैरी सुस्थ व बलवान आहेत आणि जे एह्रवीं माझा द्वेष करितात ते बहुत झाले आहेत

२० जें उत्तम त्यास मी अनुसरतों म्हणून जे हिताचे स्थानीं अरिष्ट परत करितात ते माझे प्रतिकूल वर्त्ततात

२१ हे ईश्वरा मला सोडूं नको माझे देवा मजपासून दूर होऊं नको

२२ हे प्रभो माझे तारणा माझें साहाय्य करायला त्वरा कर

## गीत ३९

१ मी ह्मणालों म्यां आपले जिह्वेनें पाप करूं नये ह्मणून मी आपले मार्गास जपेन जेव्हां दुष्ट मजसमोर आहे तेव्हां मी आपलें मुख बंधनानें राखीन

२ मौन धरून मी मुका राहिलों उत्तमाविषयींहि उगा राहिलों व माझा खेद उत्तेजित झाला

३ मजमध्यें माझें हृदय संतप्त झालें माझे संतापानें
अग्नि जळला तेव्हां मी आपले जिव्हेनें बोलिलों
४ हे ईश्वरा माझा अंतकाळ आणि माझे दिवसांचें
परिमाण काय आहे तें मला कळीव मी केवढा नश्वर
आहे हें म्यां जाणावें
५ पहा त्वां माझे दिवस एक हस्तव्यास असे केले
आहेत आणि माझें आयुष्य तुजपुढें कांहीं नाहीं प्रत्येक
मनुष्य सुस्थित असतांहि केवळ व्यर्थपणच आहे खरें
६ निश्चयें मनुष्य छायेवाणीं जातो व्यर्थ खटपट करि
तात खरें तो धन सांठवितो आणि तें कोण भोगील हें
तो जाणत नाहीं
७ तर आतां हे प्रभो मी कशाची वाट पाहूं तुज
वरच माझी आशा आहे
८ माझे सर्व अपराधांपासून मला मुक्त कर मूर्खांस
निंद्य मला करूं नको
९ मी मुका राहिलों म्यां आपलें मुख उघडिलें नाहीं
कारण त्वां तसें केलें
१० तुझा प्रहार मजपासून दूर कर तुझे हस्तवेगानें
मी नाहींसा झालों आहें
११ अन्यायामुळें जेव्हां तूं धमक्यानीं मनुष्य शिक्षितोस
तेव्हां त्याचें सुंदरपण तूं कसरीवाणी क्षीण करितोस प्रत्येक
मनुष्य व्यर्थपणच आहे खरें
१२ हे ईश्वरा माझी प्रार्थना ऐक व माझे आह्नती



कडे कान लाव माझे रोदनाविषयीं उगा राहूं नको कां
तर मी आपले सर्व वडलांप्रमाणें तुजवळ प्रवासी व आगं
तुक आहें
१३ मी जाईन व नाहींसा होईन त्यापूर्वीं म्यां सतेज
व्हावें ह्मणून मला असूं दे

## गीत ४०

१ म्यां ईश्वराची स्थिर आशा धरिली तेव्हां मजकडे
वळला आणि माझी आह्नति त्यानें ऐकिली
२ नाशाचे खांचेंतून चिकण चिखलांतून त्यानें मला
उचलिलें व माझीं पावलें निटावून माझे पाय खडका
वर स्थापिले
३ व माझे मुखांत त्यानें नवें गीत घातलें तें देवाची
स्तुति आहे बहुत लोक पाहून भय धरितील व ईश्वरावर
भाव ठेवितील
४ जो पुरुष आपला भावविषय ईश्वर असा करितो
आणि धृष्टांकडे व असत्याकडे जे फिततात त्यांकडे वळत
नाहीं तो धन्य आहे
५ हे ईश्वरा माझे देवा तुझीं जीं आश्चर्यकर्में व
तुझे जे संकल्प त्वां आह्माकडे साधिले आहेत त्याचें तुज
वळ संकलन करवत नाहीं जर मी दाखवीन व सांगेन तर
संख्यानाहून ते अधिक आहेत

६ बलि व अर्पण त्वां इच्छिलें नाहीं माझे कान त्वां उघडिले आहेत अग्निष्टोम व पापबलि त्वां मागीतला नाहीं

७ तेव्हां मी ह्मणालों पहा मी येतों पुस्तकाचे गुंडाळींत मजविषयीं लिहिलें आहे

८ हे माझे देवा तुझा अनोदय साधायला मी इच्छितों व माझे अंतर्यामांत तुझा धर्मविधि आहे

९ महासभेंत म्यां न्याय गाजवून सांगीतला आहे पहा म्यां आपले ओंठ झांकून राखिले नाहींत असें हे ईश्वरा तूं जाणतोस

१० म्यां आपले मनांत तुझें सात्विकपण लपविलें नाहीं तुझी सत्यता व तुझें तारण म्यां सांगीतलीं आहेत महासभेपासून तुझें उपकारित्व व तुझें सत्य म्यां गुप्त राखिलें नाहीं

११ हे ईश्वरा तूं आपला कळवळा मजपासून बंद करूं नको तुझें उपकारित्व व तुझें सत्य नित्य मला रक्षोत

१२ कां तर असंख्य अरिष्टानीं मला वेढिलें आहे माझे अन्याय मला लागले आहेत ह्मणून मी अवलोकन करायास समर्थ नाहीं ते माझे डोईचे केशांपेक्षां बहुत आहेत ह्मणून माझें मन थकून गेलें आहे

१३ हे ईश्वरा मला मुक्त करायास मान्य हो हे ईश्वरा माझें साहाय्य करायास त्वरा कर

१४ जे माझा जीव हरायास टपतात ते एकाएकीं



लज्जित व व्याकुल होवोत जे मला अरिष्ट इच्छितात ते पराङ्मुख व अनादरयुक्त केले जावोत

१५ जे अहा अहा ह्मणून मला बोलतात ते आपले लज्जेमुळें शून्य होवोत

१६ जे तुला शोधितात ते सर्व तुजविषयीं आनंदोत व हर्षोत व तुझें तारण जे प्रिय मानितात ते ईश्वर थोर मानिला जावो असें नित्य ह्मणोत

१७ मी तर दोन व दरिद्री आहें तथापि मजविषयीं प्रभु विचार करितो माझें साहाय्य व माझा मुक्तिकर्त्ता तूंच आहेस हे माझे देवा उशीर करूं नको

संध्याकालची प्रार्थना.

## गीत ४१

१ जो दरिद्र्याची चिंता करितो तो धन्य त्याला आपदेचे दिवशीं ईश्वर मुक्त करील

२ त्यास ईश्वर रक्षील व वांचवील तो पृथ्वींत सुखी होईल व त्याला तूं त्याचे वैऱ्याचे इच्छेस सोंपणार नाहींस

३ रोगमंचकावर त्याची आस्था ईश्वर करील व त्याचे विकृतींत त्याचें प्रत्येक आसन तूं पालटशील

४ मी ह्मणालों हे ईश्वरा मजवर दया कर माझे जीवाची चिकित्सा कर कारण म्यां तुजप्रतीकूल पाप केलें आहे

५ माझे वैरी मजविषयीं वाईट बोलतात कीं तो केव्हां मरेल आणि त्याचें नाम केव्हां नाहींसें होईल

६ जेव्हां भेटायला येतो तेव्हां व्यर्थपणच बोलतो त्याचें मन आपलेसाठीं वाईट वेंचून घेतें तो बाहेर जाऊन तें सांगतो

७ मजविषयीं माझे सर्व द्वेषी एकत्र गुजगुजतात मज वर ते माझें अरिष्ट संकल्पितात

८ दुर्विकृति त्याला व्यापिल्ये ह्मणून तो आडवा पडला असतां पुनः उठणार नाहीं

९ जो माझा सखा माझें अन्न खात असे ज्यावर मी विश्वास ठेवीत असें त्यानेंहि आपली टांच मजवर मिर विली आहे

१० तर हे ईश्वरा त्यांस म्यां परत करावें म्हणून तूं मजवर दया करून मला उठीव

११ माझा वैरी मजवर उत्साह करीत नाहीं येणें करून मी जाणतों कीं तूं मला प्रसन्न आहेस

१२ पण मला माझे सत्यतेंत तूं आधार करितोस आणि तूं आपले पुढें मला सदासर्वकाळ ठेवितोस

१३ अनादिकालापासून अनंतकालपर्यंत ईश्वर इस्राए लाचा देव सुवंदित असो आमेन व आमेन

## गीत ४२

१ जसा हरिण पाण्याचे ओघांसाठीं लुलपतो तसा हे देवा तुसाठीं माझा जीव लुलपतो

२ देवास जीवंत देवास माझा जीव तृषतो मी केव्हां येऊन देवासमोर विद्यमान होईन



३ तुझा देव कोठें आहे असे ते मला नित्य बोलत असतां रात्रंदिवस माझीं आंसवें माझें भक्ष्य अशीं झालीं आहेत

४ या गोष्टी स्मरून मी आपल्यावर आपला जीव ओतितों कां तर समाजासंगतीं मी चालें उत्सवपालक समुदाया संगतीं उत्साहस्तवनाचा शब्द करून मी देवाचे घरा कडे मिरवें

५ हे माझे जीवा तूं कां विषण्ण झाला आहेस तू मजमध्यें कां विह्वल आहेस तूं देवाची आशा धर कां जो माझे मुखतेजोरूप आहे त्याला अणखीं मी स्तवीन

६ हे देवा माझा जीव विषण्ण झाला आहे ह्मणून यार्देनाचे देशापासून हर्मोनापासून व मिजार डोंगरापासून मी तुझें स्मरण करीन

७ तुझे धोध्यांचा शब्द असतांना लाटेमागें लाट येत्ये तुझ्या सर्व फुटत्या व लोळत्या लाटा मजवरून गेल्या आहेत

८ दिवसा ईश्वर आपलें उपकारित्व प्रवृत्त करील आणि रात्रीं माझें गीत मजपाशीं होईल व माझे जीवाचे देवाला माझी प्रार्थना केली जाईल

९ देव जो माझा पर्वत त्याला मी बोलेन कीं तूं मला कां विसरलास वैऱ्याचे उपद्रवामुळें कां मी म्लान असून वर्त्ततों

१० तुझा देव कोठें आहे असें माझे शत्रु मला नित्य

बोलत असतां ते माझीं हाडें ठेंचल्याप्रमाणें माझी निंदा करितात

११ हे माझे जीवा तूं कां विषण्ण झाला आहेस तूं मजमध्यें कां विव्हल आहेस देवाची आशा धर कारण जो माझें मुखतेज व माझा देव आहे त्यास अणखीं मी स्तवीन

गीत ४३

१ हे देवा माझा न्याय कर आणि अधार्मिक लोकांशीं माझा वाद कर कपटी व अन्यायी मनुष्यांपासून मला मुक्त कर

२ कारण तूं माझे सामर्थ्याचा देव आहेस त्वां माझा वीट कां मानिला आहे वैऱ्याचे उपद्रवामुळें कां मी म्लान असून वर्त्ततों

३ तूं आपला प्रकाश व आपलें सत्य प्रतिस्थ कर त्यानीं मला न्यावें आणि तुझे पवित्र पर्वतास व तुझे निवासस्थानास आणावें

४ तेव्हां देवाचे वेदीजवळ व देव जो माझा उल्लासी हर्ष त्याजवळ जाईन आणि हे देवा माझे देवा चंग वाजवून तुझी स्तुति करीन

५ हे माझे जीवा तूं कां विषण्ण झाला आहेस तूं मजमध्यें कां विव्हल आहेस देवाची आशा धर कारण जो माझें मुखतेज व माझा देव आहे त्यास अणखीं मी स्तवीन



## महिन्याचा नव्वा दिवस

सकाळची प्रार्थना.

गीत ४४

१ हे देवा आमचे वडलांचे दिवसांत पुरातन दिवसांत जें कार्य्य त्वां केलें तें आह्मी आपल्या कानानीं ऐकिलें व त्यानीं आम्हास कथिलें आहे

२ त्वां आपले हातानें लोक घालवून ते स्थापिले त्वां लोक पीडून ते वाढविले

३ तर ते आपल्या तरवारीनें देश पावले नाहींत व त्यांचे भुजानें त्यांस तारिलें नाहीं पण तुझा उजवा हात आणि तुझा भुज व तुझें मुखतेज यानीं कारण त्वां त्यांजवर प्रीति केली

४ हे देवा तूंच माझा राजा आहेस याकोबाचें तारण व्हावें ह्मणून आज्ञा दे

५ तुजकडून आह्मी आपले शत्रु हुंदडून देऊं जे आह्मावर उठतात त्यांला तुझे नामेंकडून आम्ही तुडवून टाकूं

६ तर मी आपले धनुष्यावर विश्वासणार नाहीं आणि माझी तरवार मला तारणार नाहीं

७ पण त्वां आमचे शत्रूंपासून आह्मास तारिलें आहे आणि ज्यानीं आह्मास द्वेषिलें त्यांस त्वां लज्जित केलें आहे

८ देवाविषयीं आह्मी नित्य उत्सव करितों आणि तुझें नाम आह्मी सनातनतः स्तवूं

९ पण त्वां आमचा वीट मानिला व आम्हास अनादर युक्त केलें आहे आणि आमचे सैन्यासंगतीं बाहेर जात नाहींस

१० त्वां आह्माला शत्रूपासून पराङ्मुख होऊं दिलें आहे आणि आमचे द्वेषी आपलेसाठीं लुटतात

११ त्वां आह्मास मेंढरांवाणीं भक्ष्यरूप होऊं दिलें आहे व लोकांमध्यें आम्हास विखरिलें आहे

१२ तूं आपले लोक फुकट विकितोस आणि त्यांचे मूल्यानें तूं आपलें धन वाढवीत नाहींस

१३ आह्मास आपले शेजाऱ्यांस निंद्य व आपले चहूं कडल्यांस हास्य व थट्टा असे करितोस

१४ विधर्मी लोकांची म्हण व लोकांचें मानहालविणें असे आम्हास करितोस

१५ माझा अनादर मजपुढें नित्य आहे व माझें मुख लज्जेनें मला वेष्टिलें आहे

१६ निंदकाचे व दुर्भाषकाचे शब्दामुळें वैरी व प्रति कारी यांकरितांहि

१७ हें सर्व आह्मास आलें आहे तथापि आम्ही तुला विसरलों नाहीं व तुझे संधेविषयीं असत्य केलें नाहीं

१८ आमचें मन माघारें फिरलें नाहीं व तुझे मार्गा पासून आमचीं पावलें सरलीं नाहींत

१९ नागांचे स्थानांत त्वां आह्मास ठेंचिलें व मृत्युच्छा येनें आह्मास वेष्टिलें आहे

२० जर आह्मीं आपले देवाचें नाम विसरलों आहों व आपले हात जर आह्मीं परके देवाकडे पसरले आहेत तर

२१ देव हें शोधणार नाहीं काय कां तर हृदयाचीं रहस्यें तो जाणतो

२२ तर तुसाठीं आह्मी नित्य वधिले जातों मरणास नेमिलेले मेंढरांवाणीं आह्मी मानिले जातों

२३ हे प्रभो जागृत हो निजतोसकां तूं ऊठ सदां वीट मानूं नको

२४ तूं आपलें मुख कां आच्छादितोस आमचे कष्ट व आमचा उपद्रव कां विसरतोस

२५ कां तर आमचा जीव धूळींत विषण्ण झाला आहे आमचें उदर भूमीस चिकटतें

२६ तूं आमचे साहाय्यासाठीं ऊठ व आपले दयेकरितां आह्मास उद्धर



## गीत ४५

१ माझें मन उत्तम अर्थ उद्गारितें राजाविषयीं मी आपलीं काव्यें बोलतों माझी जिव्हा निपुण लेखकाची लेखणीशी आहे

२ सामान्य मनुष्यांपेक्षां तूं फार सुंदर आहेस तुझे ओंठांत सत्गुण घातला आहे यास्तव देवानें तुला सर्व कालपर्यंत आशीर्विशिष्ट केलें आहे

३ हे परम पराक्रमी ऐश्वर्य व प्रताप धरून तूं आपली तरवार आपले कटीला बांध

४ आणि आपले प्रतापानें आरूढ होऊन सत्य नम्रता सात्विकपण यांसाठीं थाटानें चाल आणि तुझा उजवा हात तुला आश्चर्यकर्मे दाखवील

५ तुझे बाण सुतीक्ष्ण आहेत राजाचे शत्रूंमध्यें लोक तुजखालीं पडतात

६ हे देवा तुझें सिंहासन सनातनतः राहतें तुझा राज्य दंड यथार्थदंडच आहे

७ तूं सात्विकपणाची प्रीति व दुष्टपणाचा द्वेष धरितोस यास्तव देवानें तुझे देवानें तुला तुझे सहायांपेक्षां हर्षलक्षणेंकडून अभिषिक्त केलें आहे

८ रसाल व अगरु तुझे सर्व वस्त्रांचे सुगंधि आहेत वीणेचे हस्तिदंती घरांतून तुला आनंदित करितात

९ तुझे सन्मान्य स्त्रियांमध्यें राजकन्या होत्या तुझे उजवेकडे राज्ञी ओफीराचे सुवर्णानें भूषित उभी राहिली

१० हे कन्ये ऐकून विचार पाहून कान दे तूं आपले लोक व आपले बापाचें घर विसर

११ तेव्हां राजाला तुझें सुंदरपण फार आवडेल कां तर तो तुझा प्रभु आहे ह्मणून तूं त्याचें भजन कर

१२ आणि शोराची कन्या दान घेऊन येईल लोकां तले धनवंत तुझें आर्जव करितील

१३ अंतःपुरांत राजकन्या सर्व गौरवी आहे तिचें वस्त्र सुवर्णवायाचें आहे

१४ तिच्या कुमारीसख्या तिचे मागें चालतांना ती



विचित्र वस्त्र भूषित राजाजवळ आणिली जाईल तुजजवळ त्या आणिल्या जातील

१५ हर्ष व उत्साह करून त्या आणिल्या जातील राज मंदिरांत शिरतील

१६ तुझे पितरांचे स्थानीं तुझीं लेंकरें होतील त्यांलां सर्व पृथ्वींत अधिपति करिशील

१७ तुझें नाम सर्व पिढ्यांपर्यंत स्मरलें जाई असें करीन ह्मणून सदा सर्वकाळ लोक तुझें स्तवन करितील

## गीत ४६

१ देव आमचें शरण व सामर्थ्य आहे संकटांत साहा य्यास तो सांपडतो खरा

२ यास्तव जरीं भूमि विव्हल होईल पर्वत समुद्रामध्यें सारिले जातील तरीं आह्मी भिणार नाहीं

३ जरीं त्याचें जल गर्जून उचंबळलें व त्याचे उत्कं ठानें पर्वत कांपले तरीं

४ नदी आहे तिचे ओघळ देवाचें नगर परात्पराचे निवासाचें पवित्र स्थल आनंदित करितात

५ त्याजमध्यें देव आहे तें विधूनित होणार नाहीं लौकरच देव त्याचें साहाय्य करील

६ विधर्म लोक गलबलले राज्यें विव्हल झालीं त्यानें आपला शब्द उच्चारिला पृथ्वी अवदीर्ण झाली

९ सैन्याचा ईश्वर आम्हाशीं आहे याकोबाचा देव आमचा आश्रयच आहे

८ अहो या ईश्वराचीं कार्य्यें पहा पृथ्वींत कसा अवमर्द त्यानें केला आहे

९ पृथ्वीचे सीमेपर्यंत लढाई शांतवून तो धनुष्य मोडितो व भाला तोडितो अग्नींत रथ जाळितो

१० तुह्मी शांत राहून जाणा कीं मीच देव आहें विधर्म लोकांमध्यें उंचावला जाईन पृथ्वींत उंचावला जाईन

११ सैन्यांचा ईश्वर आह्माशीं आहे याकोबाचा देव आमचा आश्रयच आहे

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत ४७

१ अहो सर्व लोक हो टाळ्या वाजवा उत्साहशब्द करून देवाला आहुति करा

२ कां तर परात्पर ईश्वर भयास योग्य आहे सर्व पृथ्वीवर मोठा राजा तो

३ तो लोक आमचे हाताखालीं व समुदाय आमचे पायांखालीं ठेवितो

४ आह्मासाठीं आमचें क्षेत्र ज्या याकोबावर त्यानें प्रीति केली त्याचें ऐश्वर्य्य तो निवडील

५ उत्सव शब्दानें देव व करण्याचे शब्दानें ईश्वर वर गेला आहे

६ तुम्ही गा आमचे देवाला गा गा तुम्ही आमचे राजाला गा



७ कां तर देव सर्व पृथ्वीचा राजा आहे तुह्मी ताल खरें करून गा

८ लोकांवर देव राज्य करितो देव आपले पवित्र सिंहासनावर बसतो

९ लोकांतील श्रेष्ठ जन आब्राहामाचे देवाचे लोक एकच मिळाले आहेत कां तर पृथ्वीचीं वारणें देवाचें स्वत्वांत आहेत तो अत्यंत थोर आहे

## गीत ४८

१ ईश्वर थोर व परम स्तुतियोग्य आहे आमचे देवाचे नगरांत त्याचा पवित्र पर्वत आहे

२ जो जीयोन पर्वत सर्व भूमीचा आनंद आहे तो उच्चतेनें सुंदर आहे त्याचे उत्तर प्रदेशांत माहाराजाची वस्ती आहे

३ तिचे मंदिरांत देव आश्रय असा कळला आहे

४ कां तर पहा राजे एकवटले ते एकच जवळून गेले

५ त्यानीं पाहिलें तेव्हांच ते विस्मित झाले व्याकुल पडले पळाले

६ जसी प्रसविणाऱ्या स्त्रीला वेधना तसें तेथें त्यांला कंपन लागलें

७ तर्शीशांचीं गलबतें तूं प्राचीन वाऱ्यानें मोडितोस

८ जसें आह्मी ऐकिलें तसें सैन्यांचे ईश्वराचे नगरांत आमचे देवाचे नगरांत आम्ही पाहिलें आहे तें देव सर्व काळपर्यंत सुस्थित करील

९ हे देवा तुझे मंदिरामध्यें आम्ही तुझे उपकारिलाचें ध्यान केलें आहे

१० हे देवा जसें तुझें नाम तशी पृथ्वीचे सीमांपर्यंत तुझी स्तुति असो तुझा उजवा हात न्याय भरित आहे

११ तुझे विधानांविषयीं जीयोन पर्वत हर्षेल यहूदाच्या कन्या उल्लासतील

१२ जीयोने भोंवते फिरा तिजभोंवते चाला तिची दुर्गें गणा

१३ तिचे प्राकार ध्यानांत आणा तिचे प्रासाद निहाळा अशासाठीं कीं पुढले पिढीला तुम्हीं कथावें

१४ कां तर हा देव सदा सर्वकाळ आमचा देव आहे तो आह्मास मरणाचे पार संभाळील

## गीत ४९

१ अहो सर्व लोकहो हें ऐका जगाचे सर्व निवासी हो कान द्या

२ कनिष्ठ व श्रेष्ठ धनवंत व दरिद्री मिळून

३ माझें मुख ज्ञान बोलेल व माझें मनोध्यान बुद्धीचें होईल

४ दृष्टांताकडे मी आपला कान लावीन चंग वाजवून मी आपलें गुह्यभाषित प्रव्यक्त करीन

५ दुर्दिवसांत जे मला जपतात त्यांचा अन्याय जेव्हां मला वेढील तेव्हां कां भिईन



६ जे आपले द्रव्यावर विश्वासतात व आपले फार धना विषयीं फुशारतात

७ त्यांतून कोणाच्यानें आपला भाऊ उद्धरवत नाहीं आणि तो सदा वांचावा व क्षय न पावावा ह्मणून त्यासाठीं देवाला खंडणी देवत नाहीं

८ खंडणीचें मूल्य त्यांचा जीवच आहे म्हणून तो सर्व कालपर्यंत थकत्ये

९ कां तर तो पाहातो कीं विद्वान मरतात मूर्खहि आणि मंद गमावतात व आपलें धन दुसऱ्यांला सोडितात

१० सदा त्यांचीं घरें व पिढ्यानपिढ्यां त्यांच्या वस्त्या टिकतील अशी त्यांची कल्पना आहे ते आपलीं नामें आपले क्षेत्रांला ठेवितात

११ तर मनुष्य गौरवांत असून राहात नाहीं तो नश्वर पशूंसारिखा आहे

१२ हें त्यांचें आचरण त्यांचें मूर्खपणच आहे तथापि त्यांचें मत त्यांचे संततीस आवडतें

१३ मेंढरांसारिखे ते कबरींत ठेविले जातात त्यांस मृत्यु खाईल आणि त्यांजवर लोकरच यथार्थजन पायांनीं चाल तील व कबरीला तिचे वस्तींतून त्यांचें रूप नाहींसें करा याचें आहे

१४ पण कबरीचे सत्तेंतून माझा जीव देव उद्धरील कां तर तो आपल्यापाशीं मला घेईल

१५ जेव्हां कोणी मनुष्य धनवान होतो जेव्हां त्याचे घरचें द्रव्य वाढतें तेव्हां घाबरा होऊं नको

१६ कारण तो जेव्हां मरेल तेव्हां त्याला संगतीं कांहीं घेवत नाहीं त्याचें द्रव्य त्याचे मागें उतरणार नाहीं

१७ जरीं तो आपले आयुष्यांत आपले जीवास सुखी म्हणे कीं त्वां आपल्यास बरें केलें आहे ह्मणून लोक तुझी स्तुति करितील तरीं

१८ त्याचे जे पितर कधीं प्रकाश पाहात नाहींत त्यांचे वस्तीस त्याचा जीवात्मा जाईल

१९ मनुष्य गौरवांत असून समजत नाहीं तो नश्वर पशूंसारिखा आहे

## महिन्याचा दाहवा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ५०

१ सर्वसमर्थ देव जो ईश्वर तो बोलिला आहे आणि सूर्योदयस्थानापासून तदस्तस्थानपर्यंत त्यानें पृथ्वीस आह्वान केली आहे

२ जी जीयोन शोभेचीं समापन्नता आहे तींतून देव प्रकाशला आहे

३ आमचा देव येईल व मौनी राहाणार नाहीं त्यापुढें अग्नि खाईल व त्याभोंवतें वादळ फार होईल



४ त्यानें आपले लोकांचीं न्यायाधीशी करावी म्हणून तो वरतीं आकाशास पृथ्वीसहि आह्वान करील

५ ज्यां माझे साधूनीं यज्ञबलीवर मशीं संधा केली आहे त्यांस तुम्ही मजवळ एकत्र मिळवा

६ आणि त्याचें सात्त्विकपण आकाशें प्रगट करितील कारण देव स्वतां न्यायाधीश आहे

७ अहो माझे लोकहो ऐका आणि मी बोलेन इस्राएलहो ह्मणजे तुला साक्ष्य देईन मी देव तुझा देव आहें

८ तुझे बलिदानांविषयीं मी तुला गर्हीत नाहीं आणि तुझे अग्निष्टोम मजपुढें नित्य आहेत

९ तुझे घरांतून वृष घेणार नाहीं तुझे कोंडवाडींतून अज मी घेणार नाहीं

१० कां तर रानांतले सर्व जीव व हजार डोंगरांतले पशू माझेच आहेत

११ पर्वतांतले सर्व पक्षी मी जाणतों व पटांगणांतला पिसारा माझे सत्तेंत आहे

१२ मला जर भूक लागेल तर मी तुला सांगणार नाहीं कां तर जग व त्याची पूर्त्ति माझीच आहे

१३ वृषभांचें मांस मी खाईन काय अजांचें रक्त मी पिईन काय

१४ देवाला स्तुतीचें बलिदान कर व परात्पराला तूं आपले नवस फेड

१५ व संकटाचे दिवशीं तूं मला प्रार्थना कर मी तुला मुक्त करीन तेव्हां मला तूं गौरविशील

१६ पण दुष्टाला देव ह्मणतो कीं माझे विधि सांगायास अथवा माझी संधा तुझे मुखांत घ्यायास तूं योग्य आहेस काय

१७ कां तूं शिक्षा द्वेषितोस व माझीं वचनें तूं आपले पाठीमागें टाकितोस

१८ जेव्हां तूं चोर पहास तेव्हां त्याला अनुकूल होस व जारकर्म्यांशीं सहभावी असस

१९ दुष्टपणास तूं आपलें मुख सैल सोडितोस व तुझी जीभ कपट वळिते

२० तूं बसून आपले भाव्वांस प्रतिकूल बोलतोस तूं आपले आईचे पुत्राची चहाडी करितोस

२१ तीं कामें त्वां केलीं असून म्यां मौन धरिलें मी केवळ तुजसारिखा आहें असें तुला वाटलें मी तुला गर्झून तुझे नेत्रांपुढें व्यूहन करीन

२२ जे तुह्मी देवास विसरतां हें ध्यानांत आणा नाहीं तर कदाचित कोणी मुक्तकर्त्ता नसतां मी तुम्हास फाडीन

२३ जो स्तुति अर्पितो तो मला गौरवितो आणि जो आपले मार्गांत सावध असतो त्यास देवाची मुक्ति भोगूं देईन

## गीत ५१

१ हे देवा तूं आपले प्रसादाप्रमाणें मजवर दया कर तूं आपले परमकरुणेप्रमाणें माझे दोष पुसून टाक



२ मला माझे अन्यायापासून स्वच्छ धू व माझे पापापासून मला निर्मल कर

३ कांकीं मी आपले अपराध अंगीकारितों आणि माझें पाप मजपुढें नित्य आहे

४ तुजकडे केवळ तुजकडे म्यां पाप केलें आहे व तुझे दृष्टींत म्यां वाईट घडलें आहे ह्मणून जेव्हां तूं बोलशील तेव्हां स्वच्छ निघशील

५ पहा अन्यायांत मी उत्पन्न झालों व पापांत माझे आईनें माझें गर्भधारण केलें

६ पहा अंतर्यामांत सत्य असावें ह्मणून इच्छितोस आणि हृदाशयांत मला ज्ञान कळविशील

७ तूं एजोबानें मला निर्मल कर मग स्वच्छ होईन मला धू ह्मणजे बर्फापेक्षां पांढरा होईन

८ मला हर्ष व आनंद ऐकूं दे जीं हाडें त्वां मोडिलीं आहेत तीं हर्षोत

९ माझे पातकांपासून तूं आपलें मुख आवरून घे आणि माझे सर्व अन्याय पुसून टाक

१० हे देवा मजमध्यें स्वच्छ हृदय उत्पन्न कर आणि माझे अंगीं शुद्ध आत्मा नवा कर

११ तूं आपले समोरून मला टाकूं नको आणि आपला पवित्र आत्मा मजपासून काढूं नको

१२ तूं आपले तारणाचा हर्ष मला परत दे आणि आपले उदार आत्म्याकडून मला संभाळ

१३ मग मी अपराध्यांस तुझे विधि शिकवीन आणि पातकी अनुतापून तुजकडे परत येतील

१४ हे देवा माझे तारणाचे देवा हिंसादोषापासून मला मुक्त कर म्हणजे माझी जिव्हा उत्सवानें तुझे न्यायाचें कथन करील

१५ हे प्रभो माझे ओंठ तूं उघड म्हणजे माझें तोंड तुझी स्तुति प्रशस्त सांगेल

१६ कांकीं तूं बलि इच्छीत नाहींस इच्छितास तर मी देतों अग्निष्टोम तुला आवडत नाहीं

१७ देवाचे बलि म्हणजे अनुतप्त आत्मा अनुतप्त व नम्र झालेलें हृदय हे देवा तूं तुच्छ मानणार नाहींस

१८ तूं आपले प्रसादानें जीयोनेचें हित कर येरूशालेमेचे कोट बांधून यथास्थित कर

१९ तेव्हां पुण्य बलि अग्निष्टोम व सकलाग्निष्टोम तूं मान्य करिशील तेव्हांच लोक तुझे यज्ञवेदीवर वृष अर्पितील

## गीत ५२

१ अरे बलवाना दुष्कृतीविषयीं कां फुशारतोस देवाचें उपकारित्व निरंतर आहे

२ तुझी जिव्हा अरिष्टें संकल्पित्ये जो सुतीक्ष्ण वस्तरा न कळें असा चाटून जातो त्यासारिखीच ती आहे

३ सुकृतीपेक्षां दुष्कृति आणि सत्यवादापेक्षां असत्य तुला आवडतात



४ अगे कपटी जिव्हे तुला सर्व नाशकारक शब्द आवडतात

५ देवहि सर्वकालपर्यंत तुला ध्वस्त करील व वस्तींतून तुला काढून नाशील व जीवंतांचे भूमींतून तुला उपटील

६ सात्विक जनहि पाहून भितील आणि त्याला हांसतील

७ पहा हा जो पुरुष आपलें सामर्थ्य देवच आहे असें मानीत नाहीं पण आपले बहुधनावर विश्वासतो तो आपले दुष्टपणांत बल मिरवितो

८ पण देवाचे घरांत मी टवटवीत जाइतासारिखा आहें सदासर्वकाल मीं देवाचे दयेवर विश्वासेन

९ त्वां काम साधिलें आहे यास्तव मी तुला स्तवीन तूं उत्तम आहेस म्हणून तुझे साधूं देखतां तुझे नामावर आशा ठेवीन

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ५३

१ मुर्ख आपले मनांत म्हणाला आहे कीं देव नाहीं ते दूषित झाले आहेत त्यानीं कुत्सित अन्याय केला आहे सुकर्मा कोणी नाहीं

२ कोणी समजून देवाला शोधितो किं नाहीं हें पहावें म्हणून देवानें आकाशांतून मनुष्यांवर अवलोकन केलें

३ ते सर्व मागें सरले आहेत झाडून अमंगल झाले आहेत सुकर्मी कोणी नाहीं एकहि नाहीं

४ जे दुष्कर्मी जशी भाकर खातात तसे माझे लोकांला खातात ते कांहीं जाणत नाहींत काय ते देवाला प्रार्थना करीत नाहींत

५ तेथें ते फार भयभीत होते कांहीं भय नव्हतें कां ज्यानें तुला वेढिलें त्याचीं हाडें देवानें विखरिलीं आहेत त्यांस देवानें नाकारिलें ह्मणून त्वां त्याला कुंठित केलें आहे

६ इस्राएलाचें तारण जीयोनेंतून कोण देईल देव आपले प्रवासी लोक परत आणील तेव्हां याकोब उल्लासेल इस्राएल हर्षेल

## गीत ५४

१ हे देवा तूं आपल्या नामानें मला तार व आपले शक्तीनें माझा न्याय कर

२ हे देवा माझी प्रार्थना ऐक माझे मुख वाक्यांला कान दे

३ कां विदेशी मजवर उठले आहेत व माझे जीवास निर्दय टपतात देव आह्मासमोर आहे असें त्यानीं मानिलें नाहीं

४ पहा देव माझा साहाय्यकर्ता आहे प्रभु माझा जीवो द्धारक आहे

५ माझे शत्रूंला तो अरिष्ट परत करील तूं आपल्या सत्यानें त्यांस लुप्त कर

६ उदारत्वेंकडून मी तुसाठीं यज्ञ करीन हे ईश्वरा मी तुझें नाम स्तवीन कां तें उत्तम आहे



७ कारण सर्व संकटांतून त्यानें मला तारिलें आहे आणि माझें नेत्रानें माझे वैर्यांस पाहिलें आहे

## गीत ५५

१ हे देवा माझे प्रार्थनेला कान दे आणि माझे विनंती पासून लपूं नको

२ मजकडे मन लाव आणि मला उत्तर दे मी आपले ध्यानांत विव्हल व व्याकुल आहे

३ वैर्याचे शब्दामुळें दुष्टाचे संरोधामुळें कारण ते मजवर अरिष्ट प्रवृत्त करितात व रागानें माझा द्रोह करितात

४ मजमध्यें माझें हृदय कळवळतें व मृत्यूचीं भाषणें मजवर पडलीं आहेत

५ भय व कंपन मला लागलें आहे आणि विस्मयानें मला वेष्टिलें आहे

६ म्यांहि ह्मटलें कपोतासारिखे पक्ष मला कोण देईल तर तेव्हां मी उडून स्वस्थ राहीन

७ तेव्हां पहा मी दूर पळून रानांत वस्ती करीन

८ सुटलेला वारा व वादळ यांपासून मी आपलें पलायन त्वरित करीन

९ हे प्रभो त्यांच्या जिव्हा विच्छिन्न करून नाश कां म्यां नगरांत उन्माद व कलह पाहिले आहेत

१० रात्रंदिवस त्याजभोंवते त्याचे कोटावर ते फिरतात आणि त्याजमध्यें उपद्रव व कष्ट आहेत

११ त्याजमध्यें अरिष्टें आहेत त्याचे आळींतून अभिमर्द व कपट निघून जात नाहींत

१२ कारण ज्यानें मला निंदिलें तो वैरी नव्हता असता तर म्यां सोशिलें असतें मजवर ज्यानें आपलें महत्व मिरविलें तो माझा द्वेषी नव्हता असता तर त्याजपासून मी लपालों असतों

१३ पण तूंच जो माझा मित्र माझा स्नेही व माझा ज्ञाति असस तो

१४ आह्मी एकत्र मधूर संमंत्रण करीत असों देवाचे घरास संगतीं चालत असों

१५ त्यांजवर अवमर्द्द येतील तें जीवंत असून नरकांत उतरतील कारण त्यांचे वस्तींत त्यांजमध्यें दुष्टपण आहे

१६ मीच देवाला प्रार्थना करीन आणि ईश्वर मला तारील

१७ सांजे व सकाळीं व दुपारीं मी विनंती करितांना ओरडेन तेव्हां माझा शब्द तो ऐकेल

१८ मजला प्रतिकूल जी लढाई होती तिजपासून त्यानें माझा जीव सलामत मुक्त केला आहे कां मजशीं बहुत होते

१९ देव जो अनादिकालापासून राहतो तो ऐकून त्यांस पीडील त्यांजला विकार होत नाहींत ह्मणून ते देवाला भीत नाहींत



२० त्याशीं स्वास्थ्य जे राखीत होते त्यांजवर त्यानें आपले हात लांब केले आहेत त्यानें आपली संधि मोडिली आहे

२१ त्याचीं वाक्यें नवनीतापेक्षां स्निग्ध असून त्याचे मनांत युद्ध होतें तेलापेक्षां त्याचे शब्द मृदु असून नागव्या तरवारी असे होते

२२ तूं आपला भार ईश्वरावर टाक ह्मणजे तो तुझें पाठबळ करील तो कधीं सात्विकाला ध्वस्त होऊं देणार नाहीं

२३ पण हे देवा तूं त्यांला नाशाचे खांचेंत उतरिशील घातक व कपटी मनुष्यें आपलें अर्धायुष्य वांचणार नाहींत पण मी तुजवर भाव ठेवीन

## महिन्याचा अकरावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ५६

१ हे देवा मजवर मनुष्य तोंड वासितो म्हणून मजवर दया कर तो प्रतिदिवशीं युद्ध करून मला पीडितो

२ मशीं बहुत गर्वानें लढतात ह्मणून सारादिवस माझे शत्रु तोंड वासतात

३ जेव्हां मला भय लागेल तेव्हां तुजवर विश्वासेन

४ त्याचे वचनामुळें मी देवाविषयीं गौरव मानीन

देवावर मी विश्वासतों मी भिणार नाहीं मला मनुष्य काय करील

५ ते सारादिवस माझे अर्थांविषयीं मला गांजितात मजविषयींचे त्यांचे सर्व संकल्प अरिष्टार्थ आहेत

६ ते एकच मिळून लपतात माझे जीवास जे टपतात त्यांजप्रमाणे ते माझें पावलास जपतात

७ दुष्टपणांत त्यांला मुक्ति होईल काय हे देवा असले लोक ध्वस्त कर

८ माझीं भ्रमणें तूं गणितोस तूं आपले कुपींत माझीं आंसवें घाल तुझे वहींत तीं नाहींत काय

९ जेव्हां मी प्रार्थना करीन तेव्हां माझे वैरी पराङ्मुख होतील हें मी जाणतों कां देव मजकडे आहे

१० त्याचे वचनामुळें मी देवाविषयीं गौरव मानीन त्याचे वचनामुळें ईश्वराविषयीं गौरव मानीन

११ देवावर मी विश्वासलों आहें मी भिणार नाहीं मनुष्य मला काय करील

१२ हे देवा तुझे नवस मजकडे आहेत मी तुला स्तुति फेडीन

१३ कारण तां माझा जीव मरणापासून सोडविला आहे जीवंतांचे प्रकाशांत देवासमोर म्यां वर्त्तावें ह्मणून धक्यापासून माझे पाय रक्षणार नाहींस काय

## गीत ५७

१ हे देवा माझा जीव तुझा आश्रय धरितो म्हणून मज



वर दया कर आणि ह्या आपदा टळून जातपर्यंत तुझे पक्षच्छायेचा आश्रय मी धरीन

२ परात्पर देवाला देव जो मसाठीं सर्व साधितो त्याला मी आह्वति करीन

३ तो आकाशांतून पाठवून मला तारील जो मजवर तोंड वासतो त्यानें निंदा केली आहे देव आपली दया व सत्यता पाठवून देईल

४ माझा जीव सिंहांमध्यें आहे ज्यां कठोर नीच मनुष्यांचे दांत भाले व बाणच आहेत आणि ज्यांची जिव्हा तीक्ष्ण तरवारच आहे त्यांमध्यें मी निजतो

५ हे देवा आकाशावरतों तूं उंचावला जा तुझें गौरव सर्व पृथ्वीवर असो

६ माझे पायांसाठीं त्यानीं जाळें मांडिलें आहे माझा जीव दुणून गेला आहे मजपुढें त्यानीं खांच खाणिली तींत तेच पडले आहेत

७ माझें मन स्थिर आहे हे देवा माझें मन स्थिर आहे मी गाऊन स्तवन करीन

८ हे माझे गौरवा जागृत हो अहो वीणा व चंग हो जागे व्हा मीहि पहांटेस जागा होईन

९ हे प्रभो लोकांमध्यें तुला स्तवीन समुदायांमध्यें तुला गाईन

१० कां तर आकाशापर्यंत तुझी दया व आभाळापर्यंत तुझी सत्यता थोर आहे

११ हे देवा आकाशावरतीं तूं उंचावला जा आणि तुझें गौरव सर्व पृथ्वीवर असो

## गीत ५८

१ अहो मनुष्यांनों निश्चयें तुह्मी अवाचतः न्याय सांगतां काय तुह्मी यथार्थतः न्यायाधीशी करितां काय

२ होय तुम्ही मनःपूर्वक अन्याय करितां पृथ्वींत तुम्ही आपले हातांचा बलात्कार तोलून देतां

३ गर्भस्थानापासून दुष्ट फितततात जन्मापासून असत्य बोलत असतां बहकतात

४ त्यांचें विष सर्पाचे विषासारिखें आहे जो बहिरा जोगी सर्प आपला कान झांकितो

५ जो गारुड्याचा निपुण गारुड्याचाहि शब्द ऐकत नाहीं त्यासारिखे ते आहेत

६ हे देवा त्यांचे मुखांतले दांत पाड हे ईश्वरा सिंहां च्या दाढा पाडून टाक

७ जें पाणी वाहून जातें त्यावाणीं ते विघरतील त्यानें आपले तीर जसे चुकतील तसे मारावे

८ जशी गोगलगाय चिघळत्ये तसा तो नाहींसा होवो स्त्रियेचे ज्या पतित गर्भानें सूर्य पाहिला नाहीं तसा

९ कंटकवृक्षास तुमचे कंटक विशिष्ट करितील त्यापूर्वीं जसी झळ कोंवळ्यास तसे त्याला तो उडवील



१० सात्विक प्रतिकार पाहील तेव्हां हर्षेल दुष्टाचे रक्तांत तो आपले पाय धुवील

११ आणि मनुष्य म्हणेल निश्चयें सात्विकास फल आहे निश्चयें देव आहे जो पृथ्वींत न्यायाधीशी करितो

सकाळची प्रार्थना

## गीत ५९

१ हे देवा माझे वैऱ्यांपासून मला मुक्त कर जे मजवर उठतात त्यांपासून मला उद्धर

२ दुष्कर्म्यांपासून मला सोडीव आणि घातकांपासून मला तार

३ कां तर हे ईश्वरा पहा माझा अपराध आणि माझें पातक नसतां माझे जीवास ते लपून टपतात बलात्कारी मजवर जमतात

४ माझा अन्याय नसतां ते धावून व्यूढ होतात माझें साहाय्य करायास तूं जागा हो आणि पहा

५ तूं तर हे ईश्वरा सैन्यांचे देवा इस्राएलाचे देवा सर्व विधर्म लोकांचें शासन करायास जागा हो कोणत्यांहि दुष्ट विश्वासहीनांस प्रसन्न होऊं नको

६ रात्रीं ते माघारे येतात कुत्र्यांवाणीं कैंकतात आणि नगराभोंवते फिरतात

७ पहा ते आपले मुखानें वाईट उद्गारितात त्यांचे ओंठांत तरवारी आहेत कां कोण ऐकतो असें ह्मणतात

८ पण हे ईश्वरा तूं त्यांला हांसशील तूं सर्व विधर्मं
लोकांस धिक्कारिशील

९ त्याचे बलामुळें मी तुझी आशा धरीन कां तर
देव माझा आश्रय आहे

१० माझा दयालु देव मजपुढें येईल देव मला माझे
शत्रु पाहूं देईल

११ त्यांस जिवें मारूं नको मारशील तर माझे लोक
विसरतील तूं आपले बलानें त्यांची दाणादाण कर आणि
हे प्रभो आमचे वारणा त्यांस ध्वस्त कर

१२ त्यांचे मुखाचे पापामुळें त्यांचे ओंठांचे वाक्यांमुळें
व जो शाप व जें असत्य ते बोलतात त्यांमुळेंहि ते आपल्या
गर्वांत धरिले जावे

१३ तूं क्रोधानें नाश कर कर नाश आणि ते नाहींसे
होवोत व देव याकोबांत राज्य करितो असें पृथ्वीचे सीमा
पर्यंत लोक जाणोत

१४ तर रात्रीं ते माघारे येतात कुत्र्यांवाणीं केंकतात
आणि नगराभोंवते फिरतात

१५ ते खायला फिरतात आणि जर तृप्त होत नाहींत
तर गुरगुरतात

१६ पण मी तुझे सामर्थ्याविषयीं गाईन आणि पहां
टेस तुझे दयेविषयीं उच्चस्वरानें गाईन कारण माझे संकटाचे
दिवसीं तूं माझा आश्रय व माझें शरण झाला आहेस



१७ हे माझे सामर्थ्या तुला मी गाईन कारण देव
माझा आश्रय आणि माझा दयालु देव आहे

## गीत ६०

१ हे देवा त्वां आमचा वीट मानिला आहे त्वां आह्मास
विखरिलें आहे तूं रुष्ट झाला आहेस आह्माजवळ फिरून ये

२ त्वां पृथ्वी कांपविली आहे ती त्वां मोडिली आहे
तिचे भंग यथास्थित कर कां ती विधूनित झाली आहे

३ त्वां आपले लोकांस दुर्दशा पाहूं दिली आहे त्वां
आह्मास विस्मयाचा रस प्यायास दिला आहे

४ सत्याकरितां ध्वज उभारावा ह्मणून तो त्वां आपले
भक्तांस दिला आहे

५ तुझे प्रियलोक मुक्त व्हावे ह्मणून तूं आपले उजवे
हातानें तार व माझें ऐक

६ देव आपले पवित्रतेनें बोलिला आहे मी उल्लासेन
मी शेकेम वांटीन व सुक्कोथाचें खोरें मोजून देईन

७ गिलअद माझा आहे व मेनश्शे माझा आहे व
एफ्राईम माझें मुख्य सामर्थ्य आहे यहूदा माझा नियम
कर्त्ता आहे

८ मोआब माझें क्षालनपात्र आहे एदोमावर मी आपलें
खेटर फेंकीन अगे फिलेशेथे मजकरितां तूं उत्साह कर

९ मला कोटविशिष्ट नगरांत कोण नेईल एदोमांत
मला कोण घेऊन जाईल

१० हे देवा त्वां आमचा वीट मानिला नाहीं काय हे देवा तूं आमचे सैन्यांसंगतीं बाहेर जाणार नाहींस काय

११ संकटांतून निघावें ह्मणून आह्मास साहाय्य कर कां तर मनुष्यांचें साहाय्य व्यर्थ आहे

१२ देवाकडून आह्मी पराक्रम करूं आणि तोच आमचे शत्रु तुडवील

## गीत ६१

१ हे देवा माझें आक्रंदन ऐक माझे प्रार्थनेकडे मन लाव

२ पृथ्वीचे सीमेपासून तुला मी आरोळी करीन माझें मन व्याकुल असतांना मजवरतीं उंच जो पर्वत त्याकडे मला ने

३ कां तूं माझा आश्रय आणि वैऱ्यांपासून सुदृढ दुर्ग होस

४ तुझे मंडपांत मी सदा राहीन तुझे पक्षाच्छादनाचा आश्रय मी धरीन

५ कां तर हे देवा त्वां माझे नवस ऐकिले आहेत तुझे नामाचे भक्तांशीं त्वां मला विभाग दिला आहे

६ राजांचें आयुष्य दीर्घ करिशील त्याचीं वर्षें बहुत पिढ्यांप्रमाणें वाढविशील

७ देवासमोर तो सदा राहील दयेनें व सत्यतेनें त्यास रक्षावें म्हणून आज्ञा दे



८ तेव्हां म्यां आपले नवस फेडावे म्हणून तुझें नाम मी निरंतर गाऊन वर्णीन

## महिन्याचा बारावा दिवस

### सकाळची प्रार्थना.

## गीत ६२

१ हे माझे जीवा केवळ देवाची आशा धरावी त्याकडून माझा उद्धार होतो

२ तोच मात्र माझा पर्वत व माझें तारण आहे तो माझा आश्रय आहे म्हणून मी फार विव्हल होणार नाहीं

३ एका मनुष्यावर कोठपर्यंत तुह्मी खडखडवाल जसे तोललेल्या भिंतीस अथवा कोसळत्या कुपणास तसे तुह्मी सर्व बडवितां

४ तथापि त्याचे थोरपणापासून त्याला पाडायास ते संमंत्रण करितात असत्य त्यांस आवडतें ते आपले मुखानें आशीर्वाद देतात परंतु आपल्या मनांत शापितात

५ हे माझे जीवा केवल देवाची प्रतीक्षा कर कां तर त्याजपासूनच माझा आशार्थ येईल

६ तोच मात्र माझा पर्वत व माझें तारण आहे तो माझा आश्रय आहे ह्मणून मी विव्हल होणार नाहीं

७ देवाचे ठायीं माझें तारण व माझें गौरव आहे माझा सुदृढ पर्वत व माझा आश्रय देवाचे ठायीं आहे

८ अहो लोक हो त्याजवर तुह्मी सर्वकाळ विश्वास ठेवा त्यासमोर तुम्ही आपलें मन ओता देव आमचा आश्रय आहे

९ निश्चयें नीच मनुष्यें व्यर्थपण व थोर मनुष्यें असत्य पणच आहेत तीं घटांत तोलिली असतां व्यर्थपणापेक्षां केवल हलकीं आहेत

१० बलात्कारावर विश्वासूं नका व हरणाविषयीं गेपरूं नका जरीं धन वाढतें तरीं तें मानूं नका

११ एकदां देव बोलिला आहे दोनदां हें म्यां ऐकिलें आहे कीं देवाला सामर्थ्य आहे

१२ आणि हे प्रभो तुला कृपा आहे कारण प्रत्येक मनुष्याला त्याचे कर्माप्रमाणें तूं परत देशील

## गीत ६३

१ हे देवा तूं माझा देव आहेस फार इच्छा धरून मी तुला शोधितों शुष्क व रूक्ष निर्जल भूमींत माझा जीव तृषतो माझा देह तुसाठीं ग्लान झाला आहे

२ जसें पवित्र स्थानांत म्यां तुला अवलोकिलें आहे तसें तुझें ऐश्वर्य्य व तुझें गौरव पहावें ह्मणून

३ जीवनापेक्षां तुझी कृपा उत्तम आहे यास्तव माझे ओंठ तुला स्तवितील

४ असेंच यावज्जीवन मी तुला सुवंदित म्हणेन तुझे नामानें मी आपले हात उभारीन



५ मज्जेनें व मेदानें असा माझा जीव तृप्त होईल व उच्च स्वरयुक्त ओंष्ठानीं माझें मुख स्तवन करील

६ जेव्हां मी आपले मंचकावर तुला स्मरतों व रात्रींचे प्रहरांत तुझें ध्यान करितों तेव्हां

७ तूं माझें साहाय्य असस ह्मणून तुझे पक्षच्छायेंत मी उत्सव करीन

८ माझा जीव तुला चिकटतो तुझा उजवा हात मला संभाळो

९ पण जे माझे जीवास टपतात ते नाशास जातील ते पृथ्वीखालचे स्थानांत शिरतील

१० त्यांला शत्रु तरवारीनें पीडितील ते शृगालांस आहारार्थ होतील

११ पण राजा देवाविषयीं हर्षेल जो कोणी त्याची शपथ वाहतो तो गौरव मानील परंतु जे असत्य बोलतात त्यांचें मुख बंद केलें जाईल

## गीत ६४

१ हे देवा मी विनंती करितांना माझा शब्द ऐक वैऱ्याचे भयापासून माझें आयुष्य रक्ष

२ द्रोहकांचे संमंत्रणापासून व दुष्कर्म्यांचे धुंदाईपासून मला आच्छादित कर

३ ते आपली जिव्हा तरवारीसारिखी तीक्ष्ण करितात ते आपले तीर ह्मणजे कडूशब्द मारितात

४ सात्विकास गुप्तरूपें मारायाला ते अकस्मात तीर मारितात आणि भीत नाहींत

५ दुष्कर्मांत ते धैर्य धरितात पाश मांडावे म्हणून संमंत्रण करितात आम्हास कोण पाहील असें ह्मणतात

६ ते अन्याय शोधितात पक्का शोध समाप्त करितात प्रत्येकाचें अंतर्याम आणि हृदय खोलच आहे

७ पण देव त्यांला अकस्मात तीर मारील त्यांचीं क्षतें पडतील

८ तेव्हां ते आपली जिव्हा आपल्यावर पडूं देतील त्यांस जे पाहतील ते सर्व पळतील

९ तेव्हां सर्व मनुष्यें भितील आणि देवाचें कर्म प्रकट करितील व त्याचें कार्य्य ध्यानांत आणितील

१० ईश्वराविषयीं सात्विक हर्षेल आणि त्याचा आश्रय धरील व जे यथार्थ मनाचे ते सर्व गौरव मानितील

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ६५

१ हे देवा तुला जीयोनेंत आदर व स्तवन आहेत आणि तुला नवस फेडिला जाईल

२ जो तूं प्रार्थना ऐकणारा आहेस त्या तुजवळ सर्व मनुष्यें येओत

३ मजवर पातकें प्रभूत होतात आमचे अपराधांचें प्रायश्चित्त तूंच करिशील



४ त्यानें तुझे अंगणांत रहावें ह्मणून ज्याला तूं निवडून आसन्न होऊं देतोस तो धन्य आहे तुझे घरचे तुझे मंदिराचे गाभाऱ्याचे उत्तम अर्थानें आम्ही तृप्त होऊं

५ हे आमचे उद्धारक देवा भूमिसमुद्रांचे दूर सीमांचे आश्रया न्यायेंकडून तूं आह्माला आश्चर्य्यंत:उत्तर देतोस

६ जो शक्तीनें वेष्टित असतां आपले सामर्थ्यानें पर्वत स्थिर स्थापितो

७ तो जलाशयाची गर्जना त्याचे लाटांची गर्जना व लोकांची धुंदाई शांतवितो

८ जे अंत्य सीमांवर राहतात ते तुझे उत्पातांस भितात उदय व अस्त तूं उत्सवयुक्त करितोस

९ तूं पृथ्वीस आसन्न होतोस व तिला पुष्कळपणें पाणी घालितोस देवाचे जलपूर्ण ओघांहून ती रसभरित करितोस अशी तिला सिद्ध करून तूं त्यांचें धान्य सिद्ध करितोस

१० तिचे दंड तूं शिंपितोस तिचीं तासें खचवितोस सुवृष्टीनें तिला मृदु करितोस तिचे रुझवणाला आशी देतोस

११ तूं आपल्या उपकारानें वर्ष समापन्न करितोस आणि तुझीं सर्व वर्तनें मेद गाळितात

१२ तीं रानांतले कुरणांवर वृष्टि गाळितात आणि डोंगर उल्लास वेष्टितात

१३ पटांगणें कळपानीं झांकिलीं व खोरीं धान्यानें आच्छादिलीं आहेत तीं उत्साह करितात आणि गातात

## गीत ६६

१ अहो सर्व पृथ्वींतले लोक हो देवाला उत्साहशब्द करा

२ त्याचे नामाचें गौरव तुह्मी गाऊन वर्णा त्याची स्तुति गौरव अशी करा

३ तूं आपले कामांकडून किति भयंकर आहेस असें देवाला ह्मणा तुझे महाबलेंकडून तुझे वैरी तुला वश्य होतील

४ सर्व पृथ्वींतले लोक तुला भजतील आणि तुला गातील ते तुझें नाम गाऊन वर्णितील

५ अहो या आणि देवाचीं कर्मे पहा तो आपल्या कार्यानें मनुष्यांस भयंकर आहे

६ त्यानें समुद्र शुष्कभूमि करून पालटिला जलाशयांतून ते पायानीं चालले तेथें आम्ही त्याजविषयीं हर्षलों

७ तो आपल्या पराक्रमानें सदा राज्य करितो त्याचीं नेत्रें लोकांला जपून पाहतात दुष्कर्म्यांनीं आपलें महत्व मिरवूं नये

८ अहो लोक हो आमचे देवास सुवंदित ह्मणा व त्याचे स्तवनाचा शब्द गाजवा

९ त्यानें आमचे जीव जन्मांत घातले आणि आमचे पाय त्यानें सरूं दिले नाहींत

१० कां तर हे देवा त्वां आम्हास पारखिलें रूपें गाळण्या प्रमाणें त्वां आम्हास गाळून पाहिलें

११ त्वां आह्माला जाळ्यांत आणिलें त्वां आमचे कटीस पीडा लाविली



१२ त्वां मनुष्यांला आमचे डोईवर आरूढ होऊं दिलें आम्ही अग्नींतून व जलांतून गेलों नंतर त्वां आह्मास समृद्धींत बाहेर आणिलें

१३ मी अग्निष्टोम घेऊन तुझे मंदिरांत जाईन तुला मी आपले नवस फेडीन

१४ जे माझे संकटांत माझे ओंठानीं उच्चारिले व माझे तोंडानें सांगितले ते

१५ पुष्ट पशूंचे अग्निष्टोम मेषांचे मेदोधूपसहित मी तुला अर्पीन वृष व अज मी अर्पीन

१६ अहो जे तुह्मी देवास भितां ते या ऐका व त्यानें जें माझे जीवासाठीं केलें आहे तें मी सांगेन

१७ त्याला मी आपले मुखानें आरोळी केली व माझे जिव्हेंत उच्चस्वर होता

१८ जर मी आपले मनांत पाप प्रिय मानितों तर प्रभु माझें ऐकणार नाहीं

१९ पण देवानें ऐकिलेंच आहे त्यानें माझे प्रार्थनेचे शब्दाकडे मन लाविलें आहे

२० ज्या देवानें माझी प्रार्थना सारिली नाहीं व आपली कृपा मजपासून काढिली नाहीं तो सुवंदित असावा

## गीत ६७

१ देवानें आम्हावर दया करावी आणि आह्मास आशी द्यावी त्यानें आपलें मुखतेज आह्मावर पडूं द्यावें

२ अशासाठीं कीं सर्व पृथ्वींत तुझा मार्ग सर्व लोकांत तुझा उद्धार कळावा

३ हे देवा लोक तुझी स्तुति करोत सर्व लोक तुझी स्तुति करोत

४ लोक हर्षात व उत्सव करोत कारण तूं लोकांचा न्याय यथार्थपणें करिशील व पृथ्वींतले लोकांची नीति करिशील

५ हे देवा लोक तुझी स्तुति करोत सर्व लोक तुझी स्तुति करोत

६ भूमि आपलें फल देईल आणि देव आमचा देव आह्मास आशी देईल

७ देव आह्मास आशी देईल व पृथ्वीच्या सर्व सीमा त्याचें भय धरितील

## महिन्याचा तेरावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ६८

१ देव उठावा त्याचे वैरी विखरले जावोत व त्याचे द्वेषी त्याजपुढें पळोत

२ जसा धूर उडविला जातो तसे त्यांला उडीव जसें मेण अग्नीपुढें चिघळतें तसे दुष्ट देवापुढें नष्ट होवोत

३ परंतु सात्विक हर्षोत देवापुढें उल्लासोत आणि हर्ष करून आनंदोत



४ तुम्ही देवाला गा त्याचें नाम गाऊन वर्णा जो आरूढ होऊन आपलें नाम याह यानें पटांगणावर चालतो त्यासाठीं मार्ग सिद्ध करा व त्याजपुढें उल्लासा

५ देव आपले पवित्रस्थानांत पोरक्यांचा बाप व विधवांचा न्यायाधीश आहे

६ देव अनाथांस कुटुंबांत वसवितो बंदीवान समृद्धींत बाहेर आणितो पण दुष्कर्मी रूक्ष भूमींत राहतील

७ हे देवा जेव्हां तूं आपले लोकांपुढें बाहेर गेलास आणि रानांत प्रस्थान केलेंस

८ तेव्हां भूमि कांपली व देवासमोर आकाशानें गलन केलें देवासमोर इस्रएलाचे देवासमोर हा सीना पर्वत कांपला

९ हे देवा तां सुवृष्टि पाठवून दिली तेव्हां जें तुझें क्षेत्र ग्लान झालें होतें तें तां सुस्थित केलें

१० त्यांत तुझा समुदाय राहिला हे देवा तां आपला उपकार दीनासाठीं सिद्ध केला आहे

११ प्रभूनें वाक्य दिलें तेव्हां उपदेशक महासैन्य झालें

१२ सैन्यांचे राजे पळून गेले व जी घरीं राहिली तिनें प्राप्तहार वांटिला

१३ जरीं तुम्ही कोंडवाडींत निजलां तरीं ज्या कपोताचे पक्ष रूप्यमंडित आणि त्यांचीं पिसें सुपिंगल सुवर्ण मंडित आहेत त्यासारिखे व्हा

१४ जेव्हां त्यांत देवानें राजे विखरिले तेव्हां जल्मो नासारिखें तें पांढरें झालें

१५ बाशान पर्वत उंच पर्वत आहे बाशान पर्वत वज्र कूट पर्वत आहे

१६ अहो वज्रकूट पर्वत हो तुह्मी मत्सर कां करितां याच पर्वतावर देवानें वस्ती करायास इच्छिलें आहे याज वरच ईश्वर सदा राहील

१७ देवाचे रथ वीस सहस्त्र गुणित सहस्त्र आहेत जसा सीनावर पवित्रस्थानांत तसा प्रभु त्यांत आहे

१८ तूं वरतीं चढलास त्वां बद्धांस बांधून नेलें आणि ईश्वर देव त्यांमध्यें रहावा ह्मणून त्वां मनुष्यांसाठीं फितले ल्यांसाठींहि दानें घेतलीं आहेत

१९ प्रभु जा नित्य आह्मावर उपकारांचा भार घालितो जो आमचा उद्धारक देव आहे तो सुवंदित असावा

२० जो आमचा देव तो उद्धारक देव आहे आणि देव जो प्रभु त्याचे सत्तेंत मरणनि:सरणें आहेत

२१ पण देव आपले वैऱ्यांचे मस्तक मोडील जो आपले अपराधांत वर्त्ततो त्याची केशयुक्त शिखा मोडील

२२ प्रभु ह्मणाला बाशानापासून मी परत आणीन समुद्राचे खोल स्थानापासून परत आणीन

२३ अशासाठीं कीं त्वां आपला पाय रक्तांत बुचकळावा तुझे कुत्र्यांचे जिभेचा वांटा वैऱ्यांपासून होईल



२४ हे देवा तुझ्या यात्रा पवित्रस्थानांत माझे देवाच्या माझे राजाच्या यात्रा त्यानीं पाहिल्या आहेत

२५ पुढें गाणारें मागें वाजविणारे चालले मध्यें कन्या टाळ वाजवीत चालला

२६ समुदायांत देवाला सुवंदित ह्मणा इस्राएलाचे उद्गमापासून प्रभूला सुवंदित म्हणा

२७ तेथें लाहान बिन्यामीन व त्यांचा अधिकारी यहू दाचे अधिपति आणि त्यांचा परिवार जबूलूनाचे अधि पति व नफ्तालीचे अधिपति आहेत

२८ तुझे देवानें तुझें सामर्थ्य नेमून दिलें आहे हे देवा ज्या त्वां आम्हासाठीं काम साधिलें आहे तो तूं आपलें सामर्थ्य दाखीव

२९ येरूशालेमेस जें तुझें मंदिर त्यामुळें राजे तुला दानें आणितील

३० नलवनांतले पशु वृषभांचा सार्थ लोकांचे वत्सस हित यांस तूं धमकाव प्रत्येक रूप्यखंडें आणून पायां पडेल ज्यां लोकांस युद्ध आवडतें त्यांला त्यानें विखरिलें आहे

३१ मिज्राईमांतून अधिपति येतील कूश आपलें द्रव्य देवाकडे वाहवील

३२ अहो पृथ्वींतलीं राज्यें हो तुह्मी देवाला गा प्रभूला गाऊन स्तवन करा

३३ जो परमपुरातन आकाशावर आरूढ होऊन चालतो त्याला पहा तो आपला शब्द पराक्रमी शब्द उच्चारितो

३४ देवाला समर्थ म्हणा इस्राएलावर त्याचें ऐश्वर्य्य व आकाशांत त्याचें गौरव आहे

३५ हे देवा तूं आपले पवित्रस्थानांतून भयंकर आहेस जो लोकांस बल व सामर्थ्य देतो तो इस्राएलाचा देव आहे देव सुवंदित असावा

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ६९

१ हे देवा मला तार कारण जीवास पाणी पोंचलें आहे

२ ज्यांत स्थिर स्थल नाहीं त्या खोल चिखलांत मी रुतलों आहें मी खोल पाण्यांत आलों आहें आणि प्रवाह मला बुडवितो

३ आरोळी करितां करितां मी थकलों आहें माझा गळा शोषला आहे मी आपले देवाची प्रतीक्षा करितांना माझे डोळे धुंद झाले आहेत

४ माझे एरव्हींचे वैरी माझे डोईचे केशांपेक्षां बहुत आहेत जे वृथा माझे वैरी असतां मला नाशितात ते पुष्कळ आहेत तेव्हां जें म्यां हरलें नाहीं तें म्यां परत दिलें

५ हे देवा तूं माझें मूर्खपण जाणतोस आणि तुज पासून माझे अपराध लपाले नाहींत

६ हे प्रभो सैन्यांचे देवा जे तुझी आशा धरितात त्यानीं मजकरितां लज्जित होऊं नये हे इस्राएलाचे देवा जे तुला शोधितात त्यानीं मजमुळें ओशाळूं नये



७ कां तर तुजकरितां म्यां निंदा सोशिली आहे लज्जेनें माझें मुख वेष्टिलें आहें

८ मी आपले भाव्वांस विदेशी व आपले आईचे लेंकांस परकीय झालों आहें

९ तुझे घराविषयींचे उत्सुकतेनें मला ग्रासिलें आहे आणि तुला जे निंदितात त्यांच्या निंदा मजवर पडल्या आहेत

१० जेव्हां मी आपले उपोषणांत रडलों तेव्हां तेंच माझे निंदार्थ झालें

११ जेव्हां म्यां आपलें वस्त्र गोणताट केलें तेव्हां त्यांस मी म्हणसा झालों

१२ जे वेशीवर बसतात ते मजविषयीं संलाप करितात आणि मद्यप्यांचें गीतच मी झालों आहें

१३ पण हे ईश्वरा प्रसन्नतेचे वेळेस तुजपुढें माझी प्रार्थना आहे हे देवा तूं आपले परमकृपेनें आपले उद्धारक सत्यतेनें मला उत्तर दे

१४ म्यां रुतूं नये म्हणून चिखलांतून मला सोडीव म्यां आपले वैर्यांपासून व खोल पाण्यांतून मुक्त व्हावें

१५ जलप्रवाहानें मला बुडवूं नये अथाक पाण्यानें मला गिळूं नये व खांचेनें आपलें तोंड मजवर झांकूं नये

१६ हे ईश्वरा तुझा प्रसाद उत्तम आहे म्हणून मला उत्तर दे तूं आपले परमकरुणाप्रमाणें मजकडे वळ

१७ तूं आपलें मुख आपले सेवकापासून आच्छादूं नको मी संकटांत आहें ह्मणून त्वरेनें मला उत्तर दे

१८ माझे जीवास आसन्न होऊन त्याला मुक्त कर माझे वैऱ्यांमुळें मला उद्धर

१९ माझी निंदा व माझी लज्जा व माझा अनादर तूं जाणतोस तुजसमक्ष माझे सर्व शत्रु आहेत

२० निंदेनें माझें मन भग्न केलें आहे व मी विषण्ण झालों आहें म्यां कळवळ्याची प्रतीक्षा केली पण कांहीं नव्हता आणि सांत्वकांची केली परंतु कोणी सांपडेना

२१ त्यांनीं अन्नाचे स्थानीं मला कटु दिला आणि मी तृषित असतांना त्यांनीं मला अम्ल प्यायास दिला

२२ त्यांजपुढें त्यांचें मेज पाशसें व्हावें आणि स्वस्थांस तें सांपळासें व्हावें

२३ त्यांला दिसूं नये म्हणून त्यांचे डोळे अंधळे व्हावे आणि सर्वदा त्यांची कटी कांपीव

२४ तूं आपला कोप त्यांजवर ओत व तुझा संतप्त क्रोध त्यांला लागो

२५ त्यांची वाडी ओसाड पडावी आणि त्यांचे डेऱ्यांत कोणी राहणारा नसो

२६ कां तर जो त्वां हाणिला त्याचे पाठीस ते लाग तात व जे त्वां क्षणिले त्यांस पीडायला प्रलाप करितात

२७ त्यांचे अन्यायास अणखी अन्याय लाव आणि तुझें पुण्य ते न पावोत



२८ जीवंतांचे वहींतून ते खोडिले जावे आणि साल्विकां सहित ते लिहिले न जावोत

२९ मी तर दीन व शोकार्त्त आहें हे देवा तुझे उद्धा रानें मला उंचावावें

३० देवाचें नाम मी गाऊन स्तवीन व उपकारस्तुती करून त्याला थोर ह्मणेन

३१ आणि हीच वृषापेक्षां शृंगसंपन्न खोंडापेक्षां ईश्व राला मान्य होईल

३२ दीन हें पाहून हर्षतील जे तुम्ही देवाला शोधितां त्यां तुमचें हृदय जीवयुक्त राहील

३३ कां तर ईश्वर दरीद्र्यांचें ऐकतो आणि आपले बंदीवान तुच्छ मानीत नाहीं

३४ आकाश व पृथ्वी त्याला स्तवोत समुद्र व जें त्यांत फिरतें तें

३५ कारण देव जीयोन तारील आणि यहूदांचीं नगरें बांधील तेव्हां लोक तेथें राहतील व तिचें क्षेत्रधारण करितील

३६ तींतहि त्याचे सेवकांचे वंश विभाग धरितील व त्याचें नाम जे प्रिय मानितात ते तींत वस्ती करितील

## गीत ७०

१ हे देवा मला मुक्त करायास हे ईश्वरा मला साहाय्य करायास त्वरा कर

२ जे माझे जीवास टपतात ते लाजोत व ओशाळोत माझें अरिष्ट जे इच्छितात ते पराङ्मुख व विमनस्क होवोत

३ जे अहा अहा ह्मणतात ते आपले लज्जेकरितां मागें हटोत

४ जे तुला शोधितात ते सर्व तुजविषयीं आनंदोत व हर्षोत आणि तुझें तारण जे प्रिय मानितात ते देव थोर मानिला जावा असें नित्य म्हणोत

५ मी तर दीन व दरिद्री आहें हे देवा मजसाठीं त्वरा कर माझें साहाय्य व माझा मुक्तिकर्त्ता तूंच आहेस हे ईश्वरा उशीर करूं नको

## महिन्याचा चौदावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ७१

१ हे ईश्वरा मी तुझा आश्रय धरितों मी कधीं लज्जित होऊं नये

२ तूं आपले न्यायेंकडून मला सोडीव आणि मला मुक्त कर तूं आपला कान मजकडे लावून मला तार

३ नित्य आंत जायासाठीं तूं मला आश्रयाचा खडक हो मला तारायास त्वां आज्ञा दिली आहे कारण तूं माझा कडा व माझें दुर्गच आहेस

४ हे माझे देवा दुष्टाचे हातापासून अन्याय्याचे व निर्दयाचे मुष्टीपासून मला मुक्त कर



५ कारण तूं माझा आशाविषय आहेस हे प्रभो देवा माझे बालपणापासून तूं माझा भावविषय आहेस

६ गर्भस्थानापासून मी तुजवर टेंकत आलों आहें माझे आईचे उदरापासून तूं माझा उपकारी आहेस तुजविषयीं माझें स्तुतिकरण नित्य होईल

७ बहुतांस मी आश्चर्य झालों आहें पण तूं माझा सुदृढ आश्रय आहेस

८ सारादिवस तुझे स्तुतीनें व तुझे प्रशंसेनें माझें मुख भरलें जाईल

९ वृद्धपणाचे समयीं मला टाकूं नको माझी शक्ति थकेल तेव्हां मला नको सोडूं

१० कारण माझे वैऱ्यानीं मजविषयीं संभाषण केलें व जे माझे जीवाविषयीं टपतात त्यानीं संमंत्रण केलें आहे

११ कीं देवानें त्याला सोडिलें आहे त्याचे पाठीस लागून त्याला धरा कांकीं मुक्तिकर्त्ता कोणी नाहीं

१२ हे देवा मजपासून दूर होऊं नको हे माझे देवा माझे साहाय्यासाठीं त्वरा कर

१३ जे माझे जीवास बाधतात ते विमनस्क होऊन नाश पावतील जे माझे उपद्रवास झटतात ते निंदेनें व अनादरानें वेष्टिले जातील

१४ पण मी नित्य आशा धरीत जाईन व तुझी स्तुति अणखी अधिक करीत जाईन

१५ सारादिवस माझें मुख तुझे न्यायाचें व तुझे तार

णाचें कथन करील कां त्यांची गणती मला कळत नाहीं
१६ प्रभु जो देव त्याचे सामर्थ्यानें चालेन तुझें तुझेंच मात्र न्यायाची मी प्रशंसा करीन
१७ हे देवा माझे बालपणापासून तूं मला शिकवीत आला आहेस आणि आजपर्यंत मी तुझीं आश्चर्यकर्मे वर्णीत आलों आहें
१८ तर वृद्धपण व केशशुक्लत्व यांतहि हे देवा मला सोडूं नको यापिढीला तुझें सामर्थ्य प्रत्येक भविष्य पिढीला तुझा पराक्रम मी वर्णीपर्यंत
१९ हे देवा तुझा न्याय परात्पर आहे ज्या त्वां महा कार्यें केलीं आहेत त्या तुजसारिखा हे देवा कोण आहे
२० जो तूं मोठें व भारी कष्ट मला भोगूं दिलेस तो तूं फिरून मला वांचविशील आणि भूमीचे खोल स्थलांतून मला फिरून वरतीं आणिशील
२१ तूं माझें महत्व वाढविशील व सभोंवतीं माझें सांत्वन करिशील
२२ हे देवा तुला व तुझे सत्याला मी वीणा वाजवून स्तवीन हे इस्राएलाचे पवित्रा मी चंग वाजवून तुला गाईन
२३ मी तुला गाईन तेव्हां माझे ओंठ उत्सव करितील आणि जो माझा जीव त्वां उद्धरिला आहे तो
२४ तुझे न्यायाविषयींहि सारादिवस माझी जिव्हा बोलेल कां जे माझे अरिष्टास झटत होते ते लज्जा व त्रपा पावले आहेत



## गीत ७२

१ हे देवा तूं आपले विधि राजास व आपला न्याय राजपुत्रास दे
२ तो सात्विकपणें तुझे लोकांची व न्यायतः तुझे दीनांची न्यायाधीशी करील
३ न्यायेंकडून डोंगर व टेंकडें लोकांस कुशल उत्पा दितील
४ तो लोकांचे दीनांचा न्याय करील दरिद्र्यांस तारील आणि पीडक ठेंचून टाकील
५ सूर्य्य व चंद्र टिकतपर्यंत लोक पिढ्यानपिढ्यां तुझें भय धरितील
६ जसा कापिलेल्या गवतावर पाऊस व जशी भूमीवर पुष्कळपणें सुवृष्टि तसा तो उतरेल
७ त्याचे दिवसांत सात्विक प्रभंयु होईल व चंद्र टिके पर्यंत बहुकुशल राहील
८ समुद्रांसमुद्र व नदींपासून पृथ्वीचे सीमांपर्यंत तो प्रभुत्व करील
९ रुक्ष परदेशांतले लोक त्याचे पायां पडतील व त्याचे वैरी धूलि चाटून खातील
१० तर्शीश व द्वीपें यांचे राजे उपायनें आणितील शेबा व सेबा यांचे राजे दानें अर्पितील
११ सर्वहि राजे त्याचे पायां पडतील सर्व लोक त्याची सेवा करितील

१२ कारण ओरडता दरिद्री व दीन व अनाथ तो
मुक्त करील

१३ दुर्गत आणि दरिद्री यांजवर तो दया करील
व दरिद्र्यांचे जीव तो वांचवील

१४ उपद्रव व बलात्कार यांपासून तो त्यांचा जीव
सोडवील व त्याचे दृष्टींत त्यांचें रक्त अर्घ्य होईल

१५ तोहि वांचेल व त्याला लोक शेबाचें सोनें देतील
त्याजविषयीं नित्य प्रार्थना करितील आणि प्रतिदिनीं त्याला
सुवंदित ह्मणतील

१६ पृथ्वीत धान्याची समृद्धि होईल डोंगरांचे शिख
रांवर त्याचें फल लेबानोनावाणीं डोलेल व भूमीचे गवता
सारिखीं मैदानाचीं पिकें फुलतील

१७ सूर्य्यापुढें त्याचें नाम सदा राहील त्याचें नाम
विख्यात होईल त्याजकडून लोक सुखी होतील सर्व लोक
त्याला धन्य ह्मणतील

१८ ईश्वर जो देव इस्राएलाचा देव जो मात्र आश्च
र्य्यकर्मैं करितो तो सुवंदित असावा

१९ त्याचें गौरवी नामहि सदा सुवंदित असो आणि
त्याचे गौरवानें सर्व पृथ्वी भरली जावी आमेन आमेन

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ७३

१ तर इस्राएलाला मनाचे पवित्रांला देव उपका
रिक आहे



२ पण माझे पाय सरायाचे लागास आले होते माझीं
पावलें निसरायाचे लागास जवळच आलीं होतीं

३ कां तर अतिशोभिष्णुंविषयीं ईर्ष्यालु होऊं लागलों
म्यां दुष्टांचें कुशल पाहिलें

४ कां त्यांचे मरणांत कांहीं वेधना नसत्ये व त्यांचा
देह पुष्ट असतो

५ ते मनुष्यांचे कष्टांत नसतात व मनुष्यांसहवर्तमान ते
पिडिले जात नसतात

६ यास्तव गलमाल्यावाणीं गर्व त्यांला वेष्टितो व वस्त्रा
वाणीं द्रोह त्यांस आच्छादितो

७ मेदोवृद्धीनें त्यांचें नेत्र तरळत ते आपले मनांतील
कल्पनानीं अतिक्रमितात

८ ते थट्टा करितांना उपद्रवाविषयीं दुष्टपणें बोलतात ते
गर्विष्ठपणें बोलतात

९ ते आपलें मुख आकाशांत ठेवितात त्यांची जिव्हा
भूमीवर सरपटत सरपटत जात्ये

१० यास्तव त्याचे लोक इकडे फिरून यतातें आणि
संपुर्ण जल त्यांला पिळून काढिलें जातें

११ तथापि ते ह्मणतात देव कसा जाणतो व परात्परांत
ज्ञान आहे काय

१२ पहा ते दुष्ट आहेत आणि संसारांत स्वस्थ असून
धनवृद्धि करितात

१३ तर म्यां व्यर्थ आपलें मन स्वच्छ केलें आहे आणि निर्दोषतेंत आपले हात धुतले आहेत

१४ कां मी प्रतिदिवशीं पीडित असतों व प्रतिप्रातःकाळीं माझी शिक्षा असते

१५ मी ह्मणालों असें जर बोलेन तर तुझें लेंकरांचे वंशास अनिष्ट करीन

१६ हें जाणायास मी विचार केला हें माझे दृष्टींत अवघड होतें

१७ देवाचे पवित्र स्थानांत मी जाईंपर्यंत तेव्हां त्यांची अंत्यदशा मी समजलों

१८ निश्चयें तें त्यां निसरडे जाग्यांत ठेविले होते त्यां त्यांला नाशांत पाडिलें

१९ जसें क्षणांत ते कसे अवमर्दांत पडतात ते नाश पावतात आकस्मिक नाशानें नष्ट होतात

२० जागृत झाल्यावर जसा स्वप्न तसा हे प्रभो रोषानें त्यांचा आकार तुच्छ मानिशील

२१ तर माझें हृदय उकळलें व मी आपले अंतर्यामांत संतप्त झालों

२२ पण मी पशुशील आहें व कांहीं जाणत नाहीं तुजपुढें मी पशुसारिखा असें

२३ तथापि मी तुजशीं निरंतर आहें माझा उजवा हात तूं धरीत आला आहेस



२४ तूं आपले संबोधानें मला नेशील नंतर गौरवांत मला घेशील

२५ आकाशांत मला कोण आहे व तुजशीं असतांना मी पृथ्वीवर इच्छा ठेवीत नाहीं

२६ माझा देह व माझें हृदय थकेल माझे हृदयाचा आधार व माझा विभाग देव सनातनत: आहे

२७ कां तर पहा जे तुजपासून दूर आहेत ते नष्ट होतील प्रत्येक जो व्यभिचारकरून तुजपासून फिरतो त्याला तूं नाहींसें करिशील

२८ तर देवाजवळ येणें मला उत्तम आहे म्यां प्रभु देवावर भाव ठेविला आहे अशासाठीं कीं तुझीं सर्व कर्में म्यां कथावीं

## गीत ७४

१ हे देवा आमचा निस्तुक वीट कां मानिला आहेस तुझे कुरणांतले कळपावर तुझा क्रोध कां धुमतो

२ जो तुझी मंडळी त्वां पुर्वीं घेतली तुझे क्षेत्राचा जो विभाग त्वां उद्धरिला हा जोयोन पर्वत ज्यांत त्वां वस्ती केली त्यांचें स्मरण कर

३ निश्शेष नाशाकरितां तूं आपले पाय उठीव वैऱ्यानें तुझें पवित्र स्थान अगदीं बिघडिलें आहे

४ तुझे सभामंडपांत तुझे शत्रु ओरडले त्यानीं आपले ध्वज चिन्हार्थ उभारिले आहेत

५ जसा वृक्षवनांत कुह्राडी उगारणारा तसा तो जाणिला जातो

६ आणि आतां त्याचें खोदकाम ते एकाएकीं कुटा रानीं व ठोकण्यानीं मोडून टाकितात

७ त्यानीं तुझें पवित्र स्थान अग्नीला दिलें तुझो नाम वसति त्याहीं धूलींत मिळविली आहे

८ ते आपले मनांत ह्मणाले आह्मी त्यांस एकदांच पीडून नाशूं देशांतलीं त्यानीं देवाचीं सर्व मंदिरें जाळून टाकिलीं आहेत

९ आह्मी आपलीं चिह्नें पहात नाहीं भविष्यवादी अणखी कोणी नाहीं आणि कोठपर्यंत असें जो जाणतो तो आह्माजवळ नाहीं

१० हे देवा कोठपर्यंत शत्रु निंदा करितील तुझें नाम वैरी सदा तुच्छ मानील काय

११ तूं आपला हात आपला उजवा हातहि कां आटपतोस तुझे मनांत जें आहे तें साध

१२ तर पूर्वींपासून देव माझा राजा असे तो पृथ्वींत उद्धार करितो

१३ तूं आपले शक्तीनें समुद्र भेदिलास जलांत ग्राहाचीं मस्तकें मोडिलीस

१४ लिव्याथानाचीं मस्तकें ठेंचिलींस रूक्ष देशांतले लोकांस तो त्यां तो खायासाठीं दिला

१५ त्वां झरे व ओघ उघडिले त्वां सतत नद्या शुष्क केल्या



१६ दिवस तुझाच व रात्रि तुझीच आहे त्वां प्रकाश व सूर्य्य सिद्ध केले आहेत

१७ पृथ्वीच्या सर्व सीमा त्वां स्थापिल्या आहेत उष्ण काल व हिमकाल त्वां नेमिलेले आहेत

१८ हे ईश्वरा हें स्मर कीं वैऱ्यानें तुझी निंदा केली आहे आणि मूर्ख लोकानीं तुझें नाम तुच्छ मानिलें आहे

१९ तूं आपले कपोताचा जीव देऊन टाकूं नको आपले दीनांचा जीव सदा विसरूं नको

२० संधा लक्ष्यांत आण कारण पृथ्वीचीं अंधकारावृत स्थानें द्रोहाचे वस्त्यानीं भरलीं आहेत

२१ पीडितानें लज्जित फिरूं नये दीन व दरिद्री तुझें नाम स्तवोत

२२ हे देवा ऊठ तूं आपला वाद कर जो तुझी निंदा मूर्खाकडून नित्य होत्ये ती स्मर

२३ तुझे शत्रूंचा शब्द विसरूं नको जे तुजवर उठतात त्यांचा गोंगाट नित्य चढतो

## महिन्याचा पंधरावा दिवस

### संध्याकाळची प्रार्थना

### गीत ७५

१ हे देवा तुझें नाम जवळ आहे ह्मणून आह्मी तुझी उपकारस्तुति करितों आह्मी उपकारस्तुति करितों मनुष्यें तुझीं आश्चर्य्य कर्में कथोत

२ जेव्हां मी सभा घेईन तेव्हां मी न्याय यथार्थपणें करीन

३ पृथ्वी व तीचे सर्व वसतिकर्ते गळून गेले आहेत मीच तीचे खांब निटावितों

४ गर्विष्ठांस मी म्हणालों गर्व आचरूं नका आणि दुष्टांस तुह्मी शृंग उंचावूं नका

५ तुह्मी आपलें शृंग वरतीं उंचावूं नका आपली मान उभारून बोलूं नका

६ कां तर पूर्वेकडून अथवा पश्चिमेकडून अथवा दक्षिणेकडून उंचावणें होत नाहीं

७ पण देव न्यायाधीशच आहे तोच एकाला नीच करितो आणि दुसऱ्यास उंचावितो

८ तर ईश्वराचे हातांत प्याला आहे व रस तांबडा आहे मीसळीनें पूर्ण आहे त्यांतूनहि तो ओतितो पण त्याचा गाळ पृथ्वींतले सर्व दुष्ट चोंखून पितील

९ पण मी सदा प्रशंसा करीन याकोबाचे देवाला गाईन

१० दुष्टांचीं सर्व शृंगें मी तोडून टाकीन पण सात्विकाचीं शृंगें उंचाविलीं जातील

## गीत ७६

१ यहूदांत देव कळला आहे इस्राएलांत त्याचें नाम थोर आहे

२ शालेमांतहि त्याचा मंडप आणि सीयोनेंत त्याची वस्ती आहे



३ तेथें धनुष्याचे बाण व ढाल व तरवार व युद्ध त्यानें मोडून टाकिलीं

४ हाराचे पर्वतांपेक्षां तूं प्रशस्त व प्रतिष्ठित आहेस

५ मनाचे धैर्यवान हरले गेले त्यानीं आपली झोंप घेतली आहे आणि कोणत्याहि बलवान मनुष्यांस आपलें बल चालवायास येईना

६ हे याकोबाचे देवा तुझे धमकीनें रथ व घोडा स्तब्ध राहिले

७ तूं तूंच भयास योग्य आहेस आणि तुझा क्रोध असतांना तुजपुढें कोण उभा राहील

८ तूं आकाशांतून न्याय ऐकूं दिलास पृथ्वी भ्याली आणि निःशब्द झाली

९ न्याय करायला पृथ्वींतलें सर्व दीनांस तारायला जेव्हां देव उठला तेव्हां

१० तर मनुष्याचा रोष तुझें स्तवन करील रोषाचें शेष तूं बंद करिशील

११ तुह्मी त्याचे भोंवतालचे सर्व हो ईश्वराला तुमचे देवाला नवस करा व फेडा जो भयास योग्य आहे त्याजवळ अर्पण आणा

१२ अधिपतींचा प्राण तो काढून घेतो पृथ्वींतले राजांस तो भयंकर आहे

## गीत ७७

१ माझा शब्द देवाकडे होता आणि त्यानें कान दिला

२ माझे संकटाचे दिवशीं म्यां प्रभूला शोधिलें रात्रीं माझा हात पसरट राहिला आणि आटपला नाहीं माझा जीव सांत्वन घेईना

३ म्यां देवाचें स्मरण केलें तेव्हां मी व्याकुल झालों म्यां ध्यान केलें तेव्हां माझा प्राण मूर्च्छित झाला

४ तूं माझे डोळे जागे धरितोस मी विव्हल झालों आहें ह्मणून मला बोलवत नाहीं

५ पूर्वीचे दिवस व पुरातन काळाचीं वर्षें म्यां ध्यानांत आणिलीं आहेत

६ रात्रीं मी आपलें गीत स्मरतों मी आपले मनाशीं संभाषण करितों व माझा आत्मा समीक्षण करितो

७ प्रभु सर्वकालपर्यंत वीट मानील काय तो अणखीं प्रसन्न न होईल काय

८ त्याची दया निखुक गेली आहे काय सर्व पिढ्यां पर्यंत त्याचें वचन टळलें आहे काय

९ दया करायास देव विसरला आहे काय क्रोधें करून त्यानें आपला कळवळा बंद केला आहे काय

१० पण मी ह्मणालों ही माझी अशक्तता आहे परात्पराचे उजवे हाताचीं वर्षें मी स्मरेन

११ ईश्वराचीं कर्मे स्मरेन होय तुझीं पुरातन आश्चर्यकर्मे स्मरेन

१२ तुझे सर्व करण्याविषयीं मी ध्यान करीन व तुझे चरित्रांविषयीं मी चिंतीन



१३ हे देवा तुझा मार्ग पवित्र आहे देवासारिखा थोर देव कोण आहे

१४ तूं हे देवा आश्चर्यकर्मे करितोस लोकांत त्वां आपला पराक्रम दाखविला आहे

१५ तूं आपले भुजानें आपले लोक याकोबाचे व योसेफाचे वंश उद्धरिलेस

१६ जलानीं तुला पाहिलें हे देवा जलानीं तुला पाहिलें तो व्याकुल झालो अथाक स्थानेंहि विव्हल झालीं

१७ निबिड मेघानीं पाणी ओतिलें आभाळानें शब्द केला तुझे बाणहि चालिले

१८ तुझे स्तनिताचा शब्द वातमंडलींत होता विजानी जग प्रकाशिलें पृथ्वी हालून कांपली

१९ समुद्रांत तुझा मार्ग व जलाशयांत तुझ्या वाटा आहेत आणि तुझीं पावलें कळलीं नाहींत

२० मोशे व अहरोन यांचे हस्तेंकडून त्वां आपले लोक कळपावाणीं नेले

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ७८

१ अहो माझे लोक हो माझे धर्मविधीला कान द्या माझे मुखचे वाक्यांला कान लावा

२ मी कथेला आपलें तोंड उघडीन पुरातन काव्यें सांगेन

३ जीं आम्हीं ऐकिलीं व जाणिलीं व आमचे वडिलानीं आम्हास कथिलीं आहेत तीं

४ त्यांचे संततीपासून तीं आम्ही गुप्त राखणार नाहीं पुढले पिढीला ईश्वराची स्तुति त्याचा पराक्रम व त्यानें जीं आश्चर्यकर्में केलीं तीं आम्ही कथूं

५ त्यान याकोबांत विधान स्थापिलें व इस्राएलांत धर्मविधि ठेविला आणि त्यांचे लेंकरांस तीं कळवावीं ह्मणून त्यानें आमचे वडिलांस आज्ञा दली

६ अशासाठीं कीं पुढले पिढींत जीं लेंकरें जन्मतील त्यानीं तीं जाणावीं आणि उठून आपलेहि लेंकरांस कथावीं

७ व देवावर आपला भाव ठेवावा आणि देवाची कार्यें न विसरून त्याच्या आज्ञा पाळाव्या

८ आणि जो आपलें मन शुद्ध राखीत नसे व ज्याचा आत्मा देवाकडे विश्वस्त नसे असा वांकडा व फितता वंश जे आपले वडील त्यासारिखीं तीं नव्हावीं

९ एफ्राइमाचा वंश सज्जित असतां धनुष्यें धरीत असतां युद्धदिवसीं पराङ्मुख झाला

१० त्यानी देवाची संधा पाळिलीं नाहीं व त्याचे धर्मविधिप्रमाणें ते चालेनात

११ आणि त्याचीं चरित्रें व त्याचीं आश्चर्यकर्में जीं त्यानें त्यांस दाखविलीं होतीं तीं ते विसरले

११ मिसर देशांत जोआनप्रांतांत त्यांचे वडलांदेखतां त्यानें आश्चर्यकर्में केलीं



१३ त्यानें समुद्र भेदून त्यांस उतरूं दिलें त्यानें ढिगासारिखें जल एकवटून स्थिर केलें

१४ दिवसा मेघेंकरून व सारींरात्र अग्निप्रकाशेंकडून तो त्यांला नेई

१५ अरण्यांत त्यानें खडक छेदून खोल नद्यांसारिखें पुष्कळपणें पाणी प्यायास दिलें

१६ त्यानें दगडांतून ओघ निघत व नद्यांवाणीं जल उतरत वाहो असें केलें

१७ पण ते रूक्ष अरण्यांत परात्परापासून फिरून त्याजप्रतिकूल अणखीं पाप करूं लागले

१८ त्यानीं आपले इच्छेसाठीं अन्न मागून आपले मनांत देवाची परीक्षा केली

१९ आणि ते देवाप्रतिकूल बोलून ह्मणाले रानांत भोजन सिद्ध करायला देव समर्थ आहे काय

२० पहा त्यानें खडकावर मारिलें तेव्हां पाणी निघून वाहलें नद्या उतून चालिल्या तो भाकर देऊं शकतो काय तो आपले लोकांस मांस सिद्ध करील काय

२१ मग ईश्वर ऐकून रुसला व याकोबावर अग्नि पेटला व इस्राएलावरहि क्रोध चढला

२२ कारण ते देवावर विश्वासले नाहींत व त्याचे तारणावर त्यानीं भाव ठेविला नाहीं

२३ आणि त्यानें वरतीं आभाळास आज्ञा दिली व आकाशद्वारें उघडलीं

२४ व त्यानें त्यांजवर मान् खायासाठीं वर्षिला आकाशधान्य त्यांला दिलें

२५ दूतांचें अन्न मनुष्य खाता झाला तृप्त झाल्यापर्यंत त्यान त्यांस क्रव्य पाठविलें

२६ आकाशांत पूर्वेचा वारा सरे असें करून त्यानें आपले शक्तीकडून दक्षिणेचा वारा आणिला

२७ तेव्हां त्यानें त्यांजवर धूळीवाणीं मांस व समुद्राचे वाळूवाणीं पक्षी वर्षिले

२८ आणि त्यानें त्यांचे छावणीमध्यें त्यांचे वस्तीभोंवतें तें पडूं दिलें

२९ त्यानें त्यांला त्यांचे दृष्टविषय आणिले म्हणून ते खाऊन अतितृप्त झाले

३० त्यानीं आपली इच्छा सोडिली नाहीं अद्यापि त्यांचें अन्न त्यांचे तोंडांत होतें

३१ तेव्हां त्यांजवर देवाचा क्रोध चढला आणि त्यांचे पुष्टांस त्यानें वधिलें व इस्राएलाचे श्रेष्ठांस पाडिलें

३२ हें सर्व झालें तरीं ते अद्यापि पाप करीत गेले आणि त्याचे आश्चर्यकर्मांवर विश्वासले नाहींत

३३ यास्तव त्यानें व्यर्थपणांत त्यांचे दिवस व व्याकूलत्वांत त्यांचीं वर्षे सोंपूं दिलीं

३४ जेव्हां त्यांस तो वधूं लागला तेव्हां त्यानीं त्याला शोधिलें व फिरून देवाला अन्वेषिलें



३५ आणि देव आमचा पर्वत व परात्पर देव आमचा उद्धारकर्त्ता आहे असें ते स्मरले

३६ पण त्यानीं आपल्या मुखेंकडून त्याजवळ कपट केलें आणि आपले जिव्हेंकडून ते त्यास असत्य बोलिले

३७ आणि त्याजकडे त्यांचें मन शुद्ध नव्हतें व त्याचे संधेविषयीं ते विश्वस्त नव्हते

३८ तथापि त्यानें दयालु असून त्यांचे अन्यायाची क्षमा करून त्यांस नाशिलें नाहीं आणि बहुत वेळां त्यांजपासून आपला क्रोध फिरवून आपला सर्व राग चेतविला नाहीं

३९ आणि ते मर्त्य आहेत जो वारा जाऊन परत येत नाहीं तसेच ते आहेत असें तो स्मरला

४० कितीदां अरण्यांत ते त्याजवर निर्यंत्रण झाले व रूक्ष भूमींत कितिवेळां त्यानीं त्याला दुःखित केलें

४१ त्यानींहि फिरून देवाची परीक्षा केली व इस्राएलाचे पवित्रास क्षोभयुक्त केलें

४२ त्याचा पराक्रम व ज्या दिवशीं त्यानें त्यांस शत्रूपासून उद्धरिलें तो दिवसहि ते स्मरले नाहींत

४३ त्यानें मिस्राईमांत आपलीं चिन्हें व जोआनाचे देशांत आपले उत्पात दाखविले

४४ व त्यानें त्यांच्या नद्या व त्यांचे ओघळ रक्त करून पालटले ह्मणून त्यांच्यानें पिववेना

४५ त्यानें त्यांजमध्यें माशा पाठविल्या तेव्हां त्यानीं

त्यांस खाणें व बेडूक पाठविले तेव्हां त्यानीं त्यांला नाशिलें

४६ आणि त्यानें घुल्यास त्यांचा उपज व टोळास त्यांचें श्रमफल दिलें

४७ त्यानें गारांकडून त्यांच्या द्राक्षा व हिमाकडून त्यांचे तूलवृक्ष नाशिले

४८ व त्यानें गारेला त्यांची गुरें आणि विजेला त्यांचे कळप सोंपून दिले

४९ त्यानें कुदूत पाठवून त्यांजमध्यें आपला संतप्त क्रोध कोप व रोष व पीडा प्रतिष्ठ केली

५० त्यानें आपले क्रोधाची वाट नीट करून त्यांचा प्राण मरणापासून राखिला नाहीं पण मरीला त्यांचा जीव सोंपून दिला

५१ व त्यानें मिस्रांईमांत सर्व प्रथमजात आणि हामाचे वस्त्यांत शक्तिप्रथमफल वधिलें

५२ व त्यानें आपले लोक कळपासारिखे निघत असें करून यांस कळपासारिखें रानांत नेलें

५३ व त्यानें त्यांस सुखरूप चालविलें ह्मणून ते भ्याले नाहींत पण समुद्रानें त्यांचे वैरी झांकिले

५४ व त्यानें आपले पवित्र देशांत हा जो पर्वत आपले उजवे हातानें घेतला त्यांतच त्यांला आणिलें

५५ आणि त्यानें त्याजपुढून लोक घालवून त्यांला सूत्रानें क्षेत्र वांटिलें आणि इस्राएलाचे वर्ग आपले वस्त्यांत रहात असें केलें



५६ पण ते परात्पर देवाची परीक्षा करून फितुरले व त्यानीं त्याचे विधि पाळिले नाहींत

५७ पण पराङ्मुख होऊन त्यानीं आपले वडिलांसारिखें कपट केलें कुटिल धनुष्यावाणीं ते पालटले

५८ व त्यानीं आपले उच्चस्थलांकडून त्यास क्षोभयुक्त केलें आणि आपले कोरींव मूर्त्तींकडून त्याची आशंका चेतविली

५९ देव ऐकून क्रोधयुक्त झाला आणि इस्राएलास फार कंटाळला

६० तेव्हां त्यानें शिलोहाची वस्ती जो मंडप त्यानें मनुष्यांमध्यें मांडिला तोच सोडिला

६१ व त्यानें आपला सामर्थ्यालय हरला जाऊं दिला आणि आपला प्रभावालय शत्रूचे हातांत पडूं दिला

६२ व त्यानें आपले लोक तरवारीला सोंपिले आणि आपले क्षेत्रावर तो रुष्ट झाला

६३ अग्नीनें त्यांचे कुमार खाल्ले व त्यांच्या कुमारी विवाहित झाल्या नाहींत

६४ त्यांचे आचार्य तरवारीनें पडले आणि त्यांच्या विधवा रडल्या नाहींत

६५ तेव्हां निद्राग्रस्त जनावाणीं व मद्याक्रांत शूरावाणी प्रभु जागृत झाला

६६ व त्यानें आपले शत्रु पाठीमागून हाणिलें त्याला त्यानें सर्वकालपर्यंत निंद्य केलें

६७ तर त्यानें योसेफाची वस्ती टाकिली व एफ्रा
ईमाचा वर्ण निवडिला नाहीं

६८ पण त्यानें यहूदाचा वर्ण ज्या जीयोन पर्वतावर
त्यानें प्रीति ठेविली होती तोच निवडिला

६९ तेव्हां उच्छ्रितांप्रमाणें जी पृथ्वी त्यानें सर्वकालपर्यंत
तलस्थित केली तिजप्रमाणें त्यानें आपलें पवित्र मंदिर
बांधिलें

७० व त्यानें आपला सेवक दावीद निवडिला आणि
मेंढरांचे कोंडवाडींतून घेतला

७१ व आपले लोक याकोब व आपलें क्षेत्र इस्राएल
पाळायास तान्ह्या मेंढ्यां मागून आणिला

७२ तेव्हां त्यानें आपले मनाचे सात्विकपणाप्रमाणें त्यांस
पाळिलें व आपल्या हस्तकौशलाप्रमाणें संभाळून नेलें

## महिन्याचा साळावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ७९

१ हे देवा तुझे क्षेत्रांत विधर्म लोक आले आहेत
त्यानीं तुझें पवित्र मंदिर बाटविलें आहे त्यानीं येरूशालेमेचीं
ढीग केले आहेत

२ त्यानीं आकाशांतले पक्ष्यांस तुझे सेवकांचीं मडीं व
पृथ्वींतले पशूंस तुझे साधूंचीं शरीरें आहारापरी दिल
आहेत



३ येरूशालेमेभोंवतें त्यानीं त्यांचें रक्त पाण्यावाणीं पाडिलें
आणि त्यांस पुरायला कोणी नव्हता

४ आह्मी आपले शेजाऱ्यांला निंदार्थ व आपले आस
पासच्यांला हास्यार्थ व भर्त्सनार्थ झालों आहों

५ हे ईश्वरा कोठपर्यंत क्रोधयुक्त राहशील सर्वकालप
र्यंत काय अग्नीसारिखा तुझा रोष जळत जाईल काय

६ जे लोक तुला जाणत नाहींत व जीं राज्यें तुला
प्रार्थीत नाहींत त्यांजवर तूं आपला राग प्रतिसृष्ट कर

७ कां तर त्यानीं याकोब खाऊन टाकिला आहे व
त्याची वस्ती ओसाड केली आहे

८ आमचीं पूर्वपातकें स्मरूं नको तुझी दया आह्मावर
लौकर यावी कारण आह्मी फार अधमस्थित झालों आहों

९ हे आमचे तारणाचे देवा तूं आपले नामाचे गौर
वासाठीं आम्हास साहाय्य कर आणि आपले नामाकरितां
आमचीं पापें क्षमा करून आह्मास मुक्त कर

१० त्यांचा देव कोठें आहे असें विधर्म लोकांमध्यें
कां म्हणतील तुझे सेवकांचें जें रक्त पाडिलें गेलें त्याचा
सूड उगवून तो आमचे देखतां विधर्म लोकांमध्यें जाणिला जावा

११ बंदिवानाचा उच्छ्वास तुजपुढें येवो जे मरणोप
मन्न आहेत त्यांस तूं आपले महाक्रमानें वांचीव

१२ आणि आमचे शेजाऱ्यानीं ज्या निंदेनें तुला हे
प्रभो निंदिलें आहे ती सातपट त्यांचे पदरीं परत दे

१३ मग आम्ही तुझे लोक व तुझे कुरणांतला कळप

तुला सर्वकाळपर्यंत स्तवीत जाऊं आणि पिढ्यानपिढ्यां तुझी प्रशंसा करीत जाऊं

## गीत ८०

१ हे इस्राएलाचे पालका जो तूं योसेफाला कळपावाणी नेतोस तो कान दे जो तूं करूबांमध्यें बसतास तो प्रव्यक्त हो

२ एफ्राईम व बिन्यामीन व मेनाश्शे यांसमोर तूं आपला पराक्रम उत्तेजित कर आणि आह्मास तारायला ये

३ हे देवा आह्मास परत घे तूं आपलें मुखतेज पडूं दे ह्मणजे आह्मी तरूं

४ हे ईश्वरा सैन्यांचे देवा कोठपर्यंत तूं आपले लोकांचे प्रार्थनेवर धुमसशील

५ ते आंसवें भाकरीप्रमाणें खात असें केलेंस आणि मोठे मापाचीं आंसवें तूं त्यांला प्यायाला दिलीस

६ तूं आम्हास आपले शेजाऱ्यांसाठीं कलहार्थ करितोस आणि आमचे वैरी आपल्यांमध्यें हांसतात

७ हे सैन्यांचे देवा तूं आम्हास परत घे तूं आपलें मुखतेज पडूं दे ह्मणजे आह्मी तरूं

८ मिज्राईमांतून तूं द्राक्षा आणिलीस विधर्म लोक घालवून तूं तो लाविलीस

९ तूं तिजपुढें भूमि स्वच्छ केलीस ती आपलीं मुळें पसरवून देशांत व्यापली



१० तिचे छायेनें डोंगर आच्छादले गेले आणि तिच्या फांद्यां उंच एरेज वृक्षाधारिख्या होत्या

११ तिनें आपल्या फांद्या समुद्रापर्यंत व आपले कोंब नदीपर्यंत लांबविले

१२ तिचीं कुंपणें कां मोडिलींस आणि सर्व वाटसरू तिला हिसकून तोडितात

१३ जंगलांतले डुकर तिला नाशितात व रानांतले पशु तिजवर चरतात

१४ हे सैन्यांचे देवा आतां फीर आकाशांतून अवलोकन करून पहा आणि या द्राक्षेला मन लाव

१५ आणि जें तुझे उजवे हातानें लाविलें आहे व जें रोप त्वां आपल्यासाठीं बलिष्ठ केलें आहे त्याचें संरक्षण कर

१६ ती अग्नीनें जाळिली गेली ती तोडिली गेली आहे तुझे मुखाचे धमकीनें ते नष्ट होतील

१७ तुझे उजवे हातचे पुरुषावर जो मनुष्य त्वां आपल्यासाठीं बलिष्ठ केला आहे त्याजवर तुझा हात असावा

१८ मग आम्ही तुजपासून फितणार नाहीं आह्माला जीवंत कर ह्मणजे तुझी प्रार्थना करूं

१९ हे ईश्वरा सैन्यांचे देवा आम्हास परत घे तूं आपलें मुखतेज पडूं दे मग आह्मी तरूं

## गीत ८१

१ देव जो आमचें सामर्थ्य त्याला तुह्मी उच्चस्वरानें गा याकोबाचे देवाला उत्साहशब्द करा

२ गीत आरंभून टाळ वाजवा वीणासहित मंजुल चंग वाजवा

३ अमावास्येंत पूर्णिमेंत आमचे सणाचे दिवसांत करणा वाजवा

४ कारण हा इस्राएलासाठीं नियम आहे याकोबाचे देवाचा विधिच आहे

५ हाच त्यानें योसेफ मिज्राईमांतून निघाला तेव्हां त्यांत साक्षीसाठीं नेमिला तेथें जी भाषा मला समजेना ती म्यां ऐकिली

६ म्यां त्याचा खांदा भारापासून सारिला त्याचे हात पाटीपासून मुक्त झाले

७ त्वां संकटांत असून आरोळी केली तेव्हां म्यां तुला मुक्त केलें स्तनितमेघांतून म्यां तुला उत्तर दिलें मेरी बाचे पाण्याजवळ म्यां तुला पारखिलें

८ अहो माझे लोकांनो ऐका मी तुह्मास साक्ष देईन हे इस्राएला जर माझें ऐकशील तर

९ तुजवळ अज्ञात देव नसो परके देवाला तूं भजूं नको

१० तुझे ज्या ईश्वरा देवानें तुला मिज्राईम देशांतून आणिलें तो मीच आहें तूं आपलें तोंड उघड ह्मणजे मी तें भरीन



११ पण माझे लोक माझा शब्द ऐकेनात इस्राएल मला इच्छीना

१२ यास्तव म्यां त्यांस त्यांचे हृदय कठिनतेंत सोडिलें तेव्हां ते आपले संकल्पांप्रमाणें चालले

१३ अहा जर माझे लोकांनीं माझें ऐकिलें असतें जर इस्राएल माझे मार्गांत चालला असता तर

१४ त्वरेंकरून म्यां त्यांचे वैरी दान्त केले असते आणि त्यांचे शत्रूंवर मी आपला हात फिरविला असता

१५ ईश्वराचे द्वेषक त्याला वश्य झाले असते पण त्यांचा वेळ सर्वकालपर्यंत असला असता

१६ गव्हांचे सारेंकडून त्यानें त्यांला पोषिलें असतें आणि खडकांतल्या मधूनें म्यां तुला तृप्त केलें असतें

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत ८२

१ श्रेष्ठांचे मंडळींत देव उभा राहातो तो थोरांमध्यें न्यायाधीशी करितो

२ कोठपर्यंत तुह्मी अन्यायतः न्यायाधीशी कराल आणि दुष्टांचा पक्षपात कराल

३ दुर्बल व अनाथ यांचें न्यायरक्षण करा दीन व दरिद्री यांचा न्याय ठरवा

४ दुर्बल व निर्धन यांस तारा दुष्टांचे हस्तापासून त्यांला मुक्त करा

५ ते जाणत नाहींत व समजत नाहींत ते अंधकारांत चालतात पृथ्वींचे सर्व पाये ढळले आहेत

६ तुह्मी देव आहां व तुम्ही सर्व परात्पराचीं लेंकरें आहां असें मी ह्मणालों

७ तथापि मनुष्यावाणीं तुह्मी मराल व अधिपतींतले एकासारिखे गळून पडाल

८ तूं हे देवा ऊठ पृथ्वीची न्यायाधीशी कर कारण तूं आपले सत्तेंत सर्व लोक ठेविशील

## गीत ८३

१ हे देवा मौन धरूं नको मुका राहूं नको निःशब्द नको राहूं

२ कां तर पहा तुझे वैरी कोलाहल करितात आणि जे तुला द्वेषितात त्यानीं आपलें डोचकें उभारिलें आहे

३ त्यानीं तुझे लोकांप्रतिकूल सकपट संकल्प केला आणि तुझे संरक्षितांविरुद्ध संमंत्रण केलें आहे

४ त्यानीं ह्मटलें अहो या ते निराळे लोक न राहावे आणि पुढें इस्राएलाचें नाम स्मरलें न जावें ह्मणून आह्मी त्यांचा सत्यनाश करूं

५ त्यानीं एकचित्त संमंत्रण केलें आहे ते तुजप्रतिकूल संधा करितात

६ एदोम व इश्मारल यांचे वंश मोआब व हगीम



७ गेबाल व अम्मोन व अमालेक फलेशेथ सोरकर सहित

८ अश्शूरहि त्यांशीं मिळाला आहे लोटाचे वंशाचे साहाय ते झाले आहेत

९ जसें मिद्यानाला जसें सीसराला कीशोन नदीवर जसें याबीनाला तसें त्यांला कर

१० एनदोरास ते नाश पावले भूमीला खतच ते झाले

११ जसा ओरेब व जसा जेएब तसे त्यांचे श्रेष्ठजन आणि जसा जेबाह व जसा जल्मुन्ना तसे त्यांचे सर्व अधिपति होत असें कर

१२ जे म्हणाले आम्ही आपलेसाठीं देवाचे निवास विभागापरी घेऊं ते

१३ हे देवा जसा धुरळा जशी वाऱ्यापुढें काड तसे ते होत असें कर

१४ जसा अग्नि वन जाळितो व जशी ज्वाला डोंगर चेतवित्ये

१५ तसा तूं आपले वादळानें त्यांस उडीव आणि जौळानें त्यांस भडकोव

१६ त्यांचीं मुखें लज्जाभरित कर आणि ते तुझें नाम अन्वेषोत

१७ ते लाजतील व सर्वकालपर्यंत व्याकुल होतील ते लज्जित होऊन नाश पावतील

१८ तेव्हां मनुष्यें जाणतील कीं ज्या तुझेंच नाम यहोवा
आहे तो तूं सर्व पृथ्वीवर परात्पर आहेस

## गीत ८४

१ हे सैन्यांचे ईश्वरा तुझे निवास किती प्रिय आहेत
२ ईश्वराचे अंगणांसाठीं माझा जीव फार इच्छून थक्त
लाच आहे जीवंत देवासाठीं माझें हृदय व माझा देह
ओरडतात
३ हे सैन्यांचे ईश्वरा माझे राजा व माझे देवा ज्यांत
तिनें आपलीं पिलें ठेवावीं असें घर चिमणीस आणि असें
कोठें निळवीस तुझे यज्ञवेद्यांत सांपडतें
४ जे तुझे घरांत राहतात ते धन्य ते निरंतर तुला
स्तवितील
५ ज्यां मनुष्यांचें सामर्थ्य तुझ्यांतच आहे ज्यांचे हृद
यांत तुझे मार्ग आहेत ते सुखी आहेत
६ ते रोदनाचे खोऱ्यांतून जातांना तें झरा होई असें
करितात तोहि उपकार पर्जन्यावाणीं वर्षितो
७ ते शक्ति पावत पावत चालत जातात जीयोनेंत देवा
समोर प्रत्येक विद्यमान होतो
८ हे ईश्वरा सैन्यांचे देवा माझी प्रार्थना ऐक हे याको
बाचे देवा कान दे
९ हे देवा तूं आमचे वारणाला पहा तूं आपले
अभिषिक्ताकडे दृष्टि लाव



१० कारण तुझे अंगणांत एक दिवस सहस्रांपेक्षां
उत्तम आहे दुष्टपणाचे डेऱ्यांत वस्ती करण्यापेक्षां माझे
देवाचे घराचे दाराशीं राहणें मला बरें वाटतें
११ कां तर ईश्वर जो देव तो सूर्य्य व वारणच आहे
प्रसाद व गौरव ईश्वर देईल जे यथार्थपणें चालतात त्यांला
जें उत्तम तें द्यायास तो अमान्य होणार नाहीं
१२ हे सैन्यांचे ईश्वरा जो मनुष्य तुजवर भाव ठेवितो
तो धन्य आहे

## गीत ८५

१ हे ईश्वरा तूं आपले देशावर प्रसाद केला आहेस
याकोबाचे प्रवासी परत आणिले आहेस
२ तूं आपले लोकांचा अन्याय क्षमा केला आहेस
त्यांचें सर्व पाप आच्छादिलें आहेस
३ तूं आपला सर्व राग काढून टाकिला आहेस तूं
आपले संतप्त क्रोधापासून फिरला आहेस
४ हे आमचे तारणाचे देवा आह्मास परत घे आणि
आम्हावर जो तुझा रोष तो नाहींसा कर
५ सर्वकालपर्यंत तूं आह्मावर क्रोधयुक्त राहशील काय
पिढ्यानपिढ्यां तूं आपला क्रोध धरिशील काय
६ तुझे लोकानीं तुजविषयीं हर्षावें ह्मणून तूं फिरून
आह्मास जीवंत करणार नाहींस काय
७ हे ईश्वरा तूं आपली दया अह्मास अनुभवूं दे व
तुझें तारण अह्माला दे

७ ईश्वर जो देव तो काय बोलेल तें मी ऐकेन कारण तो आपले लोकांस व आपले साधूंस कुशल बोलेल पण त्यानीं फिरून मूर्खतेंत पडूं नये

९ जे त्याला भितात त्यांजवळ त्याचें तारण आहे खरें आमचे देशांत गौरव रहावें ह्मणून

१० दया व सत्य एकच मिळालीं आहेत सात्त्विकपण व कुशल यानीं एमेमेकांस चुंबिलें आहे

११ पृथ्वींतून सत्य रुझेल आणि आकाशांतून सात्त्विकपण अवलोकन करील

१२ होय जें उत्तम तें ईश्वर देईल आमची भूमि आपलें फल देईल

१३ सात्त्विकपण त्यापुढें चालेल आणि त्याचीं पावलें मार्गांत निटावील

## महिन्याचा सत्रावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ८६

१ हे ईश्वरा मी दीन व दरिद्री ह्मणून तूं आपला कान लावून माझें ऐक

२ मी भक्तिवान आहें ह्मणून माझा जीव रक्ष हे माझे देवा जो तुझा सेवक तुजवर विश्वासतो त्याला तार

३ हे प्रभो मी तुला सारा दिवस आरोळी करितों ह्मणून मजवर दया कर



४ हे प्रभो मी आपलें चित्त तुजकडे लावितों ह्मणून तूं आपले सेवकाचा जीव हर्षित कर

५ कां तर हे प्रभो तूं उपकारी व क्षमालु आहेस आणि सर्व जे तुला प्रार्थितात त्यांला सुप्रसन्न आहेस

६ हे ईश्वरा माझे प्रार्थनेला कान दे आणि माझे विनंत्यांचे शब्दांला मन लाव

७ मी आपले संकटाचे दिवसीं तुला आरोळी करीन तेव्हां मला उत्तर देशील

८ हे प्रभो थोरांमध्यें तुजसारिखा कोणी नाहीं व तुझे कार्य्यांसारिखीं कोणतींहि नाहींत

९ हे प्रभो सर्व जे लोक त्वां उत्पन्न केले ते येऊन तुज समोर भजतील आणि तुझें नाम गौरवितील

१० कारण तूं थोर आहेस आणि आश्चर्य्यकर्में करितोस केवळ तूंच देव आहेस

११ हे ईश्वरा तुझा मार्ग मला दाखीव मी तुझे सत्यांत चालेन तुझे नामाचें भय धरायास माझें मन एकाग्र कर

१२ हे प्रभो माझे देवा मी आपल्या सर्व हृदयानें तुला स्तवीन व सदा तुझें नाम गौरवीन

१३ कारण मजवर तुझी दया फार आहे आणि अधम नरकांतून त्वां माझा जीव तारिला आहे

१४ हे देवा गर्विष्ठ मजवर उठले आहेत आणि द्रोहकांचा समुदाय माझे जीवास टपतो त्यानीं आपले पुढें तुला ठेविलें नाहीं

१५ पण तूं हे प्रभो दयालु व कृपालु देव आहेस मंदक्रोध आणि बहुप्रसाद व बहुसत्य आहेस

१६ तूं वळून मला पहा आणि मजवर दया कर तूं आपलें सामर्थ्य आपले सेवकास दे आणि आपले सेवकीचे पुत्राला तार

१७ मला कुशलचिह्न दाखीव ह्मणजे माझे द्वेषक तें पाहून लज्जित होतील कारण हे ईश्वरा तूं माझें साहाय्य व समाधान केलें आहेस

## गीत ८७

१ पवित्र पर्वतावर त्याचा पाया घातला आहे

२ याकोबाचे सर्व निवासांपेक्षां जीयोनेचीं द्वारें ईश्वराला प्रिय आहेत

३ हे देवनगरा तुजविषयीं गौरवी अर्थ सांगीतलेले आहेत

४ जे मला वळखतात त्यांजवळ राहाब व बाबेल यांचें स्मरण करीन पहा कूशासंगतीं फलेशेथ व जोर तेथें हा जन्मला होता

५ आणि हा मनुष्य व तो मनुष्य तींत जन्मले होते असें जीयोनेविषयीं ह्मटलें जाईल तिला परात्पर आपणच यथास्थित स्थापील

६ ईश्वर लोकांचें लेखन करील तेव्हां गणील कीं हा तेथें जन्मला होता



७ तेथें गायक आणि वाजंत्रीहि होतील तुजमध्यें माझे सर्व झरे आहेत

## गीत ८८

१ हे ईश्वरा माझे तारणाचे देवा जेव्हां मी रात्रीं तुजपुढें ओरडतों

२ तेव्हां तुजसमोर माझी विनंती यावी माझे आरोळीस तूं आपला कान लाव

३ कां तर अरिष्टानीं माझा प्राण कंटाळला आहे आणि माझा जीव मृत्युलोकाजवळ आला आहे

४ जे खांचेंत उतरतात त्याशीं मी गणला गेलों आहें मी शक्तिहीन पुरुषासारिखा झालों आहें

५ जे मारिलेले कबरेंत निजले आहेत आणि तुझे हातापासून ते विच्छिन्न झाले आहेत म्हणून त्यांस अणखीं स्मरत नाहींस त्यांसारिखा मी मृतांशीं मिळालों आहे

६ अधम खांचेंत अंधकारांत अथाक स्थानांत मला तूं ठेविलें आहेस

७ मजवर तुझा क्रोध भारी आहे तूं आपले सर्व लाटानीं मला पीडिलें आहेस

८ तूं मजपासून माझे ज्ञाति दूर केले आहेस त्यांला मी कुत्सित होईं असें केलें आहेस मी कोंडला गेलों आहें म्हणून मला निघवत नाहीं

९ कष्टांमुळें माझा डोळा क्षीण झाला आहे हे देवा

नित्य तुला मी प्रार्थना करीत आलों आहें तुजकडे म्यां आपले हात पसरले आहेत

१० मृतांस तूं आश्चर्यकर्में दाखविशील काय प्रेतें उठून तुला स्तवितील किं काय

११ कबरेंत तुझी दया अथवा नाशस्थितींत तुझी सत्यता कथिली जाईल काय

१२ अंधकारांत तुझें आश्चर्यकार्य्य अथवा विस्मृतिभूमींत तुझें सात्विकपण जाणिलें जाईल काय

१३ हे ईश्वरा तर म्यां तुला आरोळी केली आहे आणि सकाळीं माझी प्रार्थना तुजपुढें येईल

१४ हे ईश्वरा माझे जीवाचा वीट कां मानितोस मज पासून तूं आपलें मुख कां आच्छादितोस

१५ मी कष्टी आहे व बालपणापासून मरणोपसन्न असत आलों आहें मी तुझीं भीषणें सोसून व्याकुल झालों आहें

१६ मजवर तुझा रोष चालला आहे तुझे आकस्मिक भीषमानीं मला नाहींसें केलें आहे

१७ नित्य त्यानीं पाण्यावाणीं मला घेरिलें त्यानीं एकच मला वेढिलें

१८ त्वां मजवळून स्नेही व मित्र दूर केले आहेत व माझे ज्ञाति अंधकारांत आहेत

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ८९

१ ईश्वराची परम दया मी सदा गाऊन वर्णीन मी



आपले मुखानें तुझी सत्यता पिढ्यानपिढ्यां विदित करीन

२ कारण मी ह्मणालों दया सर्वकालपर्यंत प्रतिष्ठित होईल तूं आपली सत्यता आकाशांतच स्थापिशील

३ म्यां आपले वृत्ताशीं संधा केली म्यां आपले सेवक दावीदापाशीं शपथ वाहिली आहे

४ मी तुझें संतान सर्वकालपर्यंत स्थापीन व तुझें सिंहासन पिढ्यानपिढ्यां प्रतिष्ठित करीन

५ आणि हे ईश्वरा आकाश तुझीं आश्चर्यकर्में प्रव्यक्त करील तुझी सत्यताहि पवित्रांचे मंडळींत स्तविली जाईल

६ कां तर आकाशांत ईश्वराशीं कोण संव्यूढ होईल आणि थोरांमध्यें ईश्वराला कोण उपमित होईल

७ पवित्रांचे मंडळींत देव सन्नीतोस योग्य आहे आणि त्याचे सर्व परिवाराला त्याची भीड धरावी लागत्ये

८ हे ईश्वरा सैन्यांचे देवा तुजसारिखा समर्थ ईश्वर कोण आहे व तुझी सत्यता तुजभोंवती आहे

९ समुद्राचा उल्लास तूं शासितोस त्याच्या लाटा उचंबळतात तेव्हां त्या तूं शांत करितोस

१० त्वां गर्विष्ठास वधलेल्यावाणीं ठेंचिलें त्वां आपले पराक्रमी भुजानें आपले वैरी विखरिले आहेत

११ आकाश तुझेंच पृथ्वीहि तुझीच आहे जग व त्याची पूर्त्ति यांचा पाया तूंच घातलास

१२ दक्षिणा व उत्तरा त्वां उत्पन्न केल्या ताबोर व हर्मोन तुझे नामाविषयीं उत्सव करितील

१३ तुला बलविशिष्ट भुज आहे तुझा हात पराक्रमी
तुझा उजवा हात उन्नत आहे

१४ सात्विकपण व न्याय तुझे सिंहासनाचा आधारच
आहेत दया व सत्यता तुजपुढें चालतात

१५ जे लोक उत्साहशब्द जाणतात ते धन्य ते हे ईश्वरा
तुझे मुखतेजांत चालतील

१६ ते नित्य तुझे नामाविषयीं उल्लासतील व तुझे
सात्विकपणेंकडून उंचाविले जातील

१७ कारण त्यांचें गौरवी सामर्थ्य तूंच आहेस आणि
तुझे प्रसादेंकडून आमचें शृंग उभारिलें जाईल

१८ कां तर ईश्वराकडून आमचें वारण व इस्राएलाचे
पवित्राकडून आमचा राजा आहे

१९ तेव्हां त्वां आपले साधूला दर्शनांत बोलून ह्मटलें
म्यां पराक्रमी पुरुषाला साहाय्य केलें आहे लोकांतून
निवडलेल्या एकास म्यां उंचाविलें आहे

२० दावीद माझा सेवक मला सांपडला आहे मी
आपल्या पवित्र अक्षणेंकडून त्यास अभिषिक्त केलें आहे

२१ ज्या त्याशीं माझा हात स्थिर राहील माझा भुजहि
त्याला बलयुक्त करील

२२ वैरी त्याला निकड लावणार नाहीं व अन्यायी
त्याला पीडणार नाहीं

२३ मी त्यापुढून त्याचे शत्रु पिटीन आणि त्याचे
द्वेषक हाणीन



२४ पण त्यापाशीं माझी सत्यता व दया राहतील
व माझे नामेंकडून त्याचें शृंग उभारिलें जाईल

२५ आणि समुद्रांत त्याचा हात व नद्यांत त्याचा
उजवा हात मी ठेवीन

२६ तूं माझा पिता माझा देव व माझा तारणपर्वत
आहेस असें तो मला म्हणेल

२७ मीहि त्याला प्रथमजात आणि पृथ्वींतले राजां
वर परात्पर करीन

२८ त्याजवर मी आपली दया सर्वकालपर्यंत राखीन
आणि त्याशीं माझी संधा विश्वस्त राहील

२९ आणि त्याचें संतान सर्वकालपर्यंत व त्याचें सिंहा
सन आकाशाचे दिवसांवाणीं राहूं देईन

३० जर त्याचीं लेंकरें माझा धर्मविधि सोडितील आणि
माझे न्यायांप्रमाणें चालणार नाहींत

३१ जर माझे नियोग मोडितील आणि माझ्या आज्ञा
पाळणार नाहींत

३२ तर मी त्यांचे अपराधाचें शासन दंडानें व त्यांचे
अन्यायाचें शासन फटक्यानीं करीन

३३ तथापि त्यांजवरून मी आपली दया दूर कर
णार नाहीं व आपली सत्यता मी थकूं देणार नाहीं

३४ मी आपली संधा मोडणार नाहीं आणि माझे
ओंठांतून जें निघालें तें मी पालटणार नाहीं

३५ एकदां मी आपले पवित्रतेची शपथ वाहिली मी दावीदाला असत्य बोलणार नाहीं

३६ सर्वकालपर्यंत त्याचें संतान आणि सूर्यासारिखें त्याचें सिंहासन मजपुढें राहील

३७ तें सर्वकालपर्यंत चंद्रासारिखें व आकाशांतलें विश्वस्त साक्षी असें स्थापिलें जाईल

३८ पण तूं वीट मानून त्याग केलास तूं आपले अभिषिक्तावर क्रोधयुक्त झालास

३९ तूं आपले सेवकाची संधा नाकारिली आहेस त्याचा मुकुट तूं धूळींत टाकून बाटविला आहेस

४० त्वां त्याचीं सर्व कुंपणें मोडिलीं आहेत त्याचीं दुर्गें त्वां ओसाड केलीं आहेत

४१ सर्व वाटसरूनीं त्याला लुटलें आहे तो आपले शेजाऱ्यांला निंद्य झाला आहे

४२ त्याचे शत्रूंचा उजवा हात त्वां उंचाविला आहे त्वां त्याचे सर्व वैऱ्यांस हर्षूं दिलें आहे

४३ होय त्वां त्याचे तरवारीची धार फिरविली आहे आणि त्याला युद्धांत स्थिर राहूं दिलें नाहीं

४४ तूं त्याचें तेज नाहींसें केलें आहेस व त्याचें सिंहासन धूळींत मिळविलें आहेस

४५ त्याचे यौवनाचे दिवस त्वां संक्षिप्त केले आहेत तूं त्याला लज्जेनें वेष्टिलें आहेस

४६ कोठपर्यंत हे ईश्वरा तूं लपशील सर्वकालपर्यंत तुझा रोष अग्नीसारिखा जळेल काय



४७ माझें आयुष्य किति आहे हे स्मर त्वां सर्व मनुष्यें व्यर्थ कां उत्पन्न केलीं आहेत

४८ जो मनुष्य जीवंत असत जाईल आणि मरण अनुभविणार नाहीं तो कोण तो आपला जीव मृत्युलोकाचे सत्तेंतून वांचवील किं काय

४९ हे प्रभो तुझा पूर्वप्रसाद कोठें आहे तूं आपले सत्यतेनें दावीदापाशीं शपथ वाहिलीस

५० हे प्रभो मी आपले उरांत सर्व थोर लोकांची निंदा सोसतांना तूं आपले सेवकांची निंदा स्मर

५१ जिजकडून हे ईश्वरा तुझे वैऱ्यानीं निंदिलें आहे तिजकडून त्यानीं तुझे अभिषिक्ताचीं पावलें निंदिलीं आहेत ती

५२ ईश्वर सदासर्वकाल सुवंदित असो आमेन आमेन

## महिन्याचा अठरावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ९०

१ हे ईश्वरा सर्व पिढ्यांत तूं आमचा आश्रय आहेस

२ पर्वत उत्पन्न झाल्यापूर्वीं व त्वां पृथ्वी व भूमि रचिल्यापूर्वीं अनादिकालापासून अनंतकालपर्यंत तूं देव आहेस

३ मनुष्यांस तूं मातींत मिळवितोस आणि म्हणतोस अहो मनुष्यांनो तुम्ही पालटलों जा

४ कां कीं सहस्र वर्षें तुझे देखतां क्रांत कालचे दिवसासारिखीं व रात्रींतील प्रहरासारिखीं आहेत

५ त्यांस तूं पुरावाणीं वाहून नेतोस तीं स्वप्नच आहेत सकाळीं जशी हिरवळ उगवत्ये तशीं

६ सकाळीं ती फुटून उगवत्ये सांजे कापिली जात्ये आणि सुकी होत्ये

७ तर तुझे क्रोधानें आह्मीं नाहींसे होतों व तुझे कोपानें व्याकुल होतों

८ त्वां आपल्यापुढें आमचे अन्याय व आपल्यामुख प्रकाशीं आमचीं गुप्त पातकें ठेविलीं आहेत

९ कांकीं आमचे सर्व दिवस तुझे रोषांत जातात आह्मी आपलीं वर्षें कल्पनेवारीं घालवितों

१० आमचे आयुष्याचीं सत्तर वर्षें असतात आणि शक्ती कडून जर ऐशीं वर्षें असतील तरीं त्यांचा विभव कष्ट व दुःखच आहे कां तर तो लौकर संपतो आणि आह्मी उडून जातों

११ तुझे क्रोधाचें बळ कोण जाणे आणि तुझे भयानुसारच तुझा रोष आहे

१२ आह्मास आपले दिवस गणायला असें शिकीव कीं आह्मी सुज्ञान बुद्धि पावूं

१३ हे ईश्वरा तूं फीर किति वेळापर्यंत उशीर होईल तुला आपले सेवकाविषयीं अनुताप व्हावा

१४ तूं आपले कृपेनें आम्हाला लौकर तृप्त कर मग आह्मी आपले सर्वदिवसपर्यंत हर्ष व आनंद करीत जाऊं



१५ ज्यां दिवसांत त्वां आम्हास पीडिलें ज्यां वर्षांत आह्मी कष्ट अनुभविले त्यांप्रमाणें आह्मास आनंदित कर

१६ तुझे सेवकांला तुझें कर्म व त्यांचे लेंकरांला तुझें गौरव प्रकट व्हावें

१७ आणि ईश्वर जो आमचा देव त्याचा प्रसाद आह्मावर असावा आणि आह्मासाठीं आमचे हातचें काम तूं स्थिर कर आमचे हातचें काम तूं स्थिर कर

## गीत ९१

१ तो परात्पराचे आच्छादनाखालीं बसतो तो सर्वसमर्थाचे छायेंत राहतो

२ माझा आश्रय व माझें दुर्ग असें मी ईश्वराला ह्मणतों माझा देव ज्याजवर मी विश्वासत जाईन तो

३ निश्चयें व्याधाचे पाशापासून व नाशक मरीपासून तो तुला तारील

४ तो आपले पिंसानीं तुला आच्छादील तूंहि त्यांचे पक्षांचा आश्रय धरिशील त्याचें सत्य तुझी ढाल व तुझें कवच असें होईल

५ रात्रींतला भीषम दिवसांतला उडता तीर यांस तूं भिणार नाहींस

६ जी मरी काळोखांत चालत्ये जी अभिमर्द मध्यान्हीं नाश करिते यांसहि भिणार नाहींस

७ तुझे पार्श्वास सहस्रावधि व तुझे उजवे हातास अयुतावधि पडतील पण तुशीं भिडणार नाहीं

८ केवळ आपले डोळ्यानीं अवलोकन करिशील आणि दुष्टांचें प्रतिदान पाहशील

९ कां तर हे ईश्वरा तूंच माझा आश्रय आहेस त्वां परात्पर आपलें निवासस्थान असा केला आहे

१० अरिष्ट तुजवळ येणार नाहीं व उपद्रव तुझे वस्तीशीं भिडणार नाहीं

११ कारण तुझे सर्व मार्गांत तुला रक्षायास तो आपले दूतांस आज्ञा देईल

१२ धोंड्याशीं तुझे पायाला ठेंच लागूं नये ह्मणून ते आपले हातानीं तुला उद्धरितील

१३ सिंह व जोगी सर्प तुडविशील तरुण सिंह आणि नाग सुंदडशील

१४ त्यानें माझी आवड धरिली आहे ह्मणून मी त्याला मुक्त करीन त्यानें माझें नाम जाणिलें आहे यास्तव मी त्याला उंचावीन

१५ तो मला आरोळी करील तेव्हां त्याला उत्तर देईन तो संकटांत असतांना मी त्याजवळ होईन मी त्याला मुक्त करून गौरवीन

१६ दीर्घ आयुष्यानें त्याला मी तृप्त करीन त्याला मी आपलें तारण अनुभवूं देईन

## गीत ९२

१ ईश्वराला स्तवणें आणि हे परात्परा तुझे नामला गाणें उत्तम आहे



२ सकाळीं तुझी दया आणि संध्याकाळीं तुझी सत्यता प्रव्यक्त करणेंहि

३ दशतंत्री वाद्य व वीणा व उच्चस्वरयुक्त चंग वाजवितांना

४ हे ईश्वरा तूं आपले कार्यांकडून मला हर्षित केलें आहेस म्हणून मी तुझे हस्तकर्मांविषयीं उत्सव करीन

५ हे ईश्वरा तुझीं कर्में किति थोर आहेत आणि तुझे संकल्प महागंभीर आहेत

६ पशुशील मनुष्य हें जाणत नाहीं आणि मूर्ख हें समजतच नाहीं

७ जेव्हां दुष्ट गवतावाणीं रुझतात आणि सर्व अन्यायकर्मी फुलतात ते नष्ट होऊन जावे ह्मणून तें घडतें

८ पण तूं हे ईश्वरा सनातनतः श्रेष्ठच आहेस

९ कां तर हे ईश्वरा पहा तुझे वैरी पहा तर तुझे वैरी नष्ट होतील सर्व अन्यायकर्मी विच्छिन्न होतील

१० पण माझें शृंग एकचराचे शृंगावाणीं तूं उभारिशील नव्या स्नेहणेंकडून मी अभ्यंगित होईन

११ माझे द्रोहकांवर माझें नेत्र अवलोकन करील जे दुष्कर्मी मजवर उठतात त्यांचें वर्त्तमान माझे कान ऐकतील

१२ सात्विक खर्जूरासारिखा फुलेल लेबानोनांतले एरेज वृक्षावाणीं वाढेल

१३ जे ईश्वराचे घरांत लाविलेले ते आमचे देवाचे अंगणांत उवरतील

१४ ते वृद्धपणांत असूनहि फल देत जातील ते पुष्ट व टवटवीत होतील

१५ ईश्वर यथार्थच आहे असें प्रत्यक्ष करावें म्हणून तो माझा पर्वत आणि त्याचे अंगीं कांहीं अन्याय नाहीं

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ९३

१ ईश्वर राज्य करितो तो ऐश्वर्यानें आच्छादित आहे ईश्वर प्रताप वेष्टून त्यानें आच्छादित आहे भूमिहि स्थिर स्थापिलेली आहे ती विधूनित व्हावयाची नाहीं

२ तुझें सिंहासन अनादिसिद्ध आहे अनादिकालापासून तूं आहेस

३ जलाशयानीं हे ईश्वरा जलाशयानीं आपला शब्द उंचाविला आहे जलाशय स्वसंघोष उंचावितात

४ ईश्वर जो उच्चैर्गतींत आहे तो अनेक जलांचे शब्दांपेक्षां समुद्राचे बलिष्ठ लाटांपेक्षां बलवत्तर आहे

५ तुझीं विधानें सुविश्वस्त आहेत हे ईश्वरा सदासर्वकाल पवित्रता तुझे घरास शोभते

## गीत ९४

१ ईश्वर प्रतीकारांचा देव आहे हे प्रतीकारांचे देवा प्रकट हो

२ हे पृथ्वीचे न्यायाधीशा ऊर्ध्वस्थित हो गर्विष्ठांस प्रतिदान दे



३ दुष्ट कोठपर्यंत हे ईश्वरा कोठपर्यंत दुष्ट उल्लासतील

४ ते पारुष्य उद्गारून बोलतात सर्व अन्यायकर्मी फिशारतात

५ हे ईश्वरा ते तुझे लोकांस ठेंचितात व तुझें क्षेत्र पीडितात

६ ते विधवा व विदेशी यांस वधितात आणि अनाथ पोरक्यांस हाणितात

७ आणि म्हणतात ईश्वर पाहणार नाहीं आणि याकोबाचा देव मन लावणार नाहीं

८ अहो लोकांतले पशुशील हो तुम्ही समजा आणि मूर्खांनों केव्हां तुह्मी बुद्धि पावाल

९ ज्यानें कर्ण रचिला तो ऐकणार नाहीं काय ज्यानें डोळा निर्मिला तो पाहणार नाहीं काय

१० जो विधर्म लोकांस शिक्षितो तो शासन करणार नाहीं काय जो मनुष्यास ज्ञान शिकवितो तो जाणणार नाहीं काय

११ ईश्वर मनुष्याच्या कल्पना जाणतो कीं त्या व्यर्थच आहेत

१२ हे ईश्वरा ज्या पुरुषाला तूं शिक्षितोस व आपल्या धर्मविधीकडून शिकवितोस तो धन्य आहे

१३ अशास कीं दुष्टासाठीं खांच खाणिली जाईपर्यंत तो शांत रक्षिला जावा

१४ कारण ईश्वर आपले लोकांला सोडणार नाहीं आणि आपलें क्षेत्र टाकणार नाहीं

१५ कां तर सात्विकपणाकडेस न्याय फिरेल तेव्हां सर्व यथार्थ मनाचे त्याला अनुसरतील

१६ मजसाठीं दुष्कर्म्यांवर कोण उठेल अन्यायकर्म्यांवर मजसाठीं कोण उभा राहील

१७ जर ईश्वर माझें साहाय्यसा जाला नसता तर माझा जीव निश्शब्दतेंत वसण्याचे लागास आला असता

१८ माझा पाय निसरला असें जेव्हां मी म्हणालों तेव्हां हे ईश्वरा तुझे दयेनें मला टेंका दिला

१९ माझे अंतर्यामांत बहुत भावना असतांना तुझीं सांत्वनें माझे जीवाला सुशांति देतात

२० दुष्टपणाचें जें सिंहासन नियमेंकरून अरिष्ट संकल्पितें तें तुजशीं सहायत्व करील काय

२१ ते सात्विकाचे जीवावर एकत्र उठतात आणि निर्दोष रक्त अन्यायी ठरवितात

२२ पण ईश्वर माझें दुर्ग आहे माझा देव माझा शरणपर्वत आहे

२३ त्यांचा अन्याय त्यांजवरच पडे असें देव करील त्यांच्याच दुष्टपणेंकडून त्यांस तो विच्छिन्न करील ईश्वर आमचा देव त्यांला विच्छिन्न करील

## महिन्याचा एकुणिसावा दिवस

सकाळची प्रार्थना

### गीत ९५

१ अहो या आपण ईश्वराला गाऊं आपले तारण पर्वताला उत्साहशब्द करूं



२ आपण कृतज्ञता निवेदून त्यासमोर येऊं आणि गीतें गाऊन त्याला उत्सवशब्द करूं

३ कारण ईश्वर थोर देव आहे सर्व देवांवर श्रेष्ठ राजा तो

४ ज्या त्याचे हातांत पृथ्वीचीं खोल स्थानें आहेत आणि पर्वतांचे उंचकडे त्याचे आहेत

५ ज्या त्याचाच समुद्र आहे व त्यानें तो उत्पन्न केला शुष्क भूमिहि त्याचे हस्तानीं रचिली

६ अहो या ईश्वर जो आपला उत्पादक त्यासमोर आपण भजूं पायां पडूं व गुडघे टेंकूं

७ कारण तो आमचा देव आहे आणि आह्मी त्याचे पाळणाचे लोक व त्याचे हातचा कळप आहों आज जर तुह्मी त्याचा शब्द ऐकाल

८ तर तुह्मी आपलें हृदय कठिन करूं नका जसें विवादांत जसें परीक्षेचे दिवशीं रानांत तसें

९ जेव्हां तुमचे वडलानीं माझी परीक्षा केली माझा अनुभव घेतला आणि माझीं कर्में पाहिलीं तेव्हां

१० चाळीस वर्षें त्या पिढीला मी कंटाळलों आणि म्हणालों हे भ्रांतमनाचे लोक आहेत आणि यानीं माझे मार्ग जाणिले नाहींत

११ ज्यां त्यांजविषयीं म्यां शपथ केला कीं हे माझे विसांव्यांत शिरायाचे नाहींत

## गीत ९६

१ ईश्वराला तुह्मी नवें गीत गा अहो पृथ्वींतले सर्व लोक हो ईश्वराला गा

२ तुम्ही ईश्वराला गा त्याचें नाम सुवंदित ह्मणा त्याचें तारण प्रतिदिनीं हर्षानें गाजवा

३ विधर्म लोकांत त्याचें गौरव सर्व लोकांत त्याचीं आश्चर्य्यं कर्मे प्रशंसित करा

४ कां तर ईश्वर श्रेष्ठ व परमस्तुत्य आहे सर्व देवांपेक्षां तो भयास योग्य आहे

५ कारण लोकांचे सर्व देव निरर्थक आहेत पण ईश्वरानें आकाशें उत्पन्न केलीं

६ गौरव व प्रताप त्याजपुढें आहेत सामर्थ्य व ऐश्वर्य्य त्याचे पवित्र स्थानांत आहेत

७ वर्णून द्या ईश्वराला अहो लोकांचे वंश हो ईश्वराला गौरव व सामर्थ्य वर्णून द्या

८ ईश्वराला त्याचे नामाचें गौरव वर्णून द्या दानार्थ कांहीं घेऊन त्याचे अंगणांत या

९ पवित्रतेचे शोभेनें ईश्वराला भजा अहो पृथ्वींतले सर्व लोकानों त्याचें भय धरा

१० विधर्म लोकांमध्यें तुह्मी ह्मणा ईश्वर राज्य करितो भूमि स्थिर स्थापिलेली आहे म्हणून ती विधूनित व्हावयाची नाहीं तो यथार्थपणें लोकांची न्यायाधीशी करील



११ आकाशें हर्षोत आणि पृथ्वी उल्लासो समुद्र व त्याची पूर्त्ति गर्जोत

१२ अरण्य व त्यांतील जें सर्व तें उत्सव करो ह्मणजे वनांतले सर्व वृक्ष उत्साह करितील

१३ ईश्वरासमोर कारण तो येतो पृथ्वीचा न्याय करायला येतो तो आपले सात्विकपणानें जगाचा व आपले सत्यतेनें लोकांचा न्याय करील

## गीत ९७

१ ईश्वर राज्य करितो पृथ्वी उल्लासो बहुत द्वीपें जीं आहेत तीं हर्षोत

२ त्याजभोंवते मेघ व अंधकार आहेत सात्विकपण व न्याय त्याचे सिंहासनाचा आधारच आहेत

३ त्याजपुढें अग्नि चालतो आणि समंतात त्याचे शत्रु जाळितो

४ त्याचे विजानीं जग प्रकाशिलें हें पाहून पृथ्वी कांपली

५ ईश्वरासमोरून सर्व पृथ्वीचे प्रभुसमोरून पर्वत मेणाप्रमाणें विघरले

६ आकाशानें त्याचें सात्विकपण प्रव्यक्त केलें आहे आणि सर्व लोकानीं त्याचें गौरव पाहिलें आहे

७ सर्व जे कोरींव मूर्तीची सेवा करितात जे निरर्थक मूर्तीविषयीं अभिमानी आहेत ते लज्जित होतील अहो सर्व देव हो तुह्मी त्याला भजा

८ जीयोन हें ऐकून हर्षली आणि हे ईश्वरा तुझे विधींमुळें यहूदाच्या कन्या उल्लासल्या

९ कां तर हे ईश्वरा सर्व पृथ्वीवर तूं परात्पर आहेस सर्व देवांवर तूं अत्यंत उंचावलेला आहेस

१० जे तुह्मी ईश्वरावर प्रीति ठेवितां ते तुह्मी वाइटाचा द्वेष धरा तो आपले भक्तांचे जीव रक्षितो त्यांजला दुष्टांचे हस्तांपासून मुक्त करितो

११ सात्विकासाठीं प्रकाश आणि यथार्थमनाच्यांसाठीं हर्ष पेरलेला आहे

१२ अहो सात्विक हो ईश्वराविषयीं हर्षा आणि त्याचें पवित्र नाम स्तवा

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ९८

१ ईश्वराला तुह्मी नवें गीत गा कां कीं त्यानें आश्चर्य कर्मे केलीं आहेत त्याचा उजवा हात व त्याचा पवित्र भुज त्यासाठीं विजय पावले आहेत

२ ईश्वरानें आपलें तारण कळविलें आहे विधर्म लोकांचे देखतां आपलें सात्विकपण प्रव्यक्त केलें आहे

३ तो इस्राएलावरील जी आपली दया व सत्यता ती स्मरला आहे पृथ्वीचे सर्व सीमानीं आमचे देवाचें तारण पाहिलें आहे

४ अहो पृथ्वींतले सर्व लोकानों ईश्वराला उत्साहशब्द करा ओरडत सुटा उत्सव करा गायन करा



५ चंगानें ईश्वराला चंगानें व गीताचे शब्दानें वादन गायन करा

६ ईश्वर जो राजा त्यासमोर कर्णा व शिंग वाजवून उत्साह शब्द करा

७ समुद्र गर्जो आणि त्याची पूर्त्ति भूमि व तिजवर जे राहतात ते गर्जोत

८ नद्या टाळ्या वाजवोत डोंगर मिळून उत्सव करोत

९ ईश्वरासमोर कांकीं तो पृथ्वीची न्यायाधीशी करायला येतो तो सात्विकपणें भूमीची व यथार्थपणें लोकांची न्यायाधीशी करील

## गीत ९९

१ ईश्वर राज्य करितो लोक कांपोत तो करूबांवर बसतो पृथ्वी विव्हल होवो

२ जीयोनेंत ईश्वर थोर आहे व सर्व लोकांवर तो उच्छ्रित आहे

३ ते तुझें थोर व भीतियोग्य नाम स्तवोत तें पवित्रच आहे

४ राजाचे सामर्थ्याला न्याय आवडतो तूं यथार्थपण स्थापिलें आहेस याकोबांत न्याय व सात्विकपण केलें आहेस

५ ईश्वर जो आमचा देव त्याला ते उंचावोत व त्याचे पादासनाजवळ भजोत तो पवित्रच आहे

६ त्याचे आचार्यांतले जे मोशे व अहरोन आणि त्याचे

प्रार्थकांतला जो शमूएल यानीं ईश्वराला प्रार्थिलें तेव्हां त्यानें त्यांला उत्तर दिलें

७ मेघस्तंभांतून तो त्यांला बोलत असे जो नियम व जे विधि त्यानें त्यांला दिले ते त्यानीं पाळिले

८ हे ईश्वरा आमचे देवा तूं त्यांला उत्तर देस हे देवा जरीं त्यांचे कर्मांमुळें शिक्षा करीस तरीं त्यांला क्षमा केलीस

९ ईश्वर जो आमचा देव त्याला तुह्मी उंचावा आणि त्याचे पवित्र पर्वतावर भजा कां ईश्वर आमचा देव पवित्रच आहे

गीत १००

१ अहो पृथ्वींतले सर्व लोक हो ईश्वरास उत्साहशब्द करा

२ हर्षें करून ईश्वराची सेवा करा उत्सवशब्दानें त्या समोर या

३ ईश्वर आपणच देव आहे असें तुह्मी जाणा त्यानेंच आम्हास उत्पन्न केलें आणि आम्ही त्याचे आहों त्याचे लोक व त्याचे पाळणाचा कळप

४ तुम्ही उपकारस्तुति करीत त्याचे द्वारांत व स्तवन करीत त्याचे अंगणांत जा त्याला उपकारस्तुति करा त्याचें नाम सुवंदित म्हणा

५ कां तर ईश्वर उत्तम आहे त्याची दया सनातन व त्याची सत्यता युगोयुगच आहे



गीत १०१

१ दया व न्याय यांविषयीं गाईन हे ईश्वरा तुला मी गाऊन वर्णीन

२ यथार्थ मार्गांत मी सुबुद्धीनें चालेन मजवळ केव्हां येशील मी आपले घरीं आपले मनाचे यथार्थपणें वर्त्तेन

३ कांहीं अनुचित अर्थ मी आपले नेत्रांपुढें ठेवणार नाहीं अनृजु कर्मं करणें मी द्वेषितों तें मला चिकटणार नाहीं

४ कुटिल मन मजपासून दूर असेल दुष्टास मी अंगी कारणार नाहीं

५ जो गुप्तांत आपल्या शेजाऱ्याची चहाडी करितो त्याला मी नष्ट करीन जो उच्चदृष्टीचा व गर्विष्ठमनाचा त्याला मी साहणार नाहीं

६ ते मजवळ रहावे ह्मणून देशाचे विश्वस्तांवर माझी दृष्टि होईल जो यथार्थ मार्गांत चालतो तोच माझी सेवा करील

७ माझे घरांत कपटकर्त्ता राहणार नाहीं असत्यवक्ता माझे नेत्रांपुढें टिकणार नाहीं

८ सर्व अन्यायकर्त्ते ईश्वराचे नगरांतून विच्छिन्न करावे म्हणून देशाचे सर्व दुष्ट मी नष्ट करीन

## महिन्याचा विसावा दिवस

सकाळची प्रार्थना

### गीत १०२

१ हे ईश्वरा माझी प्रार्थना ऐक आणि माझी आरोळी तुजवळ येवो

२ मजपासून तूं आपलें मुख आच्छादूं नको माझे संकटदिवशीं तूं आपला कान मजकडे लाव जेव्हां मी आरोळी मारितों तेव्हां लवकर करून मला उत्तर दे

३ कां तर माझे दिवस धुरावाणीं नष्ट होऊन गेले व माझीं हाडें चुलीसारिखीं संतप्त झालीं आहेत

४ माझें हृदय तृणावाणीं सुकून करपलें आहे ह्मणून मी आपलें अन्न खायाला विसरतों

५ माझे उच्छ्वासशब्दामुळें माझे कातडीला माझीं हाडें चिकटलेलीं आहेत

६ मी रानांतले बगळ्यासारिखा आहें जंगलांतले उलूकासदृश झालों आहें

७ मी जागत असतों आणि चिमणा जो एकला माळवदावर आहे त्यासारिखा मी असतों

८ सारादिवस माझे वैरी मला निंदितात व मजवर जे उन्मत्त झालेले आहेत त्यानीं मजप्रतिकूल शपथ केला आहे

९ कां तर म्यां भाकरीप्रमाणें राख खाल्ली आहे व आपलें पाणी आंसवानी मिसळिलें आहे



१० तुझे रोषामुळें व तुझे कोपामुळें कारण त्वां मला उंचावून ध्वस्त केलें आहे

११ माझे दिवस टळल्ये छायेतुल्य आहेत आणि मी तृणावाणीं सुकून गेलों आहें

१२ पण तूं हे ईश्वरा सनातनतः राहतोस आणि तुझें स्मरण युगेयुगच आहे

१३ तूं उठून सीयोनेवर दया करिशील कांकीं तिजवर कृपाकरण्याची वेळ आली आहे नेमिला समयच आला आहे

१४ कां तर तुझे सेवक तिचे धोंड्यांस प्रिय करितात व तिचे धुळीची आवड धरितात

१५ आणि विधर्म लोक ईश्वराचे नामाला भितील आणि पृथ्वींतले सर्व राजे तुझे गौरवाला

१६ जेव्हां ईश्वर सीयोन बांधील तेव्हां तो आपले गौरवानें प्रकट होईल

१७ दुर्बलांचे प्रार्थनेला तो आपलें मन लावील आणि त्यांची प्रार्थना तुच्छ मानणार नाहीं

१८ पुढले पिढीला हें लिहिलें जातें आणि जे लोक उत्पन्न होतील ते ईश्वराला स्तवितील

१९ कां तर त्यानें आपले पवित्रस्थानाचे उच्चतेवरून अवलोकन केलें ईश्वरानें आकाशांतून पृथ्वी पाहिली आहे

२० बंदिवानाचा उच्छ्वास ऐकायला आणि जे मरणास नेमलेले त्यांला मुक्त करायाला

२१ जीयोनेंत ईश्वराचें नाम व येरूशालेमेंत त्याची स्तुति कथवायाला

२२ जेव्हां ईश्वराची सेवा करायास लोक व राज्यें एकत्र मिळतील तेव्हां

२३ त्यानें माझी शक्ति मार्गांत थकू दिली आहे आणि माझे दिवस उणे केले आहेत

२४ मी ह्मणालों हे माझे देवा माझे अर्द्धायुष्यांत मला काढून घेऊं नको तुझीं वर्षें युगायुगच आहेत

२५ पूर्वीं तूं पृथ्वीचा पाया घातलास आणि आकाशें तुझें हस्तकर्मच आहेत

२६ तीं नष्ट होतील परंतु तूं टिकशील तीं सर्व वस्त्रावाणीं जीर्ण होतील त्यांला पांघरूणासारिखें तूं पालटशील व तीं पालटलीं जातील

२७ पण तूं तसाच राहशील आणि तुझीं वर्षें सरणार नाहींत

२८ तुझे सेवकांचीं लेंकरें स्वस्थ वस्ती करितील आणि त्यांची संतति तुजपुढें स्थापिली जाईल

## गीत १०३

१ हे माझे जीवा ईश्वराला सुवंदित ह्मण व माझे सर्व अंतर्यामा त्याचें पवित्र नाम सुवंदित ह्मण

२ हे माझे जीवा ईश्वराला सुवंदित ह्मण आणि त्याचे सर्व उपकार विसरूं नको



३ तो तुझे सर्व अन्याय क्षमा करितो व तुझे सर्व रोग बरे करितो

४ तो तुझें आयुष्य नाशांतून उद्धरितो व तुजला दयाकरूणानी मुकुटमंडित करितो

५ तो तुझें वृद्ध आयुष्य उत्तम पदार्थानीं तृप्त करितो खभ्रांतीसारिखें तुझें यौवन नवें होतें

६ सर्व जे अन्यायानें पीडित आहेत त्यांसाठीं ईश्वर सात्विकपण व न्याय करितो

७ त्यानें मोशेला आपले मार्ग व इस्राएलाला आपलीं चरित्रें कळविलीं

८ ईश्वर कृपालु व दयालु मंदक्रोध व बहुप्रसाद आहे

९ तो सदा गर्ह्हण करणार नाहीं आणि सर्वकालपर्यंत रोष धरणार नाहीं

१० त्यानें आमचे पातकांप्रमाणें आह्मांला केलें नाहीं आणि आमचे अन्यायांप्रमाणें आह्मांला परत दिलें नाहीं

११ कां तर जसें आकाश पृथ्वीवर उच्छ्रित आहे तशी त्याची दया त्याचे भक्तांवर प्रभूत आहे

१२ जशी पूर्व पश्चिमेपासून दूर आहे तसे त्यानें आमचे अपराध आह्मापासून दूर केले आहेत

१३ जसा बाप आपले लेंकरांवर दया करितो तसा ईश्वर आपले भक्तांवर दया करितो

१४ कारण तो आमची प्रकृति जाणतो आह्मी धूळिच आहों असें तो स्मरतो

१५ मनुष्य कसा त्याचें आयुष्य तृणासारिखें आहे जसें
रानांतलें फूल तसा तो फुलतो
१६ कां वारा त्याजवर जातो तेव्हां तें नाहींसें होतें
आणि त्याचें ठिकाण त्याला पुनः ओळखणार नाहीं
१७ पण ईश्वराची दया अनादिकालापासून अनंतकाल
पर्यंत त्याचे भक्तांवर आहे आणि त्याचें सात्विकपण त्यांचे
लेंकरांचे लेंकरांजवळ आहे
१८ जे त्याची संधा पाळितात व त्याच्या आज्ञा आचरा
यासाठीं जे स्मरतात त्यांजवळहि आहे
१९ ईश्वरानें आपलें सिंहासन आकाशांत स्थापिलें आहे
आणि त्याचें राज्य सर्व जगावर चालतें
२० अहो ईश्वराचे दूत हो जे तुह्मी बलपराक्रमी अस
तांना त्याचे वचनाचा शब्द ऐकून त्याची आज्ञा साधितां
ते तुह्मी त्याला सुवंदित ह्मणा
२१ अहो ईश्वराचे सर्व सैन्यानों जीं तुह्मी त्याचीं सेवक
असतांना त्याचा मनोदय साधितां तीं तुह्मी त्याला सुवं
दित म्हणा
२२ अहो ईश्वराचे सर्व उत्पन्न पदार्थ हो त्याचे राज्याचे
सर्व स्थानांत तुह्मी त्याला सुवंदित ह्मणा हे माझे जीवा
ईश्वराला सुवंदित ह्मण

संध्याकाळची प्रार्थना

### गीत १०४

१ हे माझे जीवा ईश्वराला सुवंदित म्हण हे ईश्वरा



माझे देवा तूं अत्यंत थोर आहेस ऐश्वर्यप्रतापानें वेष्टिला
आहेस
२ वस्त्राप्रमाणें प्रकाशानें तूं आपणास आच्छादितोस
छत्राप्रमाणें आकाश पसरितोस
३ तो आपल्या माड्या जलांत रचितो तो आपला
रथ मेघ करितो तो वाऱ्याचे पक्षांवर चालतो
४ तो वारे आपले दूत ज्वलदग्नि आपले सेवक करितो
५ त्यानें पृथ्वीचा पाया तिचे आधारांवर घातला
आहे ती कधीं विधूनित होणार नाहीं
६ वस्त्राप्रमाणें जलाशयानें तिला तूं आच्छादिलेंस पर्व
तांवर जलें राहिलीं
७ तुझे धमकीनें तीं पळालीं तुझे स्तनितशब्दानें तीं
त्वरा करून गेलीं
८ तीं पर्वतांवर चढून खोऱ्यांतून उतरतात जो आधार
त्यांसाठीं त्वां स्थापिला आहे त्यांत
९ त्यानीं अतिक्रमून पृथ्वी बुडवायाला परत येऊं नये
ह्मणून त्वां सीमा ठरविलेली आहे
१० तो खोऱ्यांत झरे पाठवितो ते डोंगरांमध्यें वाहतात
११ ते रानांतल्या पशूंला प्यायला देतात अरण्यगर्द्दभ
आपली तहान भागवितात
१२ त्यांजवळ आकाशपक्षी वस्ती करितात ते फांद्यांमध्यें
गातात
१३ तो आपले माड्यांतून डोंगर शिंपितो तुझे उत्पन्न
पदार्थांचे फलानें पृथ्वी तृप्त होते

१४ तो पशूंसाठीं गवत आणि मनुष्याचे उपयोगासाठीं उद्भिद रूजवितो पृथ्वींतून अन्न निघे असें करावें म्हणून

१५ आणि द्राक्षारस जो मनुष्याचें हृदय आनंदित करितो मेदेंकडून त्याचें मुख तेजोयुक्त करायला आणि अन्न जें मनुष्याचें हृदय स्थिरावितें

१६ ईश्वराचे वृक्ष लेबानोनाचे जे श्रेष्ठ वृक्ष त्यानें लाविले आहेत ते रसभरित आहेत

१७ ज्यां त्यांत पक्षी आपलीं कोटीं बांधितात प्रेथोपत्य त्याचें घर महादारू आहे

१८ उंच पर्वत अरण्यछगलांचा आणि कडे अरण्याखूंचा आश्रय आहेत

१९ समयपरिमाणार्थ त्यानें चंद्र नेमिलेला आहे सूर्य्य आपला अस्त जाणतो

२० अंधकार होई असें करितोस तेव्हां रात्र पडत्ये तींत जंगलांतले सर्व पशु निघून फिरतात

२१ सिंह आहारासाठीं गर्जतात आणि देवापाशीं आपलें भक्ष्य मागतात

२२ सूर्य्य उगवतो तेव्हां ते आश्रय घेतात आणि आपलें गुहांत निजतात

२३ मनुष्य आपल्या कामास व संध्याकालपर्यंत आपले श्रमास बाहेर जातो

२४ हे ईश्वरा तुझीं कार्यें किति बहुविध आहेत तीं



सर्वं त्वां बुद्धीकडून उत्पन्न केलीं आहेत तुझे धनानें पृथ्वी भरलेली आहे

२५ तसाच हा विपुल व विस्तीर्ण समुद्र यांत असंख्य चराचर श्रेष्ठ कनिष्ठ जीवजंतु आहेत

२६ यांत गलबतें चालतात यांत खेळायासाठीं जो लिव्याथान त्वां निर्माण केला आहे हाहि आहे

२७ त्वां सुसमयीं त्यांस भक्ष्य द्यावें म्हणून ते सर्व तुझी प्रतीक्षा करितात

२८ जें त्यांला देतोस तें ते टिपून घेतात तूं आपला हात उघडतोस ते उत्तम पदार्थांनीं तृप्त होतात

२९ तूं आपलें मुख आच्छादितोस तेव्हां ते व्याकुल होतात त्यांचा श्वास काढितोस तेव्हां ते प्राण सोडून आपल्या धूळीस मिळतात

३० तूं आपला आत्मा प्रतिसृष्ट करितोस तेव्हां ते उत्पन्न होतात आणि भूमीची पाठ तूं नवसरतोस

३१ ईश्वराचें गौरव सनातनतः राहील ईश्वर आपले कर्मांविषयीं आनंदेल

३२ तो पृथ्वीवर दृष्टि लावितो तेव्हां ती कांपत्ये तो पर्वतांला स्पर्शितो तेव्हां ते धुमतात

३३ माझें आयुष्य संपेपर्यंत मी ईश्वराला गाईन जों पर्यंत मी आहें तोंपर्यंत आपले देवाला गाऊन वर्णीन

३४ त्याजविषयीं माझें ध्यान संतोषावह होईल ईश्वरा विषयीं मी हर्षेन

३५ पातकी पृथ्वींतून निश्शेष होऊन जावे आणि दुष्ट नाहींसे व्हावे हे माझे जीवा ईश्वराला सुवंदित ह्मण तुह्मी ईश्वराला स्तवा

## महिन्याचा एकविसावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत १०५

१ ईश्वराला उपकारस्तुति करा त्याचे नामाला आह्वति करा लोकांला त्याचीं चरित्रें कळवा

२ त्याला गायन करा त्याला वादन करा गीत गाऊन त्याचीं सर्व आश्चर्यकर्में वर्णी

३ त्याचे पवित्र नामाविषयीं गौरव माना जे ईश्वरास अन्वेषितात त्यांचें हृदय हर्षो

४ ईश्वरास व त्याचे सामर्थ्यास शोधा नित्य त्याचें मुख अन्वेषा

५ त्यानें जीं आश्चर्यकर्में केलीं आहेत तीं स्मरा त्याचे चमत्कार व त्याचे मुखचे विधि आठवा

६ हे आब्राहामाचे संतति जो तूं त्याचा सेवक आणि हे याकोबाचे वंशा जो तूं त्याचा निवडलेला ते

७ तो ईश्वर आमचा देव आहे सर्व पृथ्वींत त्याचे न्याय आहेत

८ तो सदा आपली संधा व सहस्र पिढ्या आपलें वचन स्मरला आहे



९ जी संधा त्यानें आब्राहामाशीं केली ती व जो शपथ त्यानें इजूहाकाशीं केली ती स्मरली

१० आणि याकोबासाठीं नियमार्थ व इस्राएलासाठीं सनातन संधार्थ त्यानें ती शपथ ठरविली

११ आणि ह्मटलें कानाअनदेश तुझा क्षेत्राचा वांटासा मी तुला देईन

१२ जेव्हां ते केवळ थोडे असून त्या देशांत आगंतुक होते

१३ आणि ते देशोदेश व एका राज्यांतून दुसऱ्या लोकांत फिरत असत तेव्हां

१४ त्यानें मनुष्याला त्यांस उपद्रव करूं दिला नाहीं व त्यांजकरितां त्यानें राजांना धमकाविलें

१५ माझे अभिषिक्तांस स्पर्शूं नका आणि माझे उपदेशकांस अरिष्ट नका करूं

१६ तेव्हां त्यानें देशावर दुष्काल बलाविला त्यानें भाकरीची सर्व काठी मोडिली

१७ त्यानें त्यांजपुढें एक पुरुष पाठविला दास व्हायला योसेफ विकला गेला

१८ त्यानीं त्याचे पाय बेडीनें पीडिले त्याचे जीवांत लोखंड शिरलें

१९ त्याची गोष्ट येईपर्यंत ईश्वराचे वचनानें त्याला पारखिलें

२० राजानें पाठवून त्याला सोडिलें लोकांचे शास्त्यानें धाडून त्याला मुक्त केलें

२१ तो त्यानें आपल्या घरावर प्रभु व आपलें सर्व धना वर अधिकारी असा ठेविला

२२ त्याचे अधिपतींला आपले इच्छेप्रमाणें बांधायाला आणि त्याचे वडलांस ज्ञान शिकवायाला

२३ तर इस्राएल मिसरांत आला आणि याकोबानें हामाचे देशांत प्रवास केला

२४ तेव्हां त्याचे लोक देवानें फार वाढविले आणि त्यांस त्यांचे शत्रूंपेक्षां बलिष्ठ केलें

२५ त्याचे लोकांस द्वेषायला आणि त्याचे सेवकांवर कपट करायला त्यानें त्यांचें मन फिरविलें

२६ त्यानें आपला सेवक जो मोशे व अहरोन जो त्यानें निवडला होता ते दोघे पाठविले

२७ त्यानीं त्यांमध्यें त्याचे चमत्कार हामाचे देशांत उत्पात दाखविले

२८ त्यानें अंधकार पाठवून काळोखी केली तेव्हां ते त्याचा आज्ञाविरोध करितां राहिले

२९ त्यानें त्यांचें पाणी पालटून रक्त केलें व त्यांचे मासे मारून टाकिले

३० त्यांचे देशांत त्यांचे राजांचे कोठड्यांत बेडूक उत्पन्न होऊन व्यापले

३१ त्यानें आज्ञा केली तेव्हां गोमाशा आल्या त्यांचे सर्व सीमांत चिलटें आलीं



३२ त्यांचे पावसाचे स्थानीं त्यानें गार दिली व त्यांचे देशांत ज्वलदग्नि दिला

३३ आणि त्यानें त्यांच्या द्राक्षा व अंजीर करपविले व त्यांचे सीमांतले वृक्ष मोडून टाकिले

३४ त्यानें आज्ञा दिली तेव्हां टोळ आले आणि असंख्य घुलीं आलीं

३५ तेव्हां त्यानीं त्यांचे देशांतले सर्व उद्भिद खाल्ले आणि त्यांचे भूमीवरलें सर्व फल खाऊन टाकलें

३६ आणि त्यांचे देशांतले सर्व प्रथम जात त्यांचे सर्व शक्तीचें मुख्य फल त्यानें मारिलें

३७ त्यानें त्यांस सुवर्ण रूप्ययुक्त बाहेर आणिलें व त्यांचे वर्गांत कोणी दुर्बल नव्हता

३८ ते निघाले तेव्हां मिसर देशांतले लोक हर्षले कारण त्यांचें भय त्यांला लागलें होतें

३९ आच्छादनासाठीं मेघ आणि रात्रीं प्रकाश पाडा यासाठीं अग्निमेघ त्यानें पसरिला

४० लोकानीं मागीतलें तेव्हां त्यानें वर्त्तक आणिले आणि दिव्य अन्नें करून त्यांला तृप्त केलें

४१ त्यानें खडक फोडिला तेव्हां पाणी निघून वाहिलें तें नदीप्रमाणें रूक्ष भूमींत चालिलें

४२ तो आपलें पवित्र वचन आणि आपला सेवक आब्राहाम यांस स्मरला

४३ तेव्हां त्यानें आपले लोक हर्षयुक्त व आपले निव डलेले उत्सवयुक्त बाहेर आणिले

४४ आणि त्यांस विधर्म लोकांचे देश दिले तेव्हां त्यानीं त्यां लोकांचें श्रमफल भोगिलें

४५ अशासाठीं कीं त्यानीं त्याचे नियम राखावे व त्याच्या आज्ञा पाळाव्या तुह्मी ईश्वराला स्तवा

संध्याकालची प्रार्थना

## गीत १०६

१ तुह्मी ईश्वराला स्तवा ईश्वराला उपकारस्तुति करा कारण तो उत्तम आहे त्याची दया सनातन आहे

२ ईश्वराचीं बलविशिष्ट कर्मे कथायास व त्याची सर्व स्तुति विश्रुत करायास कोण समर्थ आहे

३ जे न्याय राखितात ते धन्य जो सर्वदा सात्विकपण आचरितो तोहि

४ हे ईश्वरा तूं आपल्या सेवकांवरचे प्रीतीनें मला स्मर तूं आपल्या तारणेंकडून मला आसन्न हो

५ अशासाठीं कीं म्यां तुझे वृतांचें हित अनुभवावें तुझे लोकांचे हर्षानें आनंदावें व तुझे क्षेत्रासहित गौरव मानावें

६ आह्मीं आपलें पूर्वजांसहित पाप केलें आह्मीं अन्याय केला आह्मीं दुष्टपण केलें आहे

७ आमचे पूर्वजानीं मिसरांत तुझीं आश्चर्यकर्मे ध्यानांत धरिलीं नाहींत ते तुझे बहुत उपकार स्मरले नाहींत आणि समुद्राजवळ तांबडे समुद्राजवळ ते खेरी झाले

८ तथापि त्यानें आपलें नामाकरितां आपले सामर्थ्य दाखवायासाठीं त्यांला तारिलें



९ त्यानें तांबडे समुद्राला धमकाविलें तेव्हां तो शुष्क झाला मग त्यानें त्यांला जसें मैदानांतून तसें खोल स्थानां तून चालूं दिलें

१० आणि द्वेष्याचे हस्तापासून त्यांला तारिलें व वैऱ्याचे हातापासून त्यांला उद्धरिलें

११ तेव्हां जलानीं त्यांचे शत्रु बुडविले त्यांतला कोणी एक वांचला नाहीं

१२ मग ते त्याचे वचनांवर विश्वासले त्यानीं त्याची स्तुति गाइली

१३ ते त्याचीं कर्मे लौकरच विसरले त्यानी त्याचे संबोधाची प्रतीक्षा केली नाहीं

१४ त्यानीं रानांत फार लोभ केला आणि जंगलांत देवाची परीक्षा केली

१५ तेव्हां त्यानें त्यांचें याचित त्यांजला दिलें परंतु त्यांचे जीवांत कृशत्व पाठविलें

१६ छावणींत त्यानीं मोशेवर व ईश्वराचा साधु जो अहरोन त्याजवरहि ईर्ष्या केली

१७ पृथ्वीनें फाटून दाथानास गिळिलें अबीरामाचे समुदायास झांकिलें

१८ तेव्हां त्यांचे मंडळींत अग्नि पेटला ज्वाळानें दुष्टांस जाळून टाकिलें

१९ होरेबांत त्यानीं गोवत्स निर्मिला आणि ओतींव मूर्त्तीला भजलें

२० आणि तृणभक्षक वृषाची प्रतिमा करून त्यानीं आपलें गौरव पालटिलें

२१ ज्या देवानें त्यांला तारिलें होतें आणि मिसरांत महाकर्में हामाचे देशांत आश्चर्य्यकर्में तांबडें समुद्राजवळ भयंकर कर्में केलीं होतीं त्याला ते विसरले

२२ तेव्हां त्यानें त्यांचा नाश करायाची आज्ञा दिली असती जर मोशे जो त्याचा दूत तो भगाडांत त्यासमोर त्याचा क्रोध नाशिण्यापासून निवारायास उभा राहिला नसता

२३ त्यानीं रम्य देश तुच्छ मानिला ते त्याचे वचनावर विश्वासले नाहींत

२४ तेव्हां ते आपले डेऱ्यांत धुसमुसले आणि ईश्वराचा शब्द ऐकेनात

२५ यास्तव त्यांला रानांत पाडायास त्यानें आपला हात त्यांजवर उगारिला

२६ त्यांची संतति विधर्म लोकांत ध्वस्त करायला आणि अन्यदेशांत त्यांला विखरायला

२७ बाअल फेओरास ते आसक्त झाले आणि मृतांचे यज्ञबलि त्यानीं खाल्ले

२८ तर त्यानीं आपले दुष्कर्मानीं त्याला रुष्ट केलें तेव्हां त्यांजमध्यें उपद्रव शिरला

२९ तेव्हां फीनेहासानें उभें राहून न्याय केला नंतर उपद्रव नियत झाला



३० तेंहि पिढ्यानपिढ्यां सर्वकालपर्यंत त्यासाठीं पुण्यसें गणिलें गेलें

३१ विवादाचे पाण्याजवळहि त्यानीं त्याला रोषविलें आणि त्यांचे कारणें मोशेला अरिष्ट झालें

३२ कारण ते त्याचे आत्म्याविरुद्ध खेरी झाले ह्मणून तो आपल्या ओंठानीं अविचारें करून बोलिला

३३ ज्यां लोकांविषयीं ईश्वरानें त्यांस आज्ञा दिली होती त्यांजला त्यानीं नष्ट केलें नाहीं

३४ पण ते विधर्म लोकांशीं मिश्रित होऊन त्यांचीं कर्में शिकले

३५ त्यांचे मूर्त्तींसहि त्यानीं भजलें आणि त्यांला त्या पाशरूप झाल्या

३६ त्यानीं आपले पुत्र व आपल्या कन्या भूतांस बलिरूप अर्पिल्या

३७ त्यानीं निर्दोष रक्त पाडिलें आपले जे पुत्र व आपल्या ज्या कन्या त्यानीं कानाअनाचे मूर्त्तींस बलिरूप अर्पिल्या त्यांचें रक्त पाडिलें आणि भूमि रक्तानें विटाळली गेली

३८ तर ते आपले कर्मांकडून विटाळले गेले आणि आपले दुष्कर्मांकडून त्यानीं व्यभिचार केला

३९ यास्तव ईश्वराचा क्रोध त्याचे लोकांवर संतप्त झाला व त्यानें आपले क्षेत्राचा वीट मानिला

४० तेव्हां त्यानें त्यांजला विधर्म लोकांचे हातीं दिलें आणि त्यांचे द्वेषकानीं त्यांजवर प्रभुत्व केलें

४१ त्यांचे वैऱ्यानींहि त्यांस पीडिलें आणि त्यांचे हाता खालीं ते दुणून गेले

४२ बहुत वेळां त्यानें त्यांस मुक्त केलें पण ते आपले संकल्पानें निर्धंचण होत असतां आपले अन्यायानें क्षीण झाले

४३ तथापि त्यानें त्यांची आरोळी ऐकून त्यांचे संकटाला मन लाविलें

४४ त्यांजविषयीं तो आपली संधा स्मरला व आपले परम करुणेप्रमाणें अनुतापला

४५ ज्यानीं त्यांला बंदीवानसें नेलें त्यां सर्वांसमोर त्यानें त्यांला करुणार्थ होऊं दिलें

४६ हे ईश्वरा आमचे देवा आम्हाला तार आणि तुझें नाम स्तवायास व तुझे प्रशंसेंत गौरव मानायास आम्हाला विधर्म लोकांतून एकच मिळीव

४७ ईश्वर जो इस्राएलाचा देव त्याला अनादिकाला पासून अनंतकालपर्यंत सुवंदित ह्मणावें आणि सर्व लोकानीं आमेन असें बोलावें तुह्मी ईश्वराला स्तवा

## महिन्याचा बेविसावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत १०७

१ तुह्मी ईश्वराला स्तवा कारण तो उत्तम आहे व त्याची दया सनातन आहे



२ असें ईश्वराचे उद्धरलेले ह्मणोत जे शत्रूचे हातांतून त्यानें उद्धरले आहेत ते

३ जे विविध देशांतून पूर्वेतून व पश्चिमेंतून उत्तरेंतून व दक्षिणेंतून त्यानें एकवटले आहेत ते

४ ते अरण्यांत निर्मार्ग जंगलांत फिरत असत त्यांला निवासनगर मिळेना

५ ते भुकेले व तहानेले असतांना त्यांचा जीव त्यांचे ठायीं मूर्च्छित झाला

६ तेव्हां त्यानीं आपले कष्टांत ईश्वराला आरोळी केली आणि त्यांचे संकटांतून त्यानें त्यांला मुक्त केलें

७ व त्यानीं निवासनगरास जावें ह्मणून त्यानें त्यांला नीट मार्गांत चालविलें

८ त्याचे दयेकरितां व त्याचे मनुष्यांकडील आश्चर्य कर्मांकरितां मनुष्यें ईश्वराला स्तवोत

९ कारण तो स्पृहालु जीवास तृप्त करितो व उत्तम पदार्थांनीं भुकेले जीवास भरितो

१० जे कष्टानीं व लोखंडानें बांधिलेले असतां अंधकारांत व मृत्युच्छायेंत बसतात ते

११ कारण ते ईश्वराचे आज्ञाप्रतिकूल निर्धंचण झाले आणि परात्पराचा संबोध त्यानीं तुच्छ मानिला

१२ यास्तव त्यानें कष्टांकडून त्यांचें मन विषण्ण केलें ते गळून पडले आणि साहाय्यकर्ता कोणी नव्हता

१३ तेव्हां त्यांनीं आपले कष्टांत ईश्वरास आरोळी केली व त्यांचे संकटांतून त्यानें त्यांला तारिलें

१४ त्यानें त्यांस अंधारांतून व मृत्युच्छायेंतून बाहेर आणिलें व त्यांचीं बंधनें तोडून टाकिलीं

१५ त्याचे दयेकरितां व त्याचे मनुष्यांकडील आश्चर्यकर्मांकरितां मनुष्यें ईश्वराला स्तवोत

१६ कांकीं त्यानें पितळाचीं द्वारें मोडिलीं व लोखंडाचे अडसर तोडिले

१७ मूर्ख आपल्या दुराचारांमुळें व आपले अन्यायांमुळें पीडिले जातात

१८ त्यांचा जीव सर्व भक्ष्यास कंटाळतो व ते मृत्युद्वारा जवळ येतात

१९ तेव्हां ते आपले कष्टांत ईश्वरास आरोळी करितात आणि तो त्यांला त्यांचे संकटांतून तारितो

२० त्यानें आपलें वचन पाठवून त्यांस बरें केलें आणि त्यांचे नाशदशांतून त्यांला सोडिलें

२१ त्याचे दयेकरितां व त्याचे मनुष्यांकडील आश्चर्यकर्मांकरितां मनुष्यें ईश्वराला स्तवोत

२२ आणि उपकारस्तुतीचीं बलिदानें अर्पोत व उत्सवानें त्याचीं कर्में कथोत

२३ जे गलबतांवर बसून समुद्रांतून जातात जे महाजलांत उद्योग करितात



२४ ते ईश्वराचीं कृत्यें आणि अथाक पाण्यांत त्याचीं आश्चर्यकर्में पाहतात

२५ तर तो आज्ञा देऊन वादळ उठवितो तेव्हां तो त्याच्या लाटा उंचावितो

२६ ते आकाशांकडे चढतात अथाक पाण्यांत उतरतात पीडेनें त्यांचा जीव गळून जातो

२७ ते मद्यग्रस्तावाणीं भ्रमतात व भेलकंडतात आणि त्यांची सर्व बुद्धि बुडत्ये

२८ तेव्हां ते आपले कष्टांत ईश्वरास आरोळी करितात आणि त्यांचे संकटांतून तो त्यांला बाहेर आणितो

२९ वादळ निवात होई असें करितो तेव्हां त्याच्या लाटा निश्शब्द होतात

३० त्या शांत झाल्या आहेत म्हणून ते हर्षतात आणि तो त्यांचे इष्ट बंदरास त्यांला आणितो

३१ त्याचे दयेकरितां व त्याचे मनुष्यांकडील आश्चर्यकर्मांकरितां मनुष्यें ईश्वराला स्तवोत

३२ आणि लोकांचे सभेंत त्याला उंचावोत आणि वडिलांचे मंडळींत त्याला स्तवोत

३३ नद्या जंगल होत आणि पाण्याचे झरे शुष्क भूमि होत असें तो करितो

३४ फलद देश त्याचे निवास्यांचे दुष्टपणामुळें रुक्ष भूमि होई असें करितो

३५ अरण्य जलाशय होई आणि शुष्क भूमि जलों
द्गम होई असें करितो

३६ आणि भुकेले तेथें रहात असें करितो तेव्हां ते
निवासनगर सिद्ध करितात

३७ आणि शेतें पेरितात व द्राक्षीचे मळे लावितात
तेव्हां ते उपजाचीं फळें देतात

३८ तोहि त्यांला आशी देतो तेव्हां ते फार वाढ
तात आणि त्यांचीं गुरें तो न्यून होऊं देत नाहीं

३९ मग उपद्रव अरिष्ट व पीडा यांकडून ते न्यून
होऊन धुळीस मिळतात

४० तो अधिपतींवर अनादर ठेवितो आणि निर्माग
शून्य भूमींत त्यांला फिरूं देतो

४१ तो दरिद्र्यास दुर्दशेंतून उंचावितो आणि कळ
पावाणीं त्याचे संतान होत असें करितो

४२ यथार्थ जन पाहून हर्षतील आणि सर्व अन्याय
आपलें तोंड बंद करील

४३ कोण बुद्धिमान तर तो हे अर्थ ध्यानांत धरो
आणि ईश्वराची परमदया ते समजोत

संध्याकाळची प्रार्थना

## गीत १०८

१ हे देवा माझें मन स्थिर आहे मी आपले गौर
वानें गाऊन स्तवन करीन



२ अहो वीणा व चंग ही जागृत व्हा मीहि पहां
टेस जागृत होईन

३ हे ईश्वरा लोकांत मी तुला स्तवीन आणि समुद्रा
यांत तुला गाईन

४ कारण तुझी दया आकाशावरतीं थोर आहे आणि
आभाळापर्यंत तुझें सत्य आहे

५ हे देवा तूं आकाशावरतीं उंचावला जा आणि तुझें
गौरव सर्व पृथ्वीवर उंचावलें जावो

६ तुझे प्रिय लोक मुक्त व्हावे ह्मणून तूं आपले उजवे
हातानें तारण कर आणि मला उत्तर दे

७ देव आपले पवित्रतेनें बोलिला आहे मी उत्सव
करीन मी शेकेम वांटीन आणि सुक्कोथाचें खोरें मोजून
देईन

८ गिलाद् माझा आहे मनाश्शे माझा आहे एफ्रा
ईम माझें मुख्य सामर्थ्य आहे यहूदा माझा नियमकर्त्ता
आहे

९ मोआब माझें क्षालनपात्र आहे एदोमावर मी आपला
जोडा फेंकीन फेलशेथेवर मी उत्सव करीन

१० कोटव्हत नगरांत मला कोण आणील एदोमांत
मला कोण नेईल

११ हे देवा तूं आमचा वीट मानिला नाहींस काय
आणि हे देवा तूं आमचे सैन्यांसंगतीं बाहेर जाणार
नाहींस काय

१२ संकटांतून आम्हास साहाय्य कर कां मनुष्याचा उपाय व्यर्थच आहे

१३ देवाकडून आह्मी पराक्रम करूं आणि तोच आमचे शत्रु तुडवील

गीत १०९

१ हे माझे स्तवनाचे देवा तूं मुका राहूं नको

२ त्यानीं दुष्ट मुख व कपटयुक्त मुख मजवर उघडिलें आहे मजवर ते असत्य जिव्हेनें बोलिले आहेत

३ द्वेषाचे शब्द बोलून त्यानीं मला वेढिलें आणि रक्कावीच मजवर लढाई केली

४ माझे प्रीतीचे स्थानीं ते द्रोह करितात पण मी प्रार्थना करितों

५ आणि उपकाराचे स्थानीं अरिष्ट व माझे प्रीतीचे स्थानीं द्वेष त्यानीं मला परत केला आहे

६ त्याजवर दुर्जनाला अधिकार दे आणि त्याचे उजवे हाताकडे सैतान उभा राहो

७ त्याजवर न्यायाधीशी केली असतां तो अन्यायी निघो आणि त्याची प्रार्थना पापच होवो

८ आणि त्याचे दिवस थोडे होवोत व त्याचा अधिकार दुसरा घेवो

९ त्याचीं लेंकरें अनाथ होवोत व त्याची स्त्री विधवा होवो



१० त्याचीं लेंकरें फिरत फिरत भीक मागोत आणि आपले ओसाड स्थानांतून अन्न शोधोत

११ सर्व जें त्याचें आहे तें उत्तमर्ण हरो आणि परके त्याचें श्रमफल लुटोत

१२ त्याला दयारक्षक कोणी न होवो आणि त्याचे अनाथ लेंकरांवर कृपाकर्त्ता कोणी न होवो

१३ त्याची संतति विच्छिन्न होवो पुढले पिढींत त्याचें नाम खोडिलें जावो

१४ त्याचे वडलांचा अन्याय ईश्वराकडे स्मरला जावो व त्याचे आईचें पातक पुसलें न जावो

१५ तीं ईश्वराचे देखतां सर्वदा राहोत आणि पृथ्वींतून त्यांचें स्मरण तो विच्छिन्न करो

१६ कारण तो दयाकरणें स्मरला नाहीं पण दीन व दरिद्री मनुष्याचे आणि वधण्यापर्यंत खेदग्रस्त मनाच्याचे पाठीस लागला

१७ शापदेणें त्याला आवडलें म्हणून तो त्याला लागो आशीर्वाद देणें त्याला आवडेना यास्तव तो त्याजपासून दूर असो

१८ तो आपले पांघरूणावाणीं शाप वेष्टीत असे यास्तव तो पाण्यासारिखा त्याचे अंतर्यामांत व तेलासारिखा त्याचे हाडांत शिरो

१९ तो त्यासाठीं पांघरायाचे वस्त्रासारिखा व नित्य बांधायाचे मेखलेसारिखा होवो

२० जे माझा विरोध करितात व माझे जीवावर वाईट बोलतात त्यांचें प्रतिदान ईश्वरापासून हेंच असो

२१ पण हे देवा प्रभो तूं आपले नामाकरितां मजविषयीं कार्य्य कर तुझी दया उत्तम आहे म्हणून मला मुक्त कर

२२ कां तर मी दीन व दरिद्री आहें आणि माझें हृदय मजमध्यें क्षत झालें आहे

२३ टळत्ये छायेवाणीं मी अवसित झालों आहें टोळा वाणीं मी इकडे तिकडे उडविला जातों

२४ उपोषणेंकडून माझे गुडघे लटपटीत झाले आहेत आणि माझा देह मेदहीन झाला आहे

२५ मी त्यांला निंद्य झालों आहें हें पाहून ते आपली मान हालवितात

२६ हे ईश्वरा माझे देवा माझें साहाय्य कर तूं आपले करुणेप्रमाणें मला तार

२७ तेव्हां हें तुझा हातच आहे हे ईश्वरा हें तूंच केलें आहेस असें ते जाणतील

२८ ते शापोत पण तूं आशी दे जेव्हां ते उठतात तेव्हां लज्जा पावोत परंतु तुझा सेवक हर्षो

२९ जे माझा विरोध करितात ते अनादरानें वेष्टिले जावोत आणि जसे झग्यानें तसे ते आपले लज्जेनें आच्छादिले जावोत

३० मी आपले मुखानें ईश्वराला फार वर्णीन आणि बहुत लोकांमध्यें त्याला स्तवीन



३१ कारण जे त्याला प्राणांत दंड करायास इच्छितात त्यांपासून दरिद्र्यास तारायला तो त्याचे उजवे हाताकडे उभा राहील

## महिन्याचा तेविसावा दिवस

सकाळची प्रार्थना

### गीत ११०

१ माझे प्रभूला ईश्वरानें म्हटलें मी तुझे वैरी तुझें पादासन होत असें करींपर्यंत तूं माझे उजवे हाताकडे बैस

२ ईश्वर तुझा प्रतापदंड जीयोनेंतून प्रतिसृष्ट करील तूं आपले वैऱ्यांमध्यें प्रभुत्व कर

३ तुझे पराक्रमाचे दिवसीं तुझे लोक उत्सुक होतील पवित्र शोभायुक्त पहांटेचे उदरांतून तुला तुझे यौवनाचें दहिंवर आहे

४ ईश्वरानें शपथ केला आहे आणि अनुतापणार नाहीं मल्कीजेदेकाचे प्रकरणानुसार तूं सर्वकालपर्यंत आचार्य्य आहेस

५ तुझे उजवे हाताकडेस प्रभु आपले क्रोधाचे दिवशीं राजे हाणून टाकील

६ तो विधर्म लोकांमध्यें न्यायाधीशी करील तो मढ्यानीं स्थानें भरील तो बहुत देशांवर मस्तकें हाणील

७ मार्गांत तो ओघळांतून पिईल यास्तव तो डोकें उभारील

## गीत १११

१ तुम्ही ईश्वराला स्तवा यथार्थांचे मंडळींत व सभेंत मी ईश्वराला वर्णीन

२ ईश्वराचीं कर्मे थोर आहेत ज्यांला तीं आवडतात त्यां सर्वांस तीं अन्वेषायाचीं आहेत

३ त्याचें कार्य्य गौरवी व आर्य्य आहे आणि त्याचें सात्विकपण सनातनतः टिकतें

४ त्यानें आपलीं आश्चर्य्यकर्मे स्मरलीं जाऊं दिलीं आहेत ईश्वर परम कृपालु व दयालु आहे

५ त्यानें आपले भक्तांस आहार दिला आहे तो सदा आपली संधा स्मरेल

६ त्यानें आपले लोकांस विधर्म लोकांचें क्षेत्र देऊन त्यांला आपले कर्मांचा पराक्रम दाखविला आहे

७ त्याचे हातचीं कर्मे सत्य व न्यायच आहेत त्याचे सर्व नियोग निश्चित आहेत

८ ते सर्वकालपर्यंत स्थिर राहातात सत्यानें व यथार्थ पणें केले जातात

९ त्यानें आपले लोकांस उद्धार पाठवून दिला त्यानें आपली संधा सर्वकालपर्यंत ठरविली आहे त्याचें नाम पवित्र व भयास योग्य आहे

१० ईश्वराचें भय सुज्ञानाचें प्रधानच आहे ते नियोग



जे पाळितात त्यांस सुबुद्धि आहे तिची प्रशंसा सर्वकालपर्यंत टिकत्ये

## गीत ११२

१ तुम्ही ईश्वराला स्तवा जो मनुष्य ईश्वराला भितो आणि त्याचे आज्ञाविषयीं फार संतोषतो तो सुखी आहे

२ पृथ्वीवर त्याची संतति बलिष्ठ होईल यथार्थांचा वंश आशीर्विशिष्ट होईल

३ धन व द्रव्य त्याचे घरांत होतील व त्याचें पुण्य सर्व कालपर्यंत टिकेल

४ यथार्थजनांस अंधकारांत उजेड उगवले तो कृपालु व दयालु व सात्विक आहे

५ सुजन कृपा करितो व उसणें देतो तो न्यायसभेंत आपला वाद निभावील

६ निश्चयें तो कधीं ध्वस्त होणार नाहीं सात्विक सदा स्मरला जाईल

७ दुर्वार्त्तेमुळें तो भिणार नाहीं त्याचें मन ईश्वरावर भाव ठेवून स्थिर असतें

८ त्याचें मन सुस्थिर आहे तो आपले शत्रूंस पाही पर्यंत भिणार नाहीं

९ त्यानें द्रव्य विखरिलें आहे दरिद्र्यांस दिलें आहे त्याचें पुण्य सर्वकालपर्यंत टिकतें गौरवानें त्याचें शृंग उभारिलें जाईल

१० दुष्ट पाहून रुसेल तो आपले दांत खाईल व गळून जाईल दुष्टांची इच्छा नष्ट होईल

## गीत ११३

१ तुह्मी ईश्वराला स्तवा ईश्वराचे सेवकानों स्तवन करा ईश्वराचे नामाची प्रशंसा करा

२ आतांपासून सर्वकालपर्यंत ईश्वराचें नाम सुवंदित असावें

३ सूर्याचे उदयस्थानापासून अस्तस्थानपर्यंत ईश्वराचें नाम स्तवायाचें आहे

४ सर्व लोकांवर ईश्वर उच्छ्रित आहे व त्याचें गौरव आकाशावरतीं आहे

५ ईश्वर जो आमचा देव उच्छ्रित स्थानांत राहतो त्यासारिखा कोण आहे

६ जो आकाश व पृथ्वी यांस पहायला आपलें मन लववितो तो

७ तो दीनास धुळींतून उठवितो व दरिद्र्यास मळांतून उचलितो

८ थोर जनांमध्यें आपले लोकांतले श्रेष्ठजनामध्यें त्याला बसवायास

९ तो वंध्येस लेंकरांची हर्षीत आई व्हावयास कुटुंबांत बसवितो तुह्मी ईश्वराला स्तवा



संध्याकाळची प्रार्थना

## गीत ११४

१ जेव्हां इस्राएल मिसरांतून व याकोबाचा वंश म्लेच्छ लोकांमधून निघाला

२ तेव्हां यहूदा त्याचें पवित्र स्थान व इस्राएल त्याचें राष्ट्र असा झाला

३ समुद्र पाहून पळाला यार्देन मागें हटला

४ पर्वत मेषांवाणीं व डोंगर कोंकरांवाणीं बोकलले

५ हे समुद्रा तुला काय झालें कीं तूं पळालास आणि हे यार्देना तुला काय कीं तूं मागें हटलास

६ अहो पर्वतानों तुम्हाला काय कीं तुम्ही मेषांवाणीं आणि डोंगरानों तुह्माला काय कीं तुह्मी कोंकरांवाणीं बोकललेत

७ हे पृथ्वि तूं प्रभूसमोर याकोबाचे देवासमोर विव्हल हो

८ जो खडकाला जलाशय करून गारेचे खडकाला जलोद्गम करून पालटितो तो

## गीत ११५

१ आम्हास नको हे ईश्वरा आह्मास नको पण तूं आपल्ये दयेकरितां व आपले सत्याकरितां आपले नामाला गौरव दे

२ त्यांचा देव तर कोठें आहे असें विधर्मी लोकांमध्यें कां ह्मटलें जावें

३ तथापि आमचा देव आकाशांत आहे सर्व जें त्याला बरें वाटलें तें त्यानें केलें आहे

४ त्यांच्या मूर्त्ति रुपें आणि सोनें आहेत मनुष्याचें हस्तकर्मच आहेत

५ त्यांला मुखें आहेत पण बोलत नाहींत त्यांला डोळे आहेत पण दिसत नाहीं

६ त्यांला कान आहेत पण ऐकूं येत नाहीं त्यांला नाकें आहेत पण हुंगतां येत नाहीं

७ त्यांला हात आहेत पण चांपवत नाहीं त्यांला पाय आहेत पण चालवत नाहीं आणि त्यांला आपले गळ्यांतून शब्द उच्चारवत नाहीं

८ त्यांसारिखेच त्यांचे निर्माणकर्त्ते आहेत आणि सर्व जे त्यांजवर भाव ठेवितात ते

९ हे इस्राएला तूं ईश्वरावर भाव ठेव तोच त्यांचें साहाय्य व त्यांचें वारण आहे

१० अहो अहरोनाचे वंश हो तुह्मी ईश्वरावर भाव ठेवा तोच त्यांचें साहाय्य व त्यांचें वारण आहे

११ अहो ईश्वराचे भक्त हो तुम्ही ईश्वरावर भाव ठेवा तोच त्यांचें साहाय्य व त्यांचें वारण आहे

१२ ईश्वर आम्हाला स्मरला आहे तो आम्हास आशी



देईल इस्राएलाचे वंशाला आशी देईल आहरोनाचे वंशाला आशी देईल

१३ तो ईश्वराचे भक्तांला कनिष्ठ श्रेष्ठांला आशी देईल

१४ ईश्वर तुम्हास वाढू देईल तुम्हास व तुमचे लेंकरांस

१५ ज्या ईश्वरानें आकाश व पृथ्वी उत्पन्न केली त्याजकडून तुह्मी आशी विशिष्ट आहां

१६ आकाशें आकाशें ईश्वराचीं आहेत आणि पृथ्वी त्यानें मनुष्यांस दिली आहे

१७ जे मेलेले व जे निश्शब्दस्थितींत उतरतात त्यांला ईश्वराचें स्तवन करवत नाहीं

१८ पण आह्मी आतांपासून सर्वकालपर्यंत ईश्वराचें सुवंदन करीत जाऊं तुह्मी ईश्वराला स्तवा

## महिन्याचा चोविसावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत ११६

१ ईश्वरानें माझे विनंत्यांचा शब्द ऐकिला आहे यास्तव मी त्याजवर प्रीति ठेवितों

२ त्यानें आपला कान मजकडे लाविला म्हणून माझें आयुष्य संपेपर्यंत मी त्यास आह्वति करीन

३ मृत्यूचे बंधनानीं मला वेष्टिलें मृत्युलोकाचे संकोच मला लागले संकट व क्लेश म्यां अनुभविले

४ तेव्हां म्यां ईश्वराचें नाम घेऊन प्रार्थना केली हे ईश्वरा माझा जीव मुक्त कर

५ ईश्वर दयालु व सात्विक आहे होय आमचा देव करुणापर आहे

६ ईश्वर भोळ्यांस रक्षितो मी धुळीस मिळालों तेव्हां त्यानें मला तारिलें

७ हे माझे जीवा तूं फिरून स्वसमाधानयुक्त ऐस कां कीं ईश्वरानें तुजवर उपकार केला आहे

८ कां तर मरणापासून माझे जीवास अश्रूपासून माझे डोळ्यास व ठेंच लागण्यापासून माझे पायांस तूं सोडिलें आहेस

९ जीवंताचे भूमींत मी ईश्वरासमोर वर्त्तेन

१० मी विश्वासलों आहें ह्मणून बोलतों मी फार पीडित झालों होतों

११ मी आपले उतावळीनें ह्मटलें सर्व मनुष्य असत्य वक्ते आहेत

१२ ईश्वराला त्याचे मजवरील सर्व उपकारांकरितां मी काय प्रतिदान करूं

१३ मी तारणस्तोमपात्र घेऊन ईश्वराचे नामास आह्वति करीन

१४ ईश्वराला त्याचे सर्व लोकांचे देखतां मी आपले नवस फेडीनच फेडीन

१५ ईश्वराचे दृष्टींत त्याचे साधूंचें मरण मंतव्य आहे

१६ हे ईश्वरा खचीत मी तुझा सेवक आहें मी तुझा



सेवक तुझे दासीचा पुत्र आहें माझीं बंधनें तूं सोडिलीं आहेस

१७ उपकारस्तुतीचें बलिदान मी तुला अर्पीन व ईश्वराचे नामास आह्वति करीन

१८ ईश्वराला त्याचे सर्व लोकांदेखतां मी आपले नवस फेडीनच फेडीन

१९ ईश्वराचे मंदिराचे अंगणांत तुजमध्येंच हे येरुशालेमे तुह्मी ईश्वराला स्तवा

## गीत ११७

१ अहो सर्व लोक हो तुह्मी ईश्वराला स्तवा सर्व समुदायानों त्याची प्रशंसा करा

२ कारण त्याची दया आह्मावर प्रभूत आहे आणि ईश्वराचें सत्य सनातन आहे तुह्मी ईश्वराला स्तवा

## गीत ११८

१ ईश्वराला तुह्मी उपकारस्तुति करा कारण तो उत्तम आहे त्याची दया सनातन आहे

२ इस्राएल म्हणो कीं त्याची दया सनातन आहे

३ अहरोनाचा वंश ह्मणो कीं त्याची दया सनातन आहे

४ ईश्वराचे भक्त ह्मणोत कीं त्याची दया सनातन आहे

५ संकटांत मी ईश्वरास आरोळी केली तेव्हां प्रशस्त स्थानांत त्यानें मला उत्तर दिलें

६ ईश्वर मजकडे आहे मी भिणार नाहीं मनुष्य मला काय करील

७ जे माझें साहाय्य करितात त्यांसंगतीं ईश्वर मजकडे आहे ह्मणून मी आपले वैऱ्यांस पाहीन

८ मनुष्यावर विश्वास ठेवणें यापेक्षां ईश्वराचा आश्रय धरणें उत्तम आहे

९ अधिपतींवर विश्वास ठेवणें यापेक्षां ईश्वराचा आश्रय धरणें उत्तम आहे

१० सर्व लोकानीं मला वेढिलें पण ईश्वराचे नामानें मी त्यांला छेदून टाकीन

११ त्यानीं मला वेढिलें होय मला वेढिलें पण ईश्वराचे नामानें मी त्यांला छेदून टाकीन

१२ त्यानीं मधुमक्षिकांवाणीं मला वेढिलें ते कंटकांचे अग्निसारिखे विझून गेले आहेत कां तर ईश्वराचे नामानें मी त्यांला छेदून टाकीन

१३ म्यां पडावें ह्मणून त्वां मला फार ढुसलें पण ईश्वरानें माझें पाठबळ केलें

१४ ईश्वर माझें सामर्थ्य व माझें गीतच आहे तो माझें तारणहि झाला आहे

१५ उत्साहतारणाचा शब्द सात्त्विकांचे वस्त्यांत आहे ईश्वराचा उजवा हात पराक्रम करितो

१६ ईश्वराचा उजवा हात उंचावलेला आहे ईश्वराचा उजवा हात पराक्रम करितो



१७ मी मरणार नाहीं पण वांचेन आणि ईश्वराचीं कर्म्में कथीन

१८ ईश्वरानें मला भारी शिक्षिलें आहे परंतु मला मरणास सोपून दिलें नाहीं

१९ मसाठीं तुह्मी सात्त्विकपणाचीं द्वारें उघडा मी त्यांतून आंत जाऊन ईश्वराला स्तवीन

२० हें ईश्वराचें द्वार आहे यांतून सात्त्विक आंत जातील

२१ त्वां मला उत्तर दिलें आहे तूं माझें तारणहि झाला आहेस ह्मणून मी तुला स्तवीन

२२ जो दगड बांधणाऱ्यानीं टाकिला तो कोंपऱ्याचा मुख्य झाला आहे

२३ हें ईश्वराकडूनच घडलें आहे हें आमचे दृष्टींत आश्चर्यकर्म्मच आहे

२४ जो दिवस ईश्वरानें नेमिलेला आहे तो हाच आहे यांत आह्मी उल्हासूं व हर्षूं

२५ हे ईश्वरा तारण कर हे ईश्वरा कुशल होऊं दे

२६ जो ईश्वराचे नामानें येतो तो सुवंदित असो ईश्वराचे मंदिरांतून आह्मी तुह्माला आशीर्वाद दिला आहे

२७ देव ईश्वरच आहे त्यानें आह्मास प्रकाश पाडिला आहे तुह्मी यज्ञवेदीचे शृंगांशीं रज्जूनीं बलि बांधा

२८ तूं माझा देव आहेस ह्मणून मी तुला स्तवीन तूं माझा देव आहेस मी तुला उंचावीन

२९ ईश्वराला तुह्मी उपकारस्तुति करा कारण तो उत्तम आहे त्याची दया सनातन आहे

संध्याकाळची प्रार्थना

## गीत ११९

१

१ जे यथार्थ आचाराचे आहेत आणि ईश्वराचे धर्मविधिप्रमाणें चालतात ते सुखी आहेत

२ जे त्याचीं विधानें पाळितात जे त्याला पूर्ण हृदयानें शोधितात तेहि सुखी आहेत

३ ते कांहीं अन्याय करीत नाहींत ते त्याचे मार्गांत चालतात

४ तुझे नियोग यत्नतः पाळावे ह्मणून त्वां आज्ञा दिली आहे

५ तुझे नियम पाळायास माझे मार्ग नीट करावे असा माझा मनोरथ आहे

६ जेव्हां मी तुझे सर्व आज्ञांवर लक्ष्य ठेवितों तेव्हां मी लज्जित होणार नाहीं

७ मी तुझे सत्यन्याय शिकून मनाचे यथार्थपणें तुला स्तवीन

८ मी तुझे नियम पाळीन अतिशयें माझा त्याग करूं नको



२

९ तरुण आपला मार्ग कशानें शुद्ध राखील तर त्याला तुझे वचनाप्रमाणें जपण्यानें

१० म्यां आपलें पूर्ण हृदयानें तुला शोधिलें आहे तुझे आज्ञांपासून मला बहकूं देऊं नको

११ म्यां तुजप्रत पाप करूं नये ह्मणून म्यां आपले हृदयांत तुझें वचन राखून ठेविलें आहे

१२ हे ईश्वरा तूं सुवंदित आहेस तूं आपले नियम मला शिकीव

१३ म्यां आपले ओंठानीं तुझे मुखचे सर्व विधि प्रकट केले आहेत

१४ जसा संपूर्ण धनाविषयीं तसा मी तुझे विधिमार्गांत आनंदलों आहें

१५ मी तुझे नियमांचें ध्यान करीन आणि तुझे मार्गांस जपेन

१६ मी तुझे नियम पाळीत असतांना फार आनंदेन तुझें वचन मी विसरणार नाहीं

३

१७ तूं आपले सेवकावर उपकार कर म्यां वांचावें आणि तुझें वचन पाळावें

१८ म्यां तुझे धर्मविधींतले आश्चर्य अर्थ पहावे म्हणून तूं माझे डोळे उघड

१९ मी पृथ्वींत आगंतुक आहें तूं आपल्या आज्ञा मजपासून गुप्त करूं नको

२० नित्य तुझे विधींस इच्छून माझा जीव मोडावला आहे

२१ जे शापग्रस्त गर्विष्ठ तुझे आज्ञांपासून बहकतात त्यांस त्वां धमकाविलें आहे

२२ निंदा व अवहेलन मजपासून दूर कर कारण मी तुझीं विधानें पाळीत आलों आहें

२३ अधिपतीनीं बसून मजविषयीं संलाप केला तथापि तुझे सेवकानें तुझे नियमांचें ध्यान केलें

२४ तुझीं विधानेंहि माझे आनंदार्थ व माझे मंत्रीच आहेत

४

२५ माझा जीव धूळीस चिकटतो तूं आपले वचनाप्रमाणें मला जीवंत कर

२६ म्यां आपले मार्ग प्रकट केले तेव्हां त्वां मला उत्तर दिलें तूं आपले नियम मला शिकीव

२७ तूं आपले नियोगांचा मार्ग मला समजीव तेव्हां मी तुझे आश्चर्यकर्मांचें ध्यान करीन

२८ दुःखेंकडून माझा जीव गळून गेला आहे तूं आपले वचनाप्रमाणें मला स्थिराव

२९ असत्यमार्ग मजपासून दूर कर आणि तुझा धर्मविधि मला कृपा करून दे

३० म्यां सत्यतेचा मार्ग निवडला आहे म्यां आपल्यापुढें तुझे न्याय ठेविले आहेत



३१ मी तुझे विधानांस चिकटत आलों आहें हे ईश्वरा मला लज्जित होऊं देऊं नको

३२ तूं माझें हृदय विकसित करिशील तेव्हां मी तुझे आज्ञांचे मार्गांत धांवत चालेन

## महिन्याचा पंचविसावा दिवस

### सकाळची प्रार्थना

५

३३ हे ईश्वरा तूं आपले नियमांचा मार्ग मला दाखीव तेव्हां शेवटपर्यंत मी तो धरीन

३४ तूं मला बुद्धि दे ह्मणजे तुझा धर्मविधि पाळीन व आपले पूर्ण हृदयानें तो मी राखीन

३५ तूं आपले आज्ञांचे मार्गांत मला चालीव कारण त्यांत मी संतोषतों

३६ लाभावर नको पण तुझे विधानांवर माझें चित्त लागे असें कर

३७ दुर्विषय पाहण्यापासून माझीं नेत्रें वळीव तुझे मार्गांत मला जीवित कर

३८ जो तुझा सेवक तुझे भीतीस आसक्त आहे त्याजप्रत तूं आपलें वचन खरें कर

३९ माझी निंदा जिला मी भितों ती दूर कर कां तर तुझा नीति उत्तम आहेत

४० पहा म्यां तुझे नियोगांस इच्छिलें आहे तूं आपले सात्विकपणाप्रमाणें मला जीवित कर

६

४१ तुझे उपकारहि हे ईश्वरा मजवळ यावे तुझे वचनाप्रमाणें तुझें तारण यावें

४२ तेव्हां जो मला निंदितो त्यास प्रत्युत्तर करीन कारण मी तुझे वचनावर विश्वासलों आहें

४३ आणि माझे मुखांतून तूं आपलें सत्यवचन निस्तुक काढूं नको कारण मी तुझे न्यायाची प्रतीक्षा केली आहे

४४ मी नित्य सदासर्वकाळ तुझा धर्मविधि पाळीत जाईन

४५ मी प्रशस्तपणें चालेन कारण म्यां तुझे नियोगांस अन्वेषिलें आहे

४६ तुझे विधानांविषयींहि मी राजांसमोर बोलेन आणि लाजणार नाहीं

४७ तुझ्या ज्या आज्ञा मला आवडतात त्यांविषयीं मी आनंदेन

४८ आणि तुझ्या ज्या आज्ञा मला आवडतात त्यांविषयीं मी आपला हात उंचावीन व तुझे नियमांचें ध्यान करीन

७

४९ तूं आपले सेवकासाठीं आपलें वचन स्मर ज्याजवर त्वां मला आशा ठेवूं दिली तें

५० हेंच माझे पीडेंत माझें सांत्वन आहे कां तर तुझे वचनानें मला जीवित केलें आहे



५१ गर्विष्ठानीं माझा फार उपहास केला आहे तथापि तुझे धर्मविधीपासून मी वळलों नाहीं

५२ हे ईश्वरा तुझे पुरातन न्याय मी स्मरलों आणि सांत्वन पावलों आहें

५३ दुष्ट जे तुझा धर्मविधि टाकितात त्यांजकरितां मला भीषण लागलें आहे

५४ माझे प्रवासाचे घरांत तुझे नियम माझीं गीतेंच झाले आहेत

५५ हे ईश्वरा मी रात्रीं तुझें नाम स्मरलों आणि तुझा धर्मविधि म्यां पाळिला आहे

५६ हें मला झालें कां तर मी तुझे नियोगांला जपलों

८

५७ हे ईश्वरा तूं माझा वांटा आहेस मी तुझीं वचनें पाळीन असा म्यां निश्चय केला आहे

५८ म्यां पूर्ण हृदयानें तुझे प्रसादासाठीं विनविलें तूं आपले वचनाप्रमाणें मला प्रसन्न हो

५९ म्यां आपले मार्गांविषयीं विचार केला आणि तुझे विधानांत आपले पाय फिरविले

६० तुझ्या आज्ञा पाळायास म्यां कांहीं विलंब नकरितां त्वरा केली

६१ दुष्टांचें टोळ्यानीं मला वेढिलें तथापि तुझा धर्मविधि मी विसरलों नाहीं

६२ तुझे सत्य न्यायांकरितां तुझी उपकारस्तुति करायला मी मध्यरात्रीं उठेन

६३ सर्व जे तुला भितात व तुझे नियोगांस जपतात त्यांचा मी सहाय आहे

६४ हे ईश्वरा तुझे दयेनें पृथ्वी भरली आहे तूं आपले नियम मला शिकीव

९

६५ हे ईश्वरा त्वां आपले वचनाप्रमाणें आपले सेवकाप्रत उत्तम केलें आहे

६६ उत्तम बुद्धि व ज्ञान मला शिकीव कां तर म्यां तुझे आज्ञांचा विश्वास धरिला आहे

६७ मी पीडित झाल्यापूर्वीं भ्रमत असें पण आतां म्य तुझें वचन पाळिलें आहे

६८ तूं उत्तम आहेस व उत्तम करितोस तूं आपले नियम मला शिकीव

६९ गर्विष्ठानीं मजवर असत्य कल्पिलें आहे तथापि म्यां पूर्ण हृदयानें तुझे नियोग पाळिले आहेत

७० त्यांचें हृदय मेदासारिखें जड आहे मी तुझे धर्मविधीविषयीं फार आनंदतों

७१ मी पीडित होतों हें मला बरें झालें म्यां तुझे नियम शिकावे म्हणून

७२ सुवर्णरूप्याचे सहस्र खंडांपेक्षां तुझे मुखचा धर्मविधि मला उत्तम आहे



संध्याकाळची प्रार्थना

१०

७३ तुझे हातानीं मला घडिलें व रचिलें आहे म्यां तुझ्या आज्ञा शिकाव्या ह्मणून मला बुद्धि दे

७४ तुझे भक्त मला पाहून हर्षतील कारण म्यां तुझे वचनावर आशा धरिली आहे

७५ हे ईश्वरा तुझे न्याय सत्यच आहेत आणि सत्यता धरून त्वां मला पीडिलें आहे हें मी जाणतों

७६ तुझे सेवकाकडील जें तुझें वचन त्याप्रमाणें तुझे दयेनें माझें सांत्वन करावें

७७ म्यां जीवावें म्हणून तुझी परमकरुणा मजवर यावी कां तर तुझा धर्मविधि माझा सुखानंदच आहे

७८ गर्विष्ठ लज्जा पावोत कारण ते रहवीं मजप्रत वांकडे आचरले मी तुझे नियोगांचें ध्यान करीन

७९ जे तुझें भय धरितात आणि जे तुझीं विधानें जाणतात ते मजकडे वळोत

८० म्यां लज्जा पावूं नये ह्मणून तुझे नियमांविषयीं माझें हृदय सात्विक असावें

११

८१ तुझें तारण इच्छून माझा जीव थकला आहे म्यां तुझे वचनावर आशा ठेविली आहे

८२ तूं माझें सांत्वन केव्हां करिशील असें मी म्हणत

असातांना तुझे वचनास प्रतीक्षून माझे डोळे थकले आहेत

८३ कां तर धुरांत ठेविलेले बुधल्यासारिखा मी झालों आहें तथापि तुझे नियम मी विसरलों नाहीं

८४ तुझे सेवकाचे दिवस किती आहेत जे माझे पाठीस लागतात त्यांजवर न्यायाधीशी केव्हां करिशील

८५ जे गर्विष्ठ तुझे धर्मविधिप्रमाणें वर्त्तत नाहींत त्यानीं मजसाठीं खांचा खाणिल्या आहेत

८६ तुझ्या सर्व आज्ञा सत्यताच आहेत ते उगीच माझे पाठीस लागले आहेत माझें साहाय्य कर

८७ ते मला धूळींत नष्ट करूं लागले तथापि तुझे नियोग म्यां सोडिले नाहींत

८८ तूं आपले करुणेप्रमाणें मला जीवित कर तेव्हां तुझे मुखचें विधान मी पाळीन

१२

८९ हे ईश्वरा सर्वकाळपर्यंत तुझें वचन आकाशांत स्थापिलेलें आहे

९० तुझी सत्यता युगीयुगच आहे त्वां पृथ्वी स्थापिली आहे ह्मणून ती अचंचल राहत्ये

९१ आजपर्यंत त्या वस्ता तुझे विधानाप्रमाणें टिकतात कां तर सर्व तुझे सेवक आहेत

९२ जर तुझा धर्मविधि माझा सुखानंद नसता तर मी आपल्या पीडेंत नष्ट झालों असतों

९३ मी तुझे नियोग कधीं विसरणार नाहीं कारण त्यांजकडून त्वां मला जीवित केलें आहे



९४ मी तुझाच आहें मला तार कारण तुझे नियोग म्यां अन्वेषिले आहे

९५ माझा नाश करायास दुष्ट मजवर टपले आहेत पण तुझे विधानांचें ध्यान करीन

९६ सर्व पूर्णतेचें अवसान म्यां पाहिलें आहे तुझी आज्ञा अत्यंत व्यापक आहे

१३

९७ तुझा धर्मविधि मी केवढा प्रिय मानितों सारा दिवस तो माझा ध्यानार्थच आहे

९८ त्वां आपले आज्ञांकडून मला माझे वैर्यांपेक्षां विद्वान् केलें आहे कारण सदा त्यामजवळ आहेत

९९. माझे सर्व अध्यापकांपेक्षां मी बुद्धिवान झालों आहें कारण तुझीं विधानें माझा ध्यानविषय आहेत

१०० पुरातन जनांपेक्षां मी अधिक समजतों कारण तुझे नियोगांस जपत आलों आहें

१०१ म्यां तुझें वचन पाळावें ह्मणून सर्व कुमार्गांपासून म्यां आपला पाय राखिला आहे

१०२ तुझे विधींपासून मी सरलों नाहीं कारण तूंच मला शिकविलें आहेस

१०३ तुझीं वाक्यें माझे रसनाला किति गोड आहेत तीं मधूपेक्षां माझे मुखाला मधुर आहेत

१०४ तुझे नियोगांपासून मी बुद्धि पावतों यास्तव मी सर्व असत्य मार्ग द्वेषितों

## महिन्याचा सव्विसावा दिवस

सकाळची प्रार्थना

१४

१०५ तुझें वचन माझे पायासाठीं दीप व माझे वाटेसाठ प्रकाश आहे

१०६ तुझे सत्य न्याय पाळायास म्यां शपथ केला आहे आणि त्यास मी खरें करीन

१०७ मी फार पीडित झालों आहें हे ईश्वरा तूं आपले वचनाप्रमाणें मला जीवित कर

१०८ हे ईश्वरा माझे मुखचीं संतोषार्पणें मान्य कर आणि तुझे धर्मविधि मला शिकीव

१०९ माझा जीव माझे हातांत नित्य आहे तथापि तुझा धर्मविधि मी विसरत नाहीं

११० दुष्टानी मजसाठीं पाश मांडिला पण तुझे नियोगांपासून मी बहकलों नाहीं

१११ तुझीं विधानें म्यां सनातन विभागशीं धरिलीं आहेत कारण तीं माझा मनोहर्षच आहेत

११२ तुझे नियम सर्वदा अंतकालपर्यंत पाळायास म्यां आपलें मन लाविलें आहे

१५

११३ चंचलांस मी द्वेषितों पण तुझे धर्मविधीस प्रिय मानितों

११४ तूंच माझें शरण व माझें वारण आहेस मी तुझे वचनाची आशा धरितों



११५ अरे दुष्कर्म्यांनीं मजपासून दूर व्हा कां मी आपले देवाच्या आज्ञा पाळीन

११६ म्यां जीवावें ह्मणून तूं आपले वचनाप्रमाणें मला संभाळ आणि माझे अपेक्षेविषयीं मला लज्जित होऊं देऊं नको

११७ माझें पाठबळ कर म्हणजे मी तरेन आणि नित्य तुझे नियमांला जपेन

११८ सर्व जे तुझे नियमांपासून भ्रमतात त्यांस त्वां नाकारिलें आहे कां त्यांचें कपट असत्यताच आहे

११९ पृथ्वींतले सर्व दुष्टांस तूं गाळाप्रमाणें दूर करितोस यास्तव मी तुझीं विधानें प्रिय मानितों

१२० तुजविषयींचे भीषणेंकडून माझें अंग थरारतें आणि तुझे न्यायांकरितां मी भितों

१६

१२१ म्यां न्याय व सात्विकपण आचरिलें आहे मला माझे पीडकांचे सत्तेंत सोडूं नको

१२२ कुशल व्हावें ह्मणून तूं आपले सेवकाचा प्रतिभू हो गर्विष्ठानीं मजवर बलात्कार करूं नये

१२३ तुझे तारणाची व तुझे सत्य वचनाची प्रतीक्षा करून माझे डोळे थकले आहेत

१२४ तूं आपले सेवकाप्रत आपले करुणेप्रमाणें कर आणि तुझे नियम मला शिकीव

१२५ मी तुझा सेवक आहें त्यां तुझीं विधानें जाणावीं ह्मणून मला बुद्धि दे

१२६ ईश्वराला काम साधायाची वेळ आली आहे त्यानीं तुझा धर्मविधि मोडिला आहे

१२७ यास्तव सुवर्णापेक्षां उत्कृष्ट सुवर्णापेक्षांहि मी तुझ्या आज्ञा प्रिय मानितों

१२८ ह्मणून मी तुझे सर्वांविषयींचे सर्व नियोग यथार्थ मानितों सर्व असत्य मार्ग मी द्वेषितों

१७

१२९ तुझीं विधानें अद्भुत आहेत ह्मणून माझा जीव तीं पाळितो

१३० तुझे वाक्यांचें व्याख्यान प्रकाश पाडितें तें भोळ्यांस बोध करितें

१३१ म्यां आपलें तोंड उघडून धापा दिल्या कारण म्यां तुझें आज्ञांची आशंसा धरिली

१३२ तूं मडकडे वळून जशी तुझे नामाचे प्रीतिकर्त्यांवर तशी मजवर दया कर

१३३ माझीं पावलें तुझे वचनाप्रमाणें नीट चालीव आणि कोणताहि दोष मजवर प्रबल होऊं देऊं नको

१३४ मनुष्याचे बलात्कारापासून मला उद्धर ह्मणजे मी तुझे नियोग पाळीन

१३५ तूं आपलें मुखतेज आपलें सेवकावर पडूं दे आणि तुझे नियम मला शिकीव



१३६ मनुष्यें तुझा धर्मविधि पाळीत नाहींत ह्मणून माझे डोळे पाण्याचे ओघानीं वाहतात

१८

१३७ हे ईश्वरा तूं सात्विक आहेस आणि तुझे न्याय यथार्थ आहेत

१३८ त्वां आपले विधानांचें सात्विकपण व अत्यंत सत्यता ठरविलीं आहेत

१३९ माझे संतापानें मला विनष्ट केलें आहे कारण माझे शत्रू तुझीं वचनें विसरले आहेत

१४० तुझें वचन फार स्वच्छ आहे ह्मणून तुझा सेवक तें प्रिय मानितो

१४१ मी कनिष्ठ व अवमानित आहें तथापि तुझे नियोग मी विसरलों नाहीं

१४२ तुझें सात्विकपण सनातन सात्विकपणच आहे आणि तुझा धर्मविधि सत्यच आहे

१४३ संकट व संकोच मला लागले तथापि तुझ्या आज्ञा माझा सुखानंदच आहेत

१४४ तुझे विधानांचें सात्विकपण सनातन आहे तूं मला बुद्धि दे तेव्हां मी जीवित होईन

संध्याकाळची प्रार्थना

१९

१४५ म्यां पूर्ण हृदयानें आरोळी केली आहे मला उत्तर दे ह्मणजे तुझे नियम पाळीन

१४६ म्यां तुला प्रार्थना केली आहे मला तार ह्मणजे तुझे विधानांस जपत जाईन

१४७ म्यां पहाटेचे पूर्वीं आरंभून आकृति केली म्यां तुझे वचनाची प्रतीक्षा केली आहे

१४८ तुझे वचनाचें ध्यान करायास माझे नेत्रांनीं रात्रि प्रहरांची वाट पाहिली आहे

१४९ तूं आपले करुणेप्रमाणें माझा शब्द ऐक हे ईश्वरा तूं आपले न्यायाप्रमाणें मला जीवित कर

१५० जे दुष्टपणास झटतात ते जवळ आहेत ते तुझे धर्मविधीपासून दूर आहेत

१५१ तूं हे ईश्वरा जवळ आहेस आणि तुझ्या सर्व आज्ञा सत्यच आहेत

१५२ तुझे विधानांविषयीं पूर्वीं म्यां जाणिलें आहे कीं तीं त्वां सर्वकालपर्यंत ठरविलीं आहेत

२०

१५३ तूं माझी पीडा पाहून मला मुक्त कर कां तर तुझा धर्मविधि मी विसरलों नाहीं

१५४ माझा वाद निभावून मला उद्धर तूं आपले वचनाप्रमाणें मला जीवित कर

१५५ तारण दुष्टांपासून दूर आहे कारण त्यांनीं तुझे नियम शोधिले नाहींत

१५६ हे ईश्वरा तुझी करुणा परमप्रभूत आहे तूं आपले न्यायाप्रमाणें मला जीवित कर



१५७ माझे पाठीस लागणारे व माझे शत्रु बहुत आहेत तथापि तुझे विधानांपासून मी वळलों नाहीं

१५८ मी अपराध्यांस पाहून कंटाळलों कारण त्यांनीं तुझें वचन पाळिलें नाहीं

१५९ तुझे नियोगांस मी कसा प्रिय मानितों हें पहा हे ईश्वरा तूं आपले करुणेप्रमाणें मला जीवित कर

१६० तुझे वचनाचा सारांश सत्यच आहे आणि तुझे सर्व सत्य न्याय सनातन आहेत

२१

१६१ अधिपति एरव्हीं माझे पाठीस लागले पण माझे हृदयानें तुझे वचनाची भीड धरिली

१६२ ज्याला मोठा हार सांपडतो त्यासारिखा मी तुझे वचनाविषयीं आनंदतो

१६३ मी असत्यास द्वेषितों व त्याचा वीट मानितों तुझा धर्मविधि मी प्रिय मानितों

१६४ प्रतिदिवशीं सातवेळां मी तुझे सत्य न्यायांकरितां तुला स्तवीन

१६५ जे तुझे धर्मविधीची आवड धरितात त्यांचें कुशल फार आहे आणि त्यांला कांहीं अडखूळ पडणार नाहीं

१६६ हे ईश्वरा म्यां तुझे तारणाची प्रतीक्षा केली आहे व तुझ्या आज्ञा म्यां साधिल्या आहेत

१६७ माझे जिवानें तुझीं विधानें पाळिलीं आहेत आणि त्यांची मी फार आवड धरितों

१६८ मी तुझे नियोग व तुझीं विधानें पाळीत आलों आहें कारण माझे सर्व मार्ग तुजसमोर आहेत

२२

१६९ हे ईश्वरा तुजपुढें माझी आरोळी पोंहचावी तूं आपले वचनाप्रमाणें मला बुद्धि दे

१७० माझी विनंती तुजपुढें यावी तूं आपले वचनाप्रमाणें मला मुक्त कर

१७१ तूं आपले नियम जेव्हां मला शिकविशील तेव्हां माझे ओंठ स्तुति उद्गारितील

१७२ माझी जिव्हा तुझे वचनाविषयीं बोलेल कारण तुझ्या सर्व आज्ञा सात्त्विकपणच आहेत

१७३ तुझे हातानें माझें साहाय्य करावें कां तर तुझे नियोग म्यां निवडिले आहेत

१७४ हे ईश्वरा म्यां तुझे तारणाची आशंसा केली आहे आणि तुझा धर्मविधि माझा सुखानंदच आहे

१७५ माझे जीवानें वांचावें आणि तुझी स्तुति करावी तुझे न्यायानीं माझें साहाय्य करावें

१७६ हरपलेलें मेंढरावाणीं मी बहकलों आहें तूं आपले सेवकाला शोध कारण मी तुझ्या आज्ञा विसरलों नाहीं



## महिन्याचा सत्ताविसावा दिवस

सकाळची प्रार्थना

### गीत १२०

१ म्यां आपले संकटांत ईश्वारास आरोळी केली तेव्हां त्यानें मला उत्तर दिलें

२ हे ईश्वरा माझा जीव असत्य ओष्ठांपासून व कपट युक्त जिव्हेपासून मुक्त कर

३ अगे कपटयुक्त जिव्हे तुला काय देईल आणि तुला काय लावील

४ बलिष्ठाचे तीक्ष्ण बाण झुडपाचे कवळाचे जळत जुड्यांसहित ते

५ हाय मला कीं मेशेकांत मी प्रवास करितों आणि केदाराचे डेऱ्यांजवळ वस्ती करितों

६ जो स्वास्थ्य द्वेषितो त्याजवळ माझा जीव फार वेळ राहिला आहे

७ मी स्वास्थ्य इच्छितों पण जेव्हां मी बोलतों तेव्हां ते युद्धास मन लावितात

### गीत १२१

१ पर्वतांकडे मी आपली दृष्टि लावूं काय माझें साहाय्य कोठून येतें

२ ईश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्त्ता त्यापासूनच माझें साहाय्य येतें

३ तो तुझा पाय सरकूं देणार नाहीं तुझा रक्षक निद्रालु होणार नाहीं

४ पहा जो इस्राएलास रक्षितो तो निद्रालु होत नाहीं व झोंपेंत पडत नाहीं

५ ईश्वर तुझा रक्षक आहे तुझे उजवे हाताकडेस ईश्वर तुझी छाया आहे

६ दिवसा सूर्य्य अथवा रात्रो चंद्र तुला बाधणार नाहीं

७ ईश्वर तुला सर्व अरिष्टांपासून रक्षील तो तुझे जोवाला रक्षील

८ आतांपासून सर्वकालपर्यंत ईश्वर तुझें बाहेर जाणें व तुझें आंत येणें रक्षील

## गीत १२२

१ आपण ईश्वराचे मंदिरांत जाऊं असें जे मला ह्मणाले त्यांसंगतीं मी हर्षलों

२ हे येरूशालेमे तुझे द्वारांत आमचे पाय उभे राहतील

३ येरूशालेम जी सुसंप्रयुक्त नगराप्रमाणें बांधिलेली आहे तो

४ तिजकडे वर्ग ईश्वराचे वर्ग इस्राएलाचे प्रमाणाजवळ ईश्वराचे नामाला उपकारस्तुति करायास चढत जातात

५ कां तर तेथें न्यायसिंहासनें दावीदाचे सिंहासनें मांडिलीं आहेत



६ येरूशालेमेचे कुशलासाठीं प्रार्थना करा जे तुला मानितात ते सुखी होतील

७ तुझे कोटांत कुशल व तुझे वाड्यांत क्षेम असो

८ माझे बंधु व मित्र यांजकरितां मी बोलेनच तुजमध्यें कुशल असो

९ ईश्वर जो आमचा देव त्याचे मंदिराकरितां मी तुझें हितास झटत जाईन

## गीत १२३

१ हे तूं जो आकाशांत राहतोस तुजकडे मी आपली दृष्टि लावितों

२ पहा जसे सेवकांचे डोळे आपले धन्याकडे व दासीचे डोळे आपले बाईकडे पाहतात तसे ईश्वर जो आमचा देव तो आम्हावर दया करोपर्यंत त्याजकडे आमचे डोळे पाहतात

३ आम्हावर दया कर हे ईश्वरा आह्मावर दया कर कारण आम्ही फार निंदाक्रांत झालों आहों

४ स्वस्थांचे उपहासानें आणि गर्विष्ठांचे निंदेनें आमचा जीव आक्रांत झाला आहे

## गीत १२४

१ इस्राएल म्हणो कीं जर ईश्वर आम्हाकडे नसता

२ जेव्हां मनुष्यें आह्मावर उठलीं तेव्हां आम्हाकडे जर ईश्वर नसता तर

३ जेव्हां आह्मावर त्यांचा क्रोध संतप्त झाला तेव्हां त्यांनीं आह्माला प्राणासहित गिळिलें असतें

४ तेव्हां जलानीं आह्मास बुडविलें असतें प्रवाह आमचे जीवावर गेला असता

५ तेव्हां उत्कट जलें आमचे जीवांवर गेलीं असतीं

६ ईश्वर ज्यानें आह्मास त्यांचे दंतांसाठीं आहारसें दिलें नाहीं तो सुवंदित असो

७ जसा पक्षी व्याधांचे पाशांतून तसा आमचा जीव मुक्त झाला आहे पाश तुटला आणि आह्मी मुक्त झालों आहों

८ ईश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्त्ता त्याचें नामांत आमचें साहाय्य आहे

## गीत १२५

१ जे ईश्वरावर भाव ठेवितात ते जो जीयोन पर्वत नढळतां सर्वकालपर्यंत टिकतो त्यासारिखे होतील

२ येरुशालेमेभोंवते पर्वत आहेत खरे आणि आतां पासून सर्वकालपर्यंत ईश्वर आपले लोकांभोंवता आहे

३ कां तर दुष्टाचा दंड सात्विकांचे अवस्थेवर बसणार नाहीं सात्विकानीं आपले हात अन्यायास लावूं नयेत ह्मणून

४ हे ईश्वरा जे सुजन व आपले हृदयाचे यथार्थ आहेत त्यांचें हित कर



५ पण जे आपल्या कुटिल मार्गांत वळतात त्यांस ईश्वर अन्यायकर्म्यांचे संगतीं नेईल इस्राएलास कुशल होईल

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत १२६

१ जेव्हां ईश्वरानें जीयोनेचे पुनरागत परत आणिले तेव्हां आम्ही स्वप्न पाहणाऱ्यांवाणीं झालों

२ तेव्हां हास्यानें आमचें मुख व उत्सवानें आमची जिव्हा भरली तेव्हां विधर्म लोकांमध्यें ह्मणाले कीं त्यांसाठीं ईश्वरानें महत्कर्में केलीं आहेत

३ ईश्वरानें आह्मासाठीं महत्कर्में केलीं आहेत ह्मणून आह्मी हर्षित झालों आहों

४ हे ईश्वरा दक्षिणेंतले ओघांवाणीं आमचे पुनरागत परत आण

५ जे अश्रूनीं पेरितात ते उत्सवानें कापितील

६ जो बीजांचें पेरण घेऊन निश्चयें रडत बाहेर जाईल तो आपलीं पेंडकीं घेऊन उत्सवानें खचीत आंत येईल

## गीत १२७

१ जर ईश्वर मंदीर बांधीत नाहीं तर त्याचे बांधणारे त्याजवर व्यर्थ श्रम करितात ईश्वर जर नगर रक्षीत नाहीं तर पाहरेकरी वृथा जाग्रत राहतो

२ झुंजुरकां उठणें अतिरात्रीं बसणें श्रमाचें अन्न

खाणें तुह्माला व्यर्थच आहे असें असतां कीं तोच आपले प्रियास झोंप घेऊं देतो

३ पहा लेंकरें ईश्वरदत्त विभागच आहेत गर्भस्थान फल प्रतिदान आहे

४ जसे बलवानाचे हातांत बाण तशीं यौवनाचीं लेंकरें आहेत

५ ज्या पुरुषानें आपला बाणकोष त्यांनीं भरिला आहे तो सुखी ते लज्जित होणार नाहींत पण द्वारांत ते वैर्यांशीं बोलतील

## गीत १२८

१ जो कोणी ईश्वरास भितो जो त्याचे मार्गांत चालतो तो धन्य

२ तूं आपले हातचें श्रमफल तर खाशील तूं सुखी होशील आणि तुझें हित होईल

३ तुझी स्त्री तुझे घराचे भिंतीशीं लाविलेल्ये फलद द्राक्षिसारिखी होईल तुझीं लेंकरें जाईताचे रोप्यांसारिखीं तुझे मेजाभोंवतीं होतील

४ पहा जो पुरुष ईश्वराला भितो तो तसाच आशी विशिष्ट होईल

५ ईश्वर जीयोनेंतून तुला आशी देईल तर तूं आपले आयुष्याचे सर्व दिवसांत यरुशालेमेचें हित पहा

६ तूं आपले लेंकरांचीं लेंकरें पहा इस्राएलास कुशल असो



## गीत १२९

१ माझे यौवनापासून बहुत वेळां त्यांनीं मला पीडिलें असें इस्राएलानें ह्मणावें

२ माझे यौवनापासून बहुतवेळां त्यांनीं मला पीडिलें तथापि ते मजवर प्रभाव पावले नाहींत

३ नांगर्‍यांनीं माझे पाठीवर नांगरलें त्यांनीं आपलीं तासें लांब केलीं

४ ईश्वर सात्विक आहे त्यानें दुष्टांचीं बंधनें तोडिलीं आहेत

५ सर्व जे जीयोनेस द्वेषितात ते लज्जा पावून पराङ्मुख होवोत

६ धाब्यावरचें जें तृण कोणी काढल्यापूर्वीं कोमतें तसे ते होवोत

७ ज्यानें कापणारा आपली मूठ व पेंडकीं बांधणारा आपली कव भरीत नाहीं तें

८ आणि जे जवळून चालतात ते ह्मणत नाहींत कीं ईश्वराची आशी तुह्मावर असो आह्मी ईश्वराचे नामानें तुह्माला आशीर्वाद देतों

## गीत १३०

१ हे ईश्वरा अथाग स्थलांतून म्यां तुला आरोळी केली आहे

२ हे प्रभो माझा शब्द ऐक माझे विनंत्यांचे शब्दाकडे तुझे कान लागलेले असोत

३ हे ईश्वरा जर तूं अन्याय ठेविशील तर हे प्रभो कोण उभा राहील

४ पण तुझी भीड धरावी म्हणून तुजवळ क्षमा आहे

५ मी ईश्वराची अपेक्षा करितों माझा जीव अपेक्षा करितो आणि त्याचे वचनावर मी आशा ठेवितों

६ जे पहांटेची प्रतीक्षा करितात पहांटेची प्रतीक्षा जे करितात त्यां पेक्षांहि माझा जीव ईश्वराची फार प्रतीक्षा करितो

७ हे इस्राएला ईश्वराची अपेक्षा कर कारण ईश्वराचे ठायीं दया आहे त्याजवळच पूर्ण उद्धार आहे

८ तोच इस्राएलास त्याचे सर्व अन्यायांपासून उद्धरील

## गीत १३१

१ हे ईश्वरा माझें मन उन्नत नाहीं व माझीं नेत्रें उदग्र नाहींत आणि मजहून थोर व अतर्क्य अर्थांत मी वर्त्तलों नाहीं

२ होय जसें स्तनपानवियुक्त बालक आपल्ये आईला होतें तसें म्यां आपलें मन समाहित व शांत केलें आहे मला माझें मन स्तनपान वियुक्त बालकासारिखें झालें आहे

३ हे इस्राएला आतांपासून सर्वकालपर्यंत ईश्वरावर आशा ठेव



## महिन्याचा अठ्ठाविसावा दिवस

सकाळची प्रार्थना

## गीत १३२

१ हे ईश्वरा दावीदाचें व त्याचे सर्व कष्टांचें स्मरण कर

२ त्यानें कसें ईश्वराजवळ शपथ केला याकोबाचे समर्थास नवस केला

३ मी आपले घरचे मंडपांत शिरणार नाहीं आणि आपले मंचकावर चढणार नाहीं

४ मी आपले नेत्रांला निद्रा व आपले पांपण्यांला उपनिद्रा लागूं देणार नाहीं

५ ईश्वरासाठीं स्थान याकोबाचे समर्थासाठीं वस्ति मला सांपडेपर्यंत

६ पहा आम्ही एफ्राथांत प्रमाणसंपुटाविषयीं ऐकिलें तो अरण्यक्षेत्रांत आम्हास सांपडला

७ आम्ही त्याचे निवासांत जाऊं त्याचे पादासनाजवळ भजूं

८ हे ईश्वरा तूं आपल्या विश्रामस्थलांत प्रतिष्ठित हो तूंच व तुझा प्रतापाचा प्रमाण संपुट

९ तुझे आचार्य्य पुण्यवेष्टित असोत व तुझे भक्त उत्साह शब्द करोत

१० दावीद जो तुझा सेवक त्याकरितां तूं आपला अभिषिक्त पराङ्मुख करूं नको

११ ईश्वरानें दावीदापाशीं सत्यतेनें शपथ केला त्याज

पासून तो वळणार नाहीं तुझे देहफलांतील तुझे सिंहासनावर बसवीन

१२ तुझीं लेंकरें जर माझा संधा व माझीं जीं विधानें त्यांस शिकवीन तीं पाळितील तर त्यांचींहि लेंकरें सर्वकाल पर्यंत तुझे सिंहासनावर बसतील

१३ कारण ईश्वरानें जीयोन निवडिली आहे आपली वस्ती व्हावयासाठीं इच्छिली आहे

१४ ही सर्वकालपर्यंत माझें विश्रामस्थलच आहे एथें मी राहीन कां तर ही म्यां इच्छिली आहे

१५ मी खचीत इचा आहार आशीर्विशिष्ट करीन इचे दरिद्र्यांस भाकरीनें तृप्त करीन

१६ इचे आचार्य्यंहि उद्धारवेष्टित करीन आणि इतले भक्त फार उत्सव शब्द करितील

१७ तेथें दावीदासाठीं शृंग उगवे असें करीन म्यां आपले अभिषिक्तासाठीं दीप सिद्ध केला आहे

१८ त्याचे वैरी लज्जेनें वेष्टीन पण त्याजवर त्याचा मुकुट फुलेल

## गीत १३३

१ पहा बंधूंचें एकच राहणें किति उत्तम व किति मनोरम आहे

२ हें डोईवरचे उत्तम तेलासारिखें आहे जें दाढीवर अहरोनाचे दाढीवर उतरलें जें त्याचे वस्त्रांचे कांठांवर उतरलें तें



३ हें हर्मोनाचे दहिंवरासारिखें जें दहिंवर जीयोनेचे पर्वतांवर उतरलें त्यासारिखेंहि आहे कां तर तेथें ईश्वरानें आशी दिली सर्वकालपर्यंत जीवनहि दिलें

## गीत १३४

१ पहा ईश्वराचे सर्व सेवकानों जे तुम्ही प्रतिराती ईश्वराचे मंदिरांत उभे राहतां ते तुम्ही ईश्वराला सुवंदित म्हणा

२ पवित्र स्थानांत तुम्ही आपले हात उंचावून ईश्वराला सुवंदित म्हणा

३ ईश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्त्ता त्यानें तुम्हाला जीयोनेंतून आशी द्यावी

## गीत १३५

१ तुम्ही ईश्वराला स्तवा ईश्वराचे नामाची प्रशंसा करा ईश्वराचे सेवकानों स्तवन करा

२ जे तुम्ही ईश्वराचे मंदिरांत आमचे देवाचे मंदिराचे अंगणांत उभे राहतां ते

३ तुम्ही ईश्वराला स्तवा कां तर ईश्वर उत्तम आहे त्याचे नामाला गा कारण तें मनोरम आहे

४ कां तर आपल्यासाठीं ईश्वरानें याकोब निवडिला आपला स्वार्थ व्हावयासाठीं इस्राएल निवडिला आहे

५ तर ईश्वर थोर आहे व आमचा प्रभु सर्व देवांपेक्षां श्रेष्ठ आहे असें मी जाणतों

६ सर्व जें ईश्वराला बरें वाटलें तें त्यानें आकाशांत व पृथ्वींत जलांत व सर्व अथाग स्थानांत केलें आहे

७ तो पृथ्वीचे शेवटापासून मेघ चढवितो पर्जन्यासाठीं विद्युत् उत्पन्न करितो आपले निधींतून वारा आणितो

८ त्यानें मिसर देशांतले प्रथमजात हाणिले जे मनुष्यांचे आणि पशुंचे होते ते

९ त्यानें हे मिसरा तुजमध्यें फारोहाजवळ व त्याचे सर्व सेवकांजवळ अद्भुत व उत्पात पाठविले

१० त्यानें विपुल वंश हाणिले आणि बलवान राजे मारून टाकिले

११ सीहोन जो अमोरींचा राजा तो आणि ओग जो बाशानाचा राजा तो आणि कानाअनाचीं जीं सर्व राज्यें तीं

१२ आणि त्यांचा देश विभाग व्हायासाठीं आपले लोक जे इस्राएल यांस विभाग व्हायासाठीं त्यानें दिला

१३ हे ईश्वरा तुझें नाम सर्वकालपर्यंत आहे तुझें स्मरण हे ईश्वरा युगोयुगच आहे

१४ कीं तर ईश्वर आपले लोकांची न्यायाधिशी करील आणि आपले सेवकांविषयीं अनुतापेल

१५ विधर्म लोकांच्या मुर्त्ति रुपें व सोनेंच आहेत मनुष्यांचें हस्तकर्मच आहेत

१६ त्यांला मुखें आहेत पण बोलत नाहींत त्यांला डोळे आहेत पण पाहवत नाहीं



१७ त्यांला कान आहेत पण ऐकूं येत नाहीं आणि त्यांचें मुखांत कांहीं श्वास नाहीं

१८ त्यांसारिखेच त्यांचे निर्माणकर्त्ते आहेत आणि सर्व जो त्यांजवर भाव ठेवितो तो

१९ इस्राएलाचे वंशांनों ईश्वराला सुवंदित म्हणा आहरोनाचे वंशानों ईश्वराला सुवंदित ह्मणा

२० लेवीचे वंशानों ईश्वराला सुवंदित ह्मणा ईश्वराचे भक्तानों ईश्वराला सुवंदित म्हणा

२१ ईश्वर जो येरुशालेमेस निवास करितो तो जीयोनेंतून सुवंदित असो तुह्मी ईश्वराला स्तवा

संध्याकाळची प्रार्थना.

## गीत १३६

१ तुम्ही ईश्वराला कृतज्ञता निवेदा कारण तो उपकारिक आहे त्याची दया सनातन आहे

२ देवांचे देवाला कृतज्ञता निवेदा कारण त्याची दया सनातन आहे

३ प्रभूंचे प्रभूला कृतज्ञता निवेदा कारण त्याची दया सनातन आहे

४ जो एकलाच महदाश्चर्य्यकर्म्में करितो त्याला कांकीं त्याची दया सनातन आहे

५ ज्यानें बुद्धीकडून आकाशें उत्पन्न केलीं त्याला कारण त्याची दया सनातन आहे

६ ज्यानें पृथ्वी जलावरतीं वितत केली त्याला कारण त्याची दया सनातन आहे
७ ज्यानें महा ज्योतिष्क उत्पन्न केले त्याला कारण त्याची दया सनातन आहे
८ सूर्य्य दिवसास ऐश्वर्य्य करायास कारण त्याची दया सनातन आहे
९ चंद्र व तारे रात्रीं ऐश्वर्य्य करायास कारण त्याची दया सनातन आहे
१० ज्यानें मिसरांतील लोकांचे प्रथमजात हाणिले त्याला कारण त्याची दया सनातन आहे
११ आणि त्यांजमधून इस्राएल आणिला कारण त्याची दया सनातन आहे
१२ सुदृढ हस्तानें व प्रतत भुजानें कारण त्याची दया सनातन आहे
१३ ज्यानें तांबडा समुद्र द्विभाग केला त्याला कारण त्याची दया सनातन आहे
१४ आणि त्यांजमधून इस्राएलास उतरिलें कारण त्याची दया सनातन आहे
१५ आणि फारोहाला व त्याचे सैन्याला तांबडे समुद्रांत पाडून टाकिलें कारण त्याची दया सनातन आहे
१६ ज्यानें आपले लोक अरण्यांतून चालविले त्याला कारण त्याची दया सनातन आहे
१७ ज्यानें महा राजे हाणिले त्याला कारण त्याची दया सनातन आहे



१८ आणि प्रतापी राजे मारून टाकिले कारण त्याची दया सनातन आहे
१९ सीहोन जो आमोरींचा राजा तो कारण त्याची दया सनातन आहे
२० आणि ओग जो बाशानाचा राजा तो कारण त्याची दया सनातन आहे
२१ आणि त्यांचा देश विभाग व्हायासाठीं दिला कारण त्याची दया सनातन आहे
२२ इस्राएल जो आपला सेवक त्यास विभाग व्हायासाठीं दिला कारण त्याची दया सनातन आहे
२३ जो आह्मास आमचे अधम दशेंत स्मरला कारण त्याची दया सनातन आहे
२४ ज्यानें आमचे शत्रूंपासूनहि आह्माला मुक्त केलें कारण त्याची दया सनातन आहे
२५ जो सर्व जीवांस अन्न देतो कारण त्याची दया सनातन आहे
२६ आकाशाचे देवाला कृतज्ञता निवेदा कारण त्याची दया सनातन आहे

## गीत १३७

१ बाबेलेचे नद्यांजवळ आम्ही बसलों होय तेथें जीयों नेला स्मरून आह्मी रडलों
२ तिजमधील वाळूंजांवर आम्ही आपले चंग टांगून ठेविले

३ कां तर ज्यानीं आह्माला बंदीवान नेलें त्यानीं आह्मापाशीं गीत मागीतलें आणि आमचे पीडणारे हर्षण मागत बोलले आह्मासाठीं सीयोनेचें एकादें गीत गा

४ परदेशांत आह्मी ईश्वराचें गीत कसे गाऊं

५ हे येरूशालेमे मी जर तुला विसरेन तर माझा उजवा हात मला विसरो

६ जर मी तुला स्मरत नाहीं जर मी आपले मुख्य हर्षांवरतीं येरूशालेम उंचावीत नाहीं तर माझे तालूस माझी जिव्हा चिकटो

७ हे ईश्वरा जे एदोमाचे वंश येरूशालेमेचे दिवशीं म्हणाले तिला पाडून टाका तळापर्यंत तिला पाडून टाका त्यांचें स्मरण कर

८ अगे बाबेलेचे कन्ये जी तूं ओसाड व्हायाची जसें त्वां आह्माप्रत केलें तसें जो तुला परत करील तो धन्य

९ जो तुझीं बालकें घेऊन खडकावर आपटील तो धन्य

## गीत १३८

१ मी आपले पूर्ण हृदयानें तुला स्तवीन ऐश्वर्यविशिष्टांसमोर तुला गाऊन वर्णीन

२ तुझे पवित्र मंदिराकडे भजन करीन आणि तुझे दयेकरितां व तुझे सत्याकरितां तुझें नाम स्तवीन कारण त्वां आपले सर्व नामांपेक्षां आपलें वचन विशिष्ट केलें आहे



३ जेव्हां म्यां आह्वती केली तेव्हां त्वां मला उत्तर दिल्हें आणि माझे जीवांत मला बलेंकडून पराक्रमयुक्त केलें

४ हे ईश्वरा जेव्हां पृथ्वींतले सर्व राजे तुझे मुखचीं वाक्यें ऐकतील तेव्हां ते तुला स्तवितील

५ तेव्हां ते ईश्वराचे मार्गांत गातील कारण ईश्वराचें गौरव अत्यंतच आहे

६ जरीं ईश्वर उच्छ्रित आहे तरीं नम्राला पाहतो पण समुन्नताला दूरून ओळखतो

७ जरीं मी संकटांमध्यें चाललों तरीं तूं मला जीवशक्ति देशील माझे वैऱ्यांचे क्रोधाविरुद्ध तूं आपला हात लांब करिशील आणि तुझा उजवा हात मला तारील

८ ईश्वर मजसाठीं काम साधील हे ईश्वरा तुझी दया सनातन आहे तूं आपलें हस्तकर्म सोडूं नको

## महिन्याचा एकुणतिसावा दिवस

### सकाळची प्रार्थना

## गीत १३९

१ हे ईश्वरा त्वां मला निरीक्षिलें व जाणिलें आहे

२ तूं माझें उठणें व बसणें जाणतोस तूं दूरून माझा मनोभाव समजतोस

३ तूं माझें चालणें व निजणें यांस ओळखतोस आणि माझे सर्व मार्गांचा परिचय त्वां केला आहे

४ पहा हे ईश्वरा जें तूं सर्वतः जाणत नाहींस असें कांहीं वाक्य माझे जिव्हेंत नाहीं

५ त्वां मला मागें पुढें वेढिलें आहे आणि आपला हात मजवर ठेविला आहे

६ असें ज्ञान मला फार आश्चर्य आहे हें उच्छ्रित आहे मला प्राप्त व्हायाचें नाहीं

७ तुझे आत्म्यापासून मी कोठें जाऊं व तुझे सामर्थ्या पासून मी कोठें पळूं

८ जर मी आकाशांत चढतों तर तेथें तूं आहेस आणि मृत्युलोकांत जर आपलें आंथरूण घालितों तर पहा तेथेंहि तूं आहेस

९ जर उदयपक्ष घेऊन मी समुद्राचे अंत्य सीमेवर राहतों तर

१० तेथेंहि तुझा हात मला चालवील तुझा उजवा हात मला धरील

११ जर मी ह्मणतों निश्चयें मला अंधकार लपवील तर रात्रि मजभोंवती प्रकाशच होईल

१२ होय अंधकार तुजपासून अस्पष्ट करीत नाहीं पण रात्र दिवसाप्रमाणें प्रकाशत्ये जसा काळोख तसाच उजेड

१३ कां तर त्वां माझें अंतर्याम संसिद्ध केलें माझे आईचे उदरीं त्वां मला आच्छादिलें

१४ मी भीतिकारकपणें आश्चर्य आहें म्हणून मी



तुला स्तवीन तुझीं कर्मे आश्चर्य आहेत असें माझा जीव निश्चयें जाणतो

१५ जेव्हां मी गुप्तांत निर्माण झालों आणि पृथ्वीचे खालील स्थानांत सुरचित झालों तेव्हां माझें सत्व तुज पासून गूढ नव्हतें

१६ तुझे नेत्रानीं माझा पिंड पाहिला आणि माझे अवयव दिवसानदिवस रचिले जात होते आणि जेव्हां त्यांतला एक समापन्न नव्हता तेव्हां ते सर्व तुझे पुस्तकांत लिहिले होते

१७ तर हे देवा तुझे संकल्प मला किति अर्थ्य आहेत त्यांचें संकलन केवढें विपुल आहे

१८ त्यांस जर मी गणितों तर ते वाळवेपेक्षां बहुत आहेत जेव्हां मी जागृत होतों तेव्हां मी अद्यापी तुजशीं आहें

१९ खचीत हे देवा तूं दुष्टास छेदून टाकशील ह्मणून अरे हिंसक मनुष्यानों तुह्मी मजपासून दूर जा

२० ते तुजप्रतिकूल दुष्टपणें बोलतात तुझे वैरी व्यर्थ तेस आसक्त आहेत

२१ हे ईश्वरा जे तुला द्वेषितात त्यांस मी द्वेषीत नाहीं काय जे तुजवर उठतात त्यांस मी कंटाळत नाहीं काय

२२ मी पूर्ण द्वेषानें त्यांला द्वेषितों माझे दृष्टींत ते वैऱ्यांसारिखे आहेत

२३ हे देवा मला समीक्षून माझें हृदय जाण मला पार खून माझे मनोभाव जाण

२४ आणि माझे अंगीं जर कोणतीहि मूर्त्तिपूजाशक्ति असली तर पहा आणि तुझे सनातन मार्गांत मला ने

गीत १४०

१ हे ईश्वरा दुष्ट मनुष्यापासून मला सोड द्रोहक जना पासून मला रक्ष

२ त्यानीं आपले मनांत दुष्ट संकल्प केले आहेत ते नित्य युद्ध करायास मिळतात

३ त्यानीं सर्पासारिखी आपली जिव्हा तीक्ष्ण केली आहे जोगी सर्पाचें विष त्यांचे ओंठाखालीं आहे

४ हे ईश्वरा दुष्टाचे हातांपासून मला रक्ष द्रोहक जनापासून मला संभाळ ज्यानीं माझीं पावलें ढकलायाचा संकल्प केला आहे ते

५ गर्विष्ठानीं मजसाठीं पाश व रज्जु लाविले आहेत वाटे वर त्यानीं जाळें पसरिलें आहे मसाठीं सांपले मांडले आहेत

६ मी ईश्वरास म्हणालों तूंच माझा देव आहेस हे ईश्वरा माझे विनंत्यांचे शब्दाकडे कान लाव

७ हे देवा प्रभो माझे तारणाचे सामर्थ्या संग्रामाचे दिवसीं त्वां माझी डोई आच्छादिली

८ हे ईश्वरा दुष्टाच्या इच्छा पुरवूं नको त्याचा दुष्ट संकल्प सिद्धीस जाऊं देऊं नको देशील तर ते उन्नत होतील

९ जे मला घेरितात त्यांचे मस्तकावर त्यांचे ओंठचां दुष्फल त्यांला आच्छादो



१० त्यांजवर ज्वलित अंगार पडतील त्यांस तो अग्नींत टाकील आवर्त्तांत ज्यांत त्यांला उठवणार नाहीं

११ दुर्भाषक जन पृथ्वींत स्थापिला जायाचा नाहीं द्रोहक जन पाडायला अरिष्ट त्याचे पाठीस लागेल

१२ ईश्वर दीनाचा वाद निभावील आणि दरिद्र्याचा न्याय करील असें मी जाणतों

१३ निश्चयें सात्विकजन तुझे नामाला कृतज्ञता निवे दील यथार्थ जन तुजसमक्ष राहतील

गीत १४१

१ हे ईश्वरा तुला मी आह्वति केली आहे मजसाठीं त्वरा कर मी तुला आरोळी करितांना माझे शब्दाकडे कान दे

२ तुजसमोर माझी प्रार्थना धूपावाणीं व माझें हात उभारणें संध्याकाळचे अर्पणाप्रमाणें साधलीं जावीं

३ हे ईश्वरा माझे मुखास रक्षण ठेव माझे ओंठांचें द्वार पाळ

४ कोणत्याहि दुष्टविषयास दुष्कर्मी पुरुषांसंगतीं दुरा चरण करायास माझें मन वळूं देऊं नको आणि त्यांचें मिष्टान्न मला नको खाऊं देऊ

५ सात्विक मजवर फटका मारील तर तो दयास आणि जर मला गर्हील तर तें ज्या उत्कृष्ट तैलास माझी डोई नाकारणार नाहीं असें होईल कां तर अद्यापि त्यांचे अरिष्टांत माझी प्रार्थना केली जाईल

६ त्यांचे न्यायाधीश पर्वताचे कड्यांवर टाकून दिले होते तेव्हां त्यानीं माझीं वाक्यें ऐकिलीं कां तीं मधुर होतीं

७ जेसें कोणी उखळितांना व फोडितांना घडतें तसीं आमचीं हाडें थड्याचे कांठीं विखरलीं आहेत

८ तथापि हे देवा प्रभो माझीं नेत्रें तुजकडे आहेत तुझा आश्रय मी धरितों माझा जीव विहीन सोडूं नको

९ जो पाश त्यानीं मजसाठीं मांडिला आहे त्यापासून आणि दुष्कर्म्यांचे सांपळ्यांपासून मला रक्ष

१० मी पार पडतांना दुष्ट आपले जाळ्यांत पडोत

संध्याकाळची प्रार्थना

## गीत १४२

१ मी आपले वाणीकडून ईश्वरास आरोळी केली ईश्वरास मी आपले वाणीकडून विनंती केली

२ त्यासमोर म्यां आपली काकळुत उच्चारिली म्यां आपलें संकट त्यासमक्ष निवेदिलें

३ माझे ठायीं माझा जीवात्मा मूर्च्छित झाला तेव्हां त्वां माझी वाट जाणिली ज्या मार्गांत मी चाललों त्यांत त्यानीं मजसाठीं पाश मांडिला

४ मी उजवेकडे अवलोकन करितांना व पाहतांना मला कोणी अंगीकारणारा नव्हता मजपासून आश्रय नाहींसा झाला माझे जीवाला कोणी पुसलें नाहीं

५ तुला हे ईश्वरा म्यां आरोळी केली मी ह्मणालों तूच माझा आश्रय जीवंतांचे भूमींत माझा वांटा आहेस



६ माझे आरोळीस मन लाव कारण मी फार अधम स्थित झालों आहें माझे पीडकांपासून मला मुक्त कर कां तर ते मजपेक्षां बलिष्ठ आहेत

७ म्यां तुझे नामाची प्रशंसा करावी ह्मणून माझा जीव बंधनवेश्मांतून आण सात्विक सुखरूपें मला वेढतील कारण तूं मजवर उपकार करिशील

## गीत १४३

१ हे ईश्वरा माझी प्रार्थना ऐक माझे विनंतीला कान दे तूं आपले सत्यतेप्रमाणें व आपले सात्विकपणाप्रमाणें मला उत्तर दे

२ आणि तूं आपले सेवकाशीं वाद करूं नको तुजसमक्ष कोणी जीवंत मनुष्य न्यायी निघणार नाहीं

३ कां तर वैऱ्यानें माझा प्राण पीडिला आहे माझा जीव हाणून धुळींत मिळविला आहे पूर्वींचे मृतांसारिखा मी अंधकारांत वस्ती करीं असें त्यानें केलें आहे

४ तर माझे ठायीं माझा जीवात्मा मूर्च्छित झाला आहे माझें हृदय मजमध्यें विषण्ण झालें आहे

५ मी पूर्वींचे दिवस स्मरतों तुझीं सर्व कर्में ध्यानांत धरितों तुझे हस्तकार्यांचें चिंतन करितों

६ तुजकडे मी आपले हात उभारून पसरितों शुष्क भूमीप्रमाणें माझा जीव तुसाठीं तृषतो

७ हे ईश्वरा लवकर करून मला उत्तर दे माझा जीवात्मा

थकला आहे तूं आपलें मुख मजपासून आच्छदूं नको आच्छादलेंस तर जे खांचेंत उतरतात त्यांसारिखा मी होईन

८ प्रातःकाळीं तूं आपली दया मला ऐकूं दे कां मी तुजवर भाव ठेवितों ज्या मार्गांत म्यां चालावें तो मला दाखीव कारण मी आपला जीव तुजकडे उंचावितों

९ हे ईश्वरा माझे वैऱ्यांपासून मला मुक्त कर तुजकडे मी संवृत्ति घेतों

१० तुझे मनोदयाप्रमाणें करायास मला शिकीव कारण तूं माझा देव आहेस तुझा आत्मा उत्तम आहे मला सपाट देशांत ने

११ हे ईश्वरा तूं आपले नामाकरितां मला जीवित कर तूं आपले सात्विकपणाप्रमाणें माझा जीव संकटांतून निघे असें कर

१२ आणि तूं आपले दयेप्रमाणें माझे वैरी नष्ट कर जे सर्व माझे जीवाला गांजितात तेहि नाहींसे कर कां मी तुझा सेवक आहें

## महिन्याचा तिसावा दिवस

### सकाळची प्रार्थना

### गीत १४४

१ ईश्वर जो माझा बलाश्रय जो माझे हस्तांस युद्ध करायास व माझे अंगुलींस संग्राम करायास शिकवितो तो सुवंदित असावा



२ माझा दयासागर व माझें दुर्ग माझें उच्छ्रित स्थळ व माझा मुक्तकर्त्ता माझें वारण आणि ज्याचा आश्रय मी धरितों जो माझे हाताखालीं माझे लोक वश्य करितो तो

३ हे ईश्वरा मनुष्य काय आणि त्याला स्वीकारितोस मनुष्यवंश काय आणि त्याला मानितोस

४ मनुष्य शून्यासारिखें आहे त्याचे दिवस नश्वर छाये प्रमाणें आहेत

५ हे ईश्वरा तूं आपलें आकाश लववून उतर पर्वतांला स्पर्श म्हणजे ते धुमतील

६ वीज चकाकवून त्यांची दाणादाण कर तूं आपले तीर मारून त्यांला भडकीव

७ वरतून आपले हात लांब करून मला मुक्त कर विपुल जलांतून व परक्यांचे हातांतून मला सोड

८ ज्यांचें मुख दुष्टपण बोलतें आणि ज्यांचा उजवा हात असत्याचा उजवा हातच आहे ते

९ हे देवा मी तुला नवें गीत गाईन दशतंत्र वीणा वाजवून तुला गाऊन वर्णीन

१० जो राजांला तारण देतो जो आपल्या सेवकास दावीदास नाशक तरवारीपासून मुक्त करितो तो

११ ज्यांचें मुख दुष्टपण बोलतें आणि ज्याचा उजवा हात असत्याचा उजवा हातच आहे त्यां परक्यांचे हातांतून मला सोडून मुक्त कर

१२ असासाठीं कीं आमचे पुत्र आपले यौवनांत पाळि

लेले रोप्यांसारिखे असावे आमच्या कन्या मंदिररचनेचे घड
लेले कोंपऱ्यांसारिख्या असाव्या

१३ आमचीं भांडारें आपल्यांतून सर्व प्रकारचें वस्तु पुरवितांना भरलीं असावीं आमचे वाड्यांत आमचे कळपानीं सहस्त्रावधि अयुतावधि संतान करावें

१४ आमचीं गाभणीं गुरें निरुपद्रव व निगर्भपात असावीं आणि आमचे आळींत आकांत नसावा

१५ ज्यां लोकांची अवस्था अशी आहे ते धन्य ज्या लोकांचा देव ईश्वरच आहे तेच धन्य आहेत

## गीत १४५

१ हे माझे देवा राजा तुला मी उंचावीन आणि सदा सर्वकाळ तुझें नाम सुवंदित ह्मणेन

२ प्रतिदिवशीं मी तुला सुवंदित ह्मणेन आणि सदा सर्व काळ तुझें नाम स्तवीत जाईन

३ ईश्वर थोर आणि परमस्तुत्य आहे व त्याचें महत्व असमीक्ष्य आहे

४ पिढ्यानपिढी तुझे कर्मांची प्रशंसा करील आणि तुझीं प्रतापकार्य्यें लोक प्रव्यक्त करितील

५ तुझे प्रतापाचें गौरवी ऐश्वर्य्य व तुझीं आश्चर्य्य कर्में मी ध्यान करीत पाहीन

६ आणि तुझे भयंकर कार्य्यांचे प्रभावाविषयीं मनुष्यें बोलतील व तुझें महत्व मी वर्णीन



७ तुझे परम उपकारिलाचें स्मरण तीं काढितील आणि तुझें सात्विकपण उच्चस्वरानें गातील

८ ईश्वर कृपालु व दयालु मंदक्रोध व बहुप्रसादच आहे

९ हे ईश्वर सर्वांस उपकारिक आहे व त्याची करुणा त्याचे सर्व कृत्यांवर आहे

१० हे ईश्वरा तुझीं सर्व कृत्यें तुला स्तवितील आणि तुझे भक्त तुला सुवंदित ह्मणतील

११ ते तुझे राज्याचे गौरवाविषयीं बोलतील व तुझे पराक्रमाविषयीं संभाषण करितील

१२ त्याचीं प्रतापकार्य्यें व त्याचे राज्याचें गौरवी ऐश्वर्य्य मनुष्यांला कळवायास

१३ तुझें राज्य सर्व युगांचें राज्य आहे व तुझें प्रभुत्व पिढ्यानपिढ्यां चालतें

१४ जे पडायाचे लागास येतात त्यां सर्वांस ईश्वर उद्धरितो जे सर्व दुणून गेले आहेत त्यांसहि उभारितो

१५ सर्वांचीं नेत्रें तुजकडे प्रतीक्षा करितात आणि सुसमयीं त्यांला त्यांचें भक्ष्य देतोस

१६ तूं आपला हात उघडून सर्व जीवजंतूंची इच्छा तृप्त करितोस

१७ ईश्वर आपले सर्व मार्गांत सात्विक व आपले सर्व कर्मांत पवित्र आहे

१८ जे सर्व ईश्वरास आह्वति करितात जे सर्व सत्यमेनें त्याला आह्वति करितात त्यांला तो सुप्रसन्न आहे

१९ जे त्याला भितात त्यांची इच्छा तो पुरवील व त्यांची आरोळी ऐकून त्यांला तारील

२० जे सर्व त्याची आवड धरितात त्यांला ईश्वर रक्षील परंतु सर्व दुष्टांस नाशून टाकील

२१ माझें मुख ईश्वराची स्तुति बोलेल आणि सर्व मनुष्यजाति सदा सर्वकाळ त्याचे पवित्र नामाला सुवंदित ह्मणो

## गीत १४६

१ तुह्मी ईश्वराला स्तवा हे माझे जीवा तूं ईश्वराची प्रशंसा कर

२ मी आपलें आयुष्य संपेपर्यंत ईश्वराला स्तवीन मी आहेंपर्यंत माझे देवाला गाऊन वर्णीन

३ अधिपतींवर व ज्याचे अंगीं तारणशक्ति नाहीं अशा मनुष्यावर तुह्मी भाव ठेवूं नका

४ त्याचा प्राण जातो तो आपले मातींत मिळतो त्याच दिवशीं त्याचे प्रिय संकल्प नाहींसे होतात

५ ज्याचा साहाय्यकर्त्ता याकोबाचा देव आहे ज्याची अपेक्षा ईश्वर जो आपला देव त्याजकडेच आहे तो धन्य

६ ज्यानें आकाश व पृथ्वी समुद्र व त्यांतलें जें सर्व यांस उत्पन्न केलें जो सदा सत्य रक्षितो

७ जो बलात्कारान्तांसाठीं न्याय करितो जो भुकेल्यांस अन्न देतो ईश्वर बंदिवानांस सुटी देतो

८ ईश्वर आंधळ्यांचीं नेत्रें उघडितो ईश्वर दुणलेल्यास उभारितो ईश्वर धार्मिकांवर प्रीति करितो



९ ईश्वर विदेशीयांस रक्षितो पोरक्यांस व विधवेस समाश्रित करितो पण दुष्टांचे मार्गास विषम करितो

१० ईश्वर सनातनत: राज्य करील हे सीयोने पिढ्यान पिढ्यां तुझा देव राज्य करील तुम्ही ईश्वराला स्तवा

संध्याकाळची प्रार्थना

## गीत १४७

१ तुम्ही ईश्वराला स्तवा कां तर आमचे देवाला स्तुति गाणें उत्तम आहे मनोरमहि आहे स्तुतिकरण शुभ कर्मच आहे

२ ईश्वर येरुशालेम बांधितो इस्राएलाचे विखरलेले एकच मिळवितो

३ तो विषण्ण मनाच्यांस बरें करितो व त्यांचे क्षतांस पट्टी लावून बांधितो

४ तो ताऱ्यांची गणती करितो त्यां सर्वांस नामें ठेवितो

५ आमचा प्रभु थोर आणि महासमर्थ आहे त्याची बुद्धि अप्रमेय आहे

६ ईश्वर दीनांस समाश्रित करितो दुष्टांस भुईंत ध्वस्त करितो

७ तुम्ही कृतज्ञता निवेदून परस्पर ईश्वराला गा चंग वाजवून आमचे देवाला गा

८ तो मेघानीं आकाश आच्छादितो तो भूमीसाठीं वृष्टि सिद्ध करितो डोंगरांवर गवत रुजवितो

९ तो पशूला व काकाळाचीं जीं पिलें करकरतात
त्यांला त्यांचें भक्ष्य देतो
१० तो घोड्याचे पराक्रमाविषयीं आनंदत नाहीं पुरु
षाचे पायांविषयीं संतोष करीत नाहीं
११ जे त्याला भितात जे त्याचे दयेची अपेक्षा करि
तात त्यांजवर ईश्वर प्रीति ठेवितो
१२ हे येरुशालेमे ईश्वराची प्रशंसा कर हे जोयोने
तूं आपले देवाची स्तुति कर
१३ कांतर त्यानें तुझे द्वारांचे अडसर सुदृढ केले
त्यानें तुजमध्यें तुझीं लेंकरें आशीर्विशिष्ट केलीं आहेत
१४ तो तुझे देशाला सुख करितो गव्हांचे सारानें
तुला तृप्त करितो
१५ तो आपली आज्ञा पृथ्वीवर पाठवितो त्याचा
शब्द त्वरेनें धांवतो
१६ तो ऊर्णेसारिखें बर्फ देतो रक्षेसारिखी खार
पसरितो
१७ तो आपलें थिजलेलें पाणी तुकड्यांसारिखें
घालितो त्याचे हिमापुढें कोण उभा राहूं शकतो
१८ तो आपली आज्ञा पाठवून त्यांस विघरवितो
तो आपला वारा चालवितो तेव्हां पाणी गळून वाहतें
१९ तो याकोबाला आपलीं वाक्यें व इस्रायेलाला
आपले नियम व न्याय प्रकट करितो
२० कोणत्याहि लोकांप्रत त्यानें असें केलें नाहीं व
त्याचे न्याय त्यांनीं जाणिले नाहींत तुह्मी ईश्वराला स्तवा



## गीत १४८

१ तुह्मी ईश्वराला स्तवा आकाशांवर ईश्वराला स्तवा
उच्छ्रित स्थानांत त्याला स्तवा
२ त्याचे सर्व दूतानों त्याला स्तवा स्तवा त्याला त्याचे
सर्व सैन्यानो
३ अहो सूर्य आणि चंद्र हो त्याला स्तवा स्तवा
त्याला सर्व प्रकाशी तार्‍यानों
४ आकाशांचे आकाशानों आणि आकाशावरील
जलानों त्याला स्तवा
५ तीं ईश्वराचें नाम स्तवोत कां तर त्यानें आज्ञा
दिली तेव्हां तीं उत्पन्न झालीं
६ त्यानेंच तीं सर्वकालपर्यंत संस्थित केलीं आहेत
त्यानें नियम ठरविला आहे आणि तो ढळणार नाहीं
७ पृथ्वीवर तुह्मी ईश्वराला स्तवा मकरानों आणि
सर्व अथाग जलानों
८ अग्नि व गारा बर्फ धुकें व जें वादळ त्याची
आज्ञा साधितें तें
९ पर्वत व सर्व डोंगर फलवृक्ष व सर्व एरेजवृक्ष
१० श्वापद व सर्व पशु उरःसर व पक्षी
११ पृथ्वींतले राजे व सर्व लोक अधिपति व पृथ्वींतले
सर्व न्यायाधीश
१२ तरणे व तरण्या ह्मातारे व मुलगे
१३ हे ईश्वराचें नाम स्तवोत कारण त्याचें नाम एक

टेंच उच्छ्रित आहे त्याचें ऐश्वर्य्य पृथ्वीवरती व आकाशावरती आहे

१४ तोच आपले लोकांचें शृंग उभारील तो आपले सर्व भक्तांचा जे इस्राएल लोक त्याजवळ आहेत त्यांचा प्रशंसार्थच आहे तुह्मी ईश्वराला स्तवा

गीत १४९

१ तुह्मी ईश्वराला स्तवा ईश्वराला नवें गीत गा त्याचे भक्तांचे सभेंत त्याची स्तुति गा

२ इस्राएल आपल्या उत्पादकाविषयीं हर्षो सीयोनेचीं लेंकरें आपले राजाविषयीं उल्लासोत

३ नृत्यांत त्याचें नाम स्तवोत डफ आणि चंग वाजवून त्याला वर्णोत

४ कां तर ईश्वर आपले लोकांस प्रिय मानितो तो दीनांस तारणेंकरून गौरवविशिष्ट करील

५ भक्त गौरवांत उल्लासोत ते आपले गाद्यांवर उच्चस्वरानें गावोत

६ देवाच्या उच्चस्वरयुक्त स्तुति त्यांचे कंठांत असोत आणि त्यांचे हातांत दिधार तरवार असो

७ लोकांवर प्रतिकार आणि समुदायांवर शिक्षा करायला

८ त्यांचे राजे सांखळ्यांनीं व त्यांचे महाजन बिड्यांनी बांधायला



९ त्यांजवर लिहिलेला न्याय करायाला ही योग्यता त्याचे सर्व भक्तांला आहे तुह्मी ईश्वराला स्तवा

गीत १५०

१ तुह्मी ईश्वराला स्तवा त्याचे पवित्र स्थानांत देवाला स्तवा त्याचे ऐश्वर्य्याचे अंतरिक्षांत त्याला स्तवा

२ त्याचे प्रतापकार्य्यांकरितां त्याला स्तवा त्याचे परम महत्वाकरितां त्याला स्तवा

३ कर्णा वाजवून त्याला स्तवा वीणा व चंग वाजवून त्याला स्तवा

४ डफ वाजवून व नृत्य करून त्याला स्तवा तंतवाद्यें व यंत्रवाद्यें वाजवून त्याला स्तवा

५ मंजुताल झल्लरी वाजवून त्याला स्तवा उच्चताल झल्लरी वाजवून त्याला स्तवा

६ प्राणीमात्र ईश्वराला स्तवो तुह्मी ईश्वराला स्तवा

समाप्त

---

T. GRAHAM AND CURSETJEE NURJORJEE, PRINTERS.